नागपूर मुख्य कार्यालय
कॉटन मार्केट, नागपूर -४४००१८

संपर्क
संपादकीय : ९९२२९७००२३
वितरण : ८८८८६४७७५३
जाहिरात : ७४४७७३५८५१ /९३२६९०६०६२
नागपूर कार्यालय संपर्क : ७४४७७३५८५१

नागपूर, अकोला, अमरावती, खामगांव, यवतमाळ, वर्धा, गडचिरोली, वाशीम, भंडारा, गोंदिया, मुंबई, पालघर (ठाणे), नाशिक आणि चंद्रपूर महासागर

# महासागर

Epaper: www.epaper.dainikmahasagar.in nagpurpost@gmail.com / mahasagarngp@gmail.com



* वर्ष ५१ * अंक ६० * * अमरावती * सोमवार, दिनांक १ सप्टेंबर २०२५ ८ पाने ● किमत रू. २/-+ वितरण खर्च रू. १ = एकुण ३ रू.) * विशेष ऑफर : महासागर + नागपूर पोस्ट = ४ रु. फक्त

अग्राग्रलेख

## खरीखरी...

## चीन विश्वसनीय आहे काय?

सध्या आपल्या भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी चीनच्या दौऱ्यावर आहेत. अमेरिकेच्या राष्ट्राध्यक्षांनी आपल्या सोबत उभा दावा मांडल्याने त्याला प्रत्युत्तर म्हणून आपल्याला चीन आणि रशिया यांच्याबरोबर मैत्रीचे संबंध जोपासणे गरजेचे आहे. कारण ज्या ज्या गोष्टींची अमेरिकेला गरज आहे. त्याची निर्यात अमेरिका करतो. त्या त्या वस्तू अमेरिका इतर देशाकडूनही खरेदी करू शकतो. मात्र ज्या वस्तू केवळ चीनच पुरवू शकतो. तिथे मात्र अमेरिकेचे घोडे अडलेले आहे, त्यामुळेच सद्यस्थितीमध्ये चीन सोबत खाजवणे परवडणार नाही. म्हणूनच अमेरिकेने चीनबाबत मवाळ धोरण स्वीकारलेले आहे. आता आपल्याला रशिया बरोबरचे संबंध पुन्हा वाढवावे लागतील. येत्या दहा-अकरा वर्षात आपली अमेरिका दोस्ती आपल्या जुना मित्र असलेल्या रशियाला फारशी मानवली नव्हती. पण तरीही युक्रेन सारख्या युद्धानंतरही अमेरिकेचा दबाव येऊनही आपली मैत्री जी रशिया सोबत होती ती आपण तोडलेली नाही. पूर्वीच्या काळी सर्वच देशांबरोबर आपले चांगले संबंध होते. जगातील सर्वात प्रथम अलिप्ततावादी चळवळीचा म्होरक्या भारतच होता. नासेर, टिटो आणि नेहरू हे त्याच चळवळीचे नेते होते. तरीही अमेरिकेबरोबरचे संबंध कधीच इतके बिघडले नव्हते. ट्रम्प सारख्या लहरी लालाच्या इच्छेनंतर सध्या जे जे सुरू आहे तो एका प्रकारे खूनशीपणा सारखाच प्रकार आहे. त्याला अमेरिकेच्या न्यायालयानेच बेकायदा ठरवलेले आहे. खुद्द अमेरिकेतील न्यायालयाने ज्या गोष्टी बेकायदा ठरविलेल्या आहेत. त्यावर हा लहरी मोहम्मद ट्रम्प जबरदस्त टीका करीत आहे. म्हणजेच ट्रम्पला न्यायालयाची भीती नाही. तो ही स्वतःच्या देशातील न्यायालयाला मानत नाही हेच यावरून सिद्ध होते. आता आपले पंतप्रधान चीन दौऱ्यावर आहेत. भारत आणि चीन जवळपास अगदी स्वतंत्रपणे एकमेकांसोबत मैत्री करत होते. त्यावेळी 'हिंदी चिनी भाई भाई' या घोषणा देऊन झाल्या, त्यानंतर पंचशीलचा उदो उदो केला गेला. ते सगळे झाल्यावर चीनने 1962 साली त्या मैत्रीला हरताळ फासून भारतावर जबरदस्त हल्ला केला आणि भारताची बरीच मोठी जमीन बळकावली. आताही चीनने लडाख भागात आणि अरुणाचल प्रदेशामध्ये आपली मोठ्या प्रमाणात जमीन बळकावलेली आहे. पण आपल्यालाही चीनशी मैत्री करणे आजच्या परिस्थितीत गरजेचे आहे. पंतप्रधान मोदी आणि त्यांचे शिष्टमंडळ यातून कसा मार्ग काढतात यावर चीनची मैत्री अवलंबून आहे. आजपर्यंत ज्या ज्या लोकांनी चीनवर विश्वास ठेवला. त्यांचा विश्वासघात चीनने केला आहे. कोणालाही हा अनुभव कधीच सुखद ठरला नाही. प्राप्त परिस्थितीमध्ये जे काही समोर वाढलेले आहे, त्या परिस्थितीमध्ये भारताला चीनवर भरवसा ठेवणे हाच एक मार्ग उरला आहे. आपण त्यांच्या चांगल्या परिणामांची आशा करूया. तरीही आमचा प्रश्न हाच आहे की चीन विश्वसनीय आहे काय?

nagpurpost@gmail.com
Mob. No. 9922970023

### सुप्रिया सुळेंच्या गाडीवर फेकल्या पाण्याचा बाटल्या

# आंदोलक आक्रमक!

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१ :

राष्ट्रवादी काँग्रेस शरद पवार गटाच्या खासदार सुप्रिया सुळे यांनी मनोज जरांगे पाटील यांची आझाद मैदानावर जात भेट घेतली. यावेळी मनोज जरांगे यांची प्रकृती अत्यंत खराब झाली असल्याचे पाहायला मिळाले. मनोज जरांगे यांनी गेल्या चार दिवसांपासून काही खाल्ले नसल्याने त्यांची प्रकृती खराब झाली असल्याचे सुळे यांनी सांगितले आहे.



माध्यमांशी बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, मनोज जरांगे पाटील यांनी गेल्या चार दिवसांपासून काहीही खाल्ले नसल्याने खूप जास्त वीकनेस आला आहे. मी त्यांना म्हणाले की उठू नका आणि तब्येतीची काळजी घ्या. तसेच येथे स्वच्छतेचा मोठा प्रॉब्लेम येत असल्याची तक्रार जरांगे यांनी केली आहे. त्यामुळे येथील बीएमसीला सांगून येथील स्वच्छतेचे काम करण्यात यावे. त्यानुसार मी आयुक्तांना बोलणार आहे, अशी माहिती सुळे यांनी दिली आहे.

पुढे बोलताना सुप्रिया सुळे म्हणाल्या, माझी मुख्यमंत्री आणि दोन्ही उपमुख्यमंत्र्यांना मुख्यमंत्र्यांना विनम्र विनंती आहे की सर्वपक्षीय बैठक बोलावण्यात यावी. तसेच पाहिजे असेल तर लगेच एक दिवसाचे अधिवेशन बोलवा आणि हा निर्णय मार्गी लावा. मनोज जरांगे पाटील यांच्या मागणीला कोणाचाच विरोध नाही, मग मुख्यमंत्र्यांना काय अडचण आहे? असा सवाल सुप्रिया सुळे यांनी केला आहे.

देवेंद्र फडणवीस जेव्हा विरोधी पक्षनेते होते तेव्हा त्याचे वाक्य होते आमचे सरकार आल्यावर मराठा समाजाला आरक्षण देऊ, आता काय झाले. एवढे मोठे बहुमत दिले आहे महायुतीला तर देऊन टाकायला पाहिजे आरक्षण.

लोकशाही आहे आणि आम्ही हुकुमशाही होऊ देणार नाही. चर्चेला आम्ही सगळे तयार आहोत. सगळ्यांना बोलवा आणि मार्ग काढावा. ११ वर्षे झाले सत्ता आहे तर मराठा आरक्षण देऊन दाखवावे, असे आव्हान सुळे यांनी केले आहे.

मनोज जरांगे पाटील यांची भेट घेतल्यानंतर पत्रकारांशी संवाद साधल्यानंतर सुप्रिया सुळे निघून जात असताना मराठा आंदोलक आक्रमक झाल्याचे पाहायला मिळाले. तसेच सुप्रिया सुळे यांच्या गाडीवर देखील पाण्याच्या बाटल्या फेकण्यात आल्याचा प्रकार यावेळी घडला. शरद पवारांनी मराठ्यांचे वाटोळे केले असा आरोप सुद्धा यावेळी आंदोलकांनी केला.

### सैनिकांच्या माघारीमुळे

# सीमेवर शांतता



■ वृत्तसंस्था, बीजिंग, दि. ३१ :

सात वर्षांनी चीनला पोहोचलेले पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी आज राष्ट्राध्यक्ष शी जिनपिंग यांची भेट घेतली. दोघांमध्ये ५० मिनिटे चर्चा झाली. संभाषणादरम्यान मोदी म्हणाले-

गेल्या वर्षी कझानमध्ये आमच्यात खूप उपयुक्त चर्चा झाली, ज्यामुळे आमचे संबंध सुधारले. सीमेवरून सैन्य मागे घेतल्यानंतर शांतता आणि स्थिरतेचे वातावरण निर्माण झाले आहे. विशेष प्रतिनिधींनी सीमा प्रश्नावर एक करार केला आहे. कैलास मानसरोवर यात्रा पुन्हा सुरू झाली आहे आणि दोन्ही देशांमधील थेट उड्डाणे देखील पुन्हा सुरू होत आहेत.

चीनच्या राष्ट्राध्यक्षांनी सांगितले की, भारत आणि चीनने एकत्र येणे महत्त्वाचे आहे. भारत आणि चीनमधील सहकार्यामुळे २.८ अब्ज लोकांना फायदा होईल आणि त्यामुळे संपूर्ण मानवतेच्या कल्याणाचा मार्ग मोकळा होईल, असेही मोदी म्हणाले. परस्पर विश्वास आणि आदराच्या आधारावर संबंध पुढे नेण्याची वचनबद्धता त्यांनी व्यक्त केली.

जपानच्या २ दिवसांच्या दौऱ्यानंतर मोदी शनिवारी संध्याकाळी चीनमध्ये पोहोचले. या भेटीचा उद्देश दोन्ही देशांमधील सीमा वाद कमी करणे हा देखील आहे. मोदी आज तियानजिन शहरात शांघाय सहकार्य संघटनेच्या (एससीओ) बैठकीत सहभागी झाले. र

## एकतर विजयी यात्रा, नाहीतर अंत्ययात्रा..

### मनोज जरांगे ठाम : वेळकाढूपणा सुरू असल्याचा आरोप

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१ :

सुप्रिया सुळे यांच्या गाडीवर हल्ला केल्यानंतर मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आंदोलकांना खडसावले आहे.

यावेळी बोलताना जरांगे यांनी म्हटले की सन्मान दिला नाही तर नेते आंदोलनस्थळी यायला घाबरतील. सन्मानाने येऊ द्या आणि सन्मानाने पाठवा, ही जबाबदारी तुमच्यावर आहे. यावेळी बोलताना मनोज जरांगे पाटील यांनी महायुती सरकार तसेच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर पुन्हा एकदा हल्लाबोल केला आहे. एकतर विजयी यात्रा नाहीतर माझी अंत्ययात्रा निघेल, असेही यावेळी जरांगे म्हणाले.



राधाकृष्ण विखे पाटील यांनी घेतलेल्या बैठकीवर देखील मनोज जरांगे यांनी भाष्य केले, ते म्हणाले, सुप्रीम कोर्टाचा सरसकटला विरोध असण्याचे कारण नाही. पण कोर्टात अडचण असेल तर मराठा कुणबी ही उपजात आहे असे करा, सरसकट म्हणू नका. २०१२ च्या कायद्यानुसार मराठा आणि कुणबी पोटजात म्हणून घ्या सरसकट म्हणायची गरज नाही. सरकारला आता एकही कागदपत्र देणार नाही. सरकारने हैदराबाद गॅझेटकडून कागदपत्रे घेतले आहे. मराठवाड्यातला मराठा हा कुणबी आहे हे सिद्ध झाले आहे. राज्य मागासवर्ग आयोगाकडून ते घेणे गरजेचे असल्याचे ते म्हणाले.

### फटाक्याच्या कारखान्यात स्फोट

## मालक व पत्नीसह चौघे ठार

■ वृत्तसंस्था, लखनौ, दि. ३१ :

रविवारी सकाळी लखनौमधील एका फटाक्याच्या कारखान्यात स्फोट झाला. या अपघातात कारखाना मालक आणि त्याच्या पत्नीसह चार जणांचा मृत्यू झाला. स्फोटानंतर संपूर्ण इमारत कोसळल्याने मृतांचा आकडा वाढू शकतो. ढिगाऱ्याखाली अनेक लोक गाडले गेल्याचे सांगितले जात आहे.

डीएम-कमिशनर घटनास्थळी पोहोचले आहेत. पोलिसांचे पथक ढिगाऱ्याखाली दबलेल्या लोकांना बाहेर काढत आहेत. स्फोट इतका भीषण होता की जवळपासची २-३ घरेही कोसळली. यामुळे सुमारे १० जण जखमी झाले आहेत.

घटनास्थळी गोंधळाचे वातावरण आहे. पोलिस येण्यापूर्वीच स्थानिक लोकांनी जखमींना रुग्णालयात नेले. बाराबंकीहून अग्निशमन दलाच्या पथकेही पोहोचली आहेत. जिल्हा मुख्यालयापासून २० किमी अंतरावर असलेल्या गुडांबा पोलिस स्टेशन हद्दीतील बेहटा येथे हा अपघात झाला.

स्फोटानंतर, कारखान्यातील लोक मृतदेहांमध्ये रूपांतरित झाले. मृतदेह कारखान्याच्या बाहेर खूप दूर विखुरलेले होते. घटनास्थळी पोलिस आणि अग्निशमन दलाचे पथक बचावकार्य करत आहेत.

सुमारे एक हजार लोक घटनास्थळी पोहोचले आहेत. जखमींना रुग्णवाहिकेतून नेले जात आहे. सुरुवातीच्या तपासाच्या आधारे पोलिसांनी सांगितले की, ही फटाके बनवण्याची फॅक्टरी बेकायदेशीर होती. ती निवासी भागात चालत होती. रविवारी दुपारी १२ वाजता हा स्फोट झाला. काही लोक असेही म्हणत आहेत की सिलिंडरचा स्फोट झाला. सध्या संपूर्ण लक्ष बचावकार्यावर आहे. ढिगाऱ्यात सापडलेले दोन मृतदेह गंभीरपणे जळालेले आहेत. ढिगाऱ्याखाली आणखी अनेक जण अडकल्याची भीती आहे.

## मराठा समाजाला आरक्षण देण्यास शासन प्रयत्नशील



### ओबीसीच्या आरक्षणाला धक्का लागणार नाही

■ महासागर प्रतिनिधी
नागपूर, दि. ३१ :

आझाद मैदानावर मराठा आरक्षणासाठी शुक्रवार पासून सुरू झालेल्या मनोज जरांगेच्या आंदोलनाचा आज तिसरा दिवस असून सरकार मराठा समाजाला आरक्षण मिळण्यासाठी राज्य सरकार सकारात्मक आहे. अशी माहिती राज्यमंत्री पंकज भोयर यांनी पत्रपरिषदेत दिली.


मराठा समाजाला अन्नासाहेब पाटील आर्थिक महामंडळ युवकांसाठी रोजगाराच्या संधी उपलब्ध करून दिल्या. आझाद मैदानावर सुरू असलेल्या मराठा समाजातील आरक्षणाला ओबीसीच्या आरक्षणाला कसलाही धक्का न लावता मराठा समाजाला आरक्षण कसे देता येईल यासाठी सरकार प्रयत्नात आहे. ऐवढे मोठे आंदोलन सुरू असल्यामुळे ओबीसी समजात धाकधुक सुरू आहे. त्यामुळे नागपुरात सुद्धा ओबीसींचे साखळी आंदोलन सुरू आहे.

विखे पाटील यांच्या नेतृत्वात मराठा आरक्षण सुरू झाले आहे यावर सकारात्मक चर्चा करून आरक्षण देण्यात येईल. दहा टक्के आरक्षण मराठा समाजाला आहे. मराठा आरक्षणासाठी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी युवकांसाठी रोजगारांच्या नवीन संधी उपलब्ध करून दिल्या आहेत असेही त्यांनी पत्रकारांना सांगितले. शासनाच्यावतिने मराठा समाजाच्या कल्याणासाठी उपाययोजना करण्यात आल्याचे ते म्हणाले.

पत्रपरिषदेला आ. कृष्णा खोपडे, प्रवीण दटके, समीर मेघे, रामदास तडस, माजी खासदार सुनील मेंढे, माजी आमदार सुधाकर कोहळे आदी नेते उपस्थित होते.

## जरांगेंच्या आक्रमणावर भुजबळांचा पलटवार?

■ महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१ :



मराठा आरक्षणाच्या प्रश्नाने राज्य पेटलं आहे. आझाद मैदानावर मनोज जरांगे आमरण उपोषणावर बसले असून त्यांची ठाम मागणी आहे ह्लसरसकट मराठा समाजाला ओबीसीतूनच आरक्षण हवं!ह्व सरकारच्या अनेक प्रयत्नांनंतरही चर्चा निष्फळ ठरली. या मागणीला काही आमदार, खासदारांचा पाठिंबा मिळत असताना ओबीसी समाजात मात्र तीव्र अस्वस्थता पसरली आहे.

या पार्श्वभूमीवर मंत्री छगन भुजबळ मैदानात उतरले आहेत. भुजबळ यांनी तातडीचा आदेश काढत राज्यातील ओबीसी नेत्यांची बैठक बोलावली आहे. ओबीसी संघटना आधीच सज्ज होत असून नागपूरमध्ये साखळी उपोषण सुरू झाले आहे. जालन्यात तर १ सप्टेंबरपासून मोठ्या उपोषणाची तयारी सुरू आहे. त्यामुळे जरांगे यांच्या आंदोलनाला तोडीस तोड लढा द्यायचा की समझोत्याचा मार्ग शोधायचा, याबाबत भुजबळ यांची पुढील भूमिका काय असेल, याकडे राज्याचे लक्ष लागले आहे. मराठा-ओबीसी संघर्षाचा हा नवा टप्पा आता महाराष्ट्राच्या राजकीय समीकरणांना धक्का देणारा ठरू शकतो.

## भटक्या विमुक्त समाजासाठी महत्त्वाचा निर्णय

### दाखले आणि प्रमाणपत्रांसाठी स्वतंत्र समिती स्थापणार

■ वृत्तसंस्था
छ. संभाजीनगर, दि. ३१ :

छत्रपती संभाजीनगर येथे भटके विमुक्त दिवस उत्साहात साजरा करण्यात आला. १९५२ साली भटक्या विमुक्त समाजावरील गुन्हेगारी जमातीचा कलंक दूर करण्यात आला होता. त्याची स्मृती म्हणून हा दिवस साजरा करण्याचा निर्णय राज्य शासनाने घेतला आहे.

इतर मागासवर्ग बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी भटक्या विमुक्त जाती-जमातींसाठी महत्त्वाची घोषणा केली. विविध दाखले आणि प्रमाणपत्रे मिळविण्यात येणाऱ्या अडचणी दूर करण्यासाठी स्वतंत्र समिती स्थापन करण्यात येणार आहे.



एमजीएम विद्यापीठाच्या रुख्मिणी सभागृहात आयोजित कार्यक्रमात सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी समाजाला आश्वासन दिले. शिक्षणाच्या माध्यमातून प्रगती साधण्याचे आवाहन त्यांनी केले.

मंत्री सावे यांनी शासनाच्या विविध योजनांची माहिती दिली. राज्यात ६३ वसतिगृहे बांधण्यात आली आहेत. शालेय ते महाविद्यालयीन शिक्षण, परदेशी शिक्षण आणि रोजगारासाठी विविध योजना सुरू आहेत.

कार्यक्रमाला राज्यसभा सदस्य डॉ. भागवत कराड, इमाव संचालनालयाच्या संचालक सोनाली मुळे, अपर जिल्हाधिकारी संभाजीराव अडकुणे यांच्यासह अनेक मान्यवर उपस्थित होते.

पालकमंत्री शिरसाट यांनी भटक्या जमातींना शिक्षणाकडे लक्ष देण्याचे आवाहन केले. उच्च पदांवर जाऊन समाजबांधवांना मदत करण्याचे आणि प्रगतीसाठी निर्धार करा, शिक्षणातून प्रगती साध्याचे आवाहन त्यांनी केले.

## इंडोनेशियामध्ये विधिमंडळांना लावली आग

### नेत्यांच्या भत्तावाढीवरून संताप; तिघांचा मृत्यू, २५ पोलिस जखमी

■ वृत्तसंस्था, जकार्ता, दि. ३१ :

इंडोनेशियात लोकप्रतिनिधींना दिल्या जाणा?या मोठ्या भत्त्यांवर लोकांमध्ये संताप आहे. २१ वर्षीय एका डिलिव्हरी बॉयच्या मृत्यूनंतर आंदोलन तीव्र झाले.

इंडोनेशियाच्या दक्षिण सुलावेसी राज्याची राजधानी माकास्सरमध्ये शुक्रवारी रात्री उशिरा आंदोलकांनी स्थानिक विधिमंडळ भवनाला आग लावली. या घटनेत ३ ठार ५ जखमी झाले. आणखी दोन राज्यांतही विधिमंडळ इमारतीला आग लावल्याची माहिती आहे. खासदारांना मिळणाऱ्या ५० लाख रुपिया(३,०७५ डॉलर) मासिक निवास भत्त्यामुळे जकार्तामध्ये सोमवारपासून आंदोलन सुरू झाले. हा भत्ता गेल्या वर्षी सुरू झाला होता.



मकास्सरच्या घटनेनंतर संपूर्ण देशात आंदोलन तीव्र झाले. मेदान, सोलो, योग्याकार्ता, मागेलांग, मालंग, बेंगकुलू, पेकनबारू आणि पापुआ क्षेत्रातील मानोकवारीसारख्या शहरांतही पोलिस आणि आंदोलकांत चकमक उडाली. नॅशनल ह्यूमन राइट्स कमिशननुसार, फक्त जकार्तामध्ये गुरुवारपर्यंत ९५१ आंदोलकांना अटक केली. दुसरीकडे, २५ पोलिस गंभीर जखमी आहेत. कमिशननुसार, जखमी होणा?यांची संख्या यापेक्षा जास्त आहे.

पश्चिम जावाच्या बांडुंग शहरातही आंदोलकांनी विधिमंडळ भवनाला आग लावली. मात्र, तेथे कुणी जखमी, मृत झाल्याचे वृत्त नाही. देशातील दुसरे सर्वात मोठे शहर सुराबायामध्ये आंदोलकांनी पोलिस मुख्यालयावर हल्ला केला. तेथील वाहनांना आग लावली.

## तुम्ही गांधींना मारलं, तुकारामांना मारलं आता जरांगेंनाही मारणार का?



**मुंबई :** राष्ट्रवादी काँग्रेस (शरद पवार गट) च्या ओबीसी सेलचे प्रदेशाध्यक्ष राज राजापूरकर यांनी भाजप आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्यावर जोरदार टीका केली आहे. मराठा-ओबीसी, हिंदू-मुस्लिम वाद वाढला पाहिजे ही भाजपची भूमिका आहे, असा गंभीर आरोप त्यांनी केला आहे.

राज राजापूरकर म्हणाले की, तुम्ही गांधींना मारले, तुकारामांना मारले, आता तुम्हाला जरांगे यांना मारायचे आहे का? असा सवाल करत त्यांनी आंदोलनाला अप्रत्यक्ष पाठिंबा दर्शवला आहे. त्यांनी मुख्यमंत्र्यांवर टीका करताना म्हटले की, "मुख्यमंत्र्यांनी सर्वांचा मुख्यमंत्री व्हावे, फक्त भाजपचा नाही. समाजात दंगली घडवण्याचे काम आता व्हायला नको.

ते म्हणाले की, मी देशाचा नागरिक आहे. म्हणून मनोज जरांगे यांच्या तब्येतीची विचारपुस करायला, भेटायला गेलो होतो, मात्र याचा चुकीचा अर्थ घेत ओबीसी मराठ्यांच्या भेटीला, असे वाद लावले जात आहेत. भाजपला हेच पाहिजे आहे.

मराठा समाजाला आरक्षण मिळालेच पाहिजे. सरकारने यावर निर्णय घ्यायचा आहे. मुख्यमंत्र्यांनी हातात बांगड्या तर भरल्या नाहीत ना? असा खोचक सवाल राजापूरकर यांनी केला आहे. एकनाथ शिंदे किंवा अजित पवार नाराज झाल्यावर ते मोदींकडे जातात, मग आता मराठा समाज नाराज असताना त्यांची अडचण का सोडवत नाहीत, असा प्रश्नही त्यांनी उपस्थित केला.

## मविआचा केवळ वरवरचा पाठिंबा



**मुंबई :** राज्यात मराठा आरक्षणावरून सुरू असलेल्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर भाजपचे प्रवक्ते केशव उपाध्ये यांनी महाविकास आघाडीवर सडकून टीका केली आहे.

उपाध्ये यांनी म्हटले की, मविआ पक्ष केवळ वरवरचा पाठिंबा दर्शवून मराठा समाजाच्या भावनांचे राजकारण करत आहेत. समाजात मराठा-ओबीसी तेढ निर्माण करण्याचे कट कारस्थान सुरू असून, यामागे सत्तेच्या हव्यासापोटी राज्याला वेठीस धरण्याचा प्रयत्न आहे. मराठ्यांसाठी स्वतंत्र आणि कायदेशीर आधार असलेलं आरक्षणच योग्य असून, इतर समाजांचे अधिकार काढून देणे सामाजिक समतेला बाधा आणणारे ठरेल, विरोधकांची भूमिका ढोंगी व दिशाभूल करणारी असल्याचा आरोपही केला.

केशव उपाध्ये म्हणाले की, ही तर महाराष्ट्राची कोंडी, मूठभर इंग्रजांनी भारतावर सत्ता गाजविण्यासाठी फोडा व राज्य करा या नीतीचा उपयोग करीत शेकडो वर्षे इथल्या एकसंघ समाजावर राज्य केले. आज मविआतील मूठभर पक्ष याच कूटनीतीचा उपयोग करून गमावलेले मत व गेलेली पत मिळवण्याच्या प्रयत्नातून केवळ सरकारचीच नव्हे, तर मतांच्या राजकारणासाठी महाराष्ट्राची कोंडी करत आहेत. सत्तेच्या हावरटपणा पायी राज्याला वेठीस धरण्याचे विरोधकांचे भान आणि सोयरसुतक संपले आहे हेच यातून दिसते.

उपाध्ये म्हणाले की, लोकशाहीत न्याय्य मागण्यांसाठी आंदोलन करायचा पूर्ण अधिकार आहे व सरकारही जरांगेशी सकारात्मक भावनेने संवाद साधत आहेच.

## मराठा समाजासाठी जितकी शक्य तितकी काम केली



**मुंबई :** मराठा समाजासाठी अनेक विषयावर कामे झाली आहेत. मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्या आहेत त्या आपल्या समोर आहे. त्यांना थेट ओबीसी मधून आरक्षण मिळायला हवे, असे मंत्री दादा भुसे म्हणाले.

एकनाथ शिंदे यांनी मराठा आरक्षणासंदर्भात आपली भूमिका स्पष्ट केली आहे. देवेंद्र फडणवीस यांच्या सरकारच्या काळात मराठा समाजाला 16 टक्के आरक्षण देण्याचा निर्णय झाला होता. दुर्दैवाने मविआच्या सरकारला ते आरक्षण टिकवता आले नाही. यानंतर मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांनी आंदोलन केले. यावेळी एकनाथ शिंदेंनी शब्द दिल्या प्रमाणे समाजाला 10 टक्के आरक्षण देण्यात आले आहे. तथापि, काही बाबी सरसकट होवू शकत नाही, कायद्याच्या चौकटीत बसवूनच काही निर्णय घ्यावे लागतात, असे ते म्हणाले.

# राज ठाकरे कुचक्या कानाचे...

## 'राज' टीकेला जरांगेंचे सडेतोड उत्तर : चंद्रकांत पाटील यांच्यावरही सडकून टीका

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१:** मराठा आरक्षणासाठी मुंबईत ठाण मांडून उपोषण करणारे मनोज जरांगे यांनी मनसे प्रमुख राज ठाकरे यांच्यावर सडकून टीका केली आहे. मनोज जरांगे म्हणाले की, मी मराठा समाजाला आरक्षण मिळेपर्यंत मुंबई सोडणार नाही. पण तुम्ही कायदा हातात घेऊ नका. मराठा प्रश्नाबद्दल राज ठाकरेंनी बोलू नये. ते मराठवाड्यात का येतात, नाशिकमध्ये का जातात आम्ही विचारले का? राज ठाकरे कुचक्या कानाचे आहेत. फडणवीस त्यांच्या घरी जाऊन चहा पिले की इकडे पक्ष संपला तरी त्यांना काही फरक पडत नाही. दोन्ही ठाकरे बंधू चांगले आहेत.



मनोज जरांगेंच्या आंदोलनावर प्रतिक्रिया देताना राज ठाकरे यांनी सरळसरळ एकनाथ शिंदेंना जबाबदार धरून त्यांना कोंडीत पकडण्याचा प्रयत्न केला होता. यावर बोलताना मनोज जरांगे यांनी राज ठाकरेंवर टीका करत त्यांचा समाचार घेतला. स्वतःचं पोरगं निवडणुकीत पाडलं. कधीपर्यंत भाजपची री ओढणार आहात? असा खडा सवाल मनोज जरांगे यांनी राज ठाकरेंना केला.

"मराठा आरक्षणाबाबतची सगळी उत्तरे मुख्यमंत्री एकनाथ शिंदेच देतील. मनोज जरांगे पुन्हा का आंदोलनाला बसले, हे देखील त्यांनाच विचारा," असे म्हणत राज ठाकरेंनी सरळसरळ एकनाथ शिंदेंनाच जबाबदारीच्या कात्रीत पकडले. मात्र, राज ठाकरेंच्या या वक्तव्याचा मनोज जरांगे यांनी चांगलाच समाचार घेतला.

मनोज जरांगे म्हणाले, तुम्हाला आम्ही काही विचारले का? मग तुम्ही आम्हाला का सल्ला देताय? तुम्ही भाजपकडे गेला, पाठिंबा दिला आणि परत काढून घेतलात. आम्ही 11 आमदार दिले तेव्हा आम्ही म्हटले का, मराठवाड्यात येऊ नका? मग तुम्हीही आम्हाला कशाला विचारताय? अशी प्रश्नांची सरबत्ती मनोज जरांगेंनी राज ठाकरेंवर केली.

ते पुढे म्हणाले, केव्हापर्यंत भाजपची री ओढणार? स्वतःच्या ठाकरे ब्रँडचे नुकसान करून घेतलेत. स्वतःचं पोरगं निवडणुकीत पडलं. हुशार राजकारणी आहात, डोके लावून वागा; नाहीतर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस तुम्हाला संपवून टाकतील. त्यांच्या घरी जेवण झाले की तुमचा कार्यक्रम ठरतो, हे लोक समजतात. पण गरीब मराठ्यांना सगळे कळते. निवडणुका लागल्या की तुम्हाला जवळ धरतात, मतदान झाले की दूर लोटून देतात.

नगरपालिका निवडणुका जवळ आल्याचा उल्लेख करत जरांगे पुढे म्हणाले, आता ठाकरेबंधू एकत्र आलेत, म्हणून ते भयभीत झालेत. त्यामुळे तुम्ही पुन्हा मुख्यमंत्री फडणवीसांच्या घरी जाऊन जेवायला गेलात. तुम्हाला वाटते तुम्ही फार हुशार आहात, पण त्यामुळे तुमचा पक्ष खड्ड्यात गेलाय. आता मराठा समाज तुम्हाला समजून घेतो आहे, अशा शब्दांत त्यांनी राज ठाकरे यांच्यावर बोचारी टीका केली.

**पाटील यांना काही समजत नाही**

मनोज जरांगे पाटील म्हणाले की, चंद्रकांत पाटील यांना काही समजत नाही. त्यामुळेच त्यांना उपसमितीवर ठेवले नाही. चंद्रकांत पाटील यांनी शांत रहावे, मराठ्यांच्या शिव्या खावू नये. समाजाबद्दल चुकीचे बोलले तर त्यांचा गेमच वाजवेल, असा इशारा जरांगे पाटील यांनी दिला आहे. शनिवार, रविवारी मुंबईत गर्दी वाढू शकते हे सरकारने लक्षात ठेवावे.

दरम्यान, मनोज जरांगे यांच्या आंदोलनामुळे मुंबईत अव्यवस्थेची स्थिती असून, सरकारचीही गोची झाली आहे.

## जरांगेंच्या मागण्यांवर कायदेशीर तपास सुरू

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१:** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी आंदोलन करत असलेले मनोज जरांगे पाटील यांच्या मागण्यांवर सरकार गांभीर्याने विचार करत आहे, असे भाजप नेते राधाकृष्ण विखे पाटील यांनी सांगितले.

हैदराबाद आणि सातारा गॅझेटिअरची तातडीने अंमलबजावणी करण्याची जरांगे यांची मागणी असून, त्यातील कायदेशीर त्रुटी तपासण्याचे काम सुरू आहे. यावर तोडगा काढण्यासाठी मंत्रिमंडळ उपसमितीची बैठक झाली, अशी माहिती विखे पाटील यांनी दिली.

विखे पाटील यांच्या माहितीनुसार, सरकारने गोळा केलेल्या पुराव्यांमध्ये आपल्याला जे काही सॅम्पल आपल्याल मिळालेत, ती संख्या मिळाली आहे. त्यात नावे नाहीत. यावर कायदेशीर मार्गदर्शन घेण्यासाठी सायंकाळी ५ वाजता राज्याच्या ॲडव्होकेट जनरल यांच्यासोबत बैठक होणार आहे. या बैठकीनंतरच मनोज जरांगे यांच्यासमोर अंतिम प्रस्ताव मांडला जाईल, असे त्यांनी सांगितले.

सध्याच्या टप्प्यात मनोज जरांगे यांना भेटण्याचा कोणताही निर्णय घेण्यात आलेला नसल्याचे त्यांनी सांगितले. समितीच्या सदस्यांचा आज मनोज जरांगेची भेट घेण्याचा प्रश्न नाही. कारण त्यांनी मुद्दे उपस्थित केलेत. मी जी मागणी केली, त्यासंदर्भात तुम्ही काय निर्णय घेतला याबद्दल ते विचारणा करतील.



त्यामुळे आता समितीचे सदस्य, ॲडव्होकेट जनरल यांच्याशी संपूर्ण चर्चा करून अंतिम प्रस्ताव मनोज जरांगेंसमोर मांडण्यात येईल, असे विखे पाटील म्हणालेत.

**आंदोलकांना सहकार्य करा**

माझी मुंबईकरांना विनंती आहे, मराठा समाजाच्या आंदोलनाला सहकार्य केले पाहिजे. मुंबईकरांना त्रास होतो ही गोष्ट सर्वश्रुत आहे. पण तो त्रास जाणीवपूर्वक नाहीये. विशिष्ट मागण्यांसाठी आंदोलन होत आहे. मराठा आंदोलक सुद्धा जनतेला कोणत्याही प्रकारची असुविधा होणार नाही, यासंदर्भात दक्षता घेईल, असे मला वाटते.

मनोज जरांगे यांनी देखील आंदोलकांना कुठलाही अनुचित प्रकार न करण्याचे आवाहन केले आहे. आंदोलकांनीही जरांगेंच्या आव्हानाला प्रतिसाद देत शिस्तबद्ध आंदोलन सुरू ठेवलेले आहे, असेही राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले.

**राजकीय पोळी भाजतायेत**

शरद पवारांच्या विधानावर बोलताना राधाकृष्ण विखे पाटील म्हणाले, मला शरद पवारांचे नेहमीच आश्चर्य वाटते. ते राज्याचे चार वेळा मुख्यमंत्री होते. 1994 साली मंडल आयोगाची अंमलबजावणी करताना मराठा समाजाचा आंतरभाव करावा, हे त्यांच्या का लक्षात आले नाही? दहा वर्ष केंद्रात मंत्री होते. त्यावेळी केंद्रात आणि राज्यात युपीएचे सरकार होते. घटनेत बदल करून आरक्षण देऊ शकतो, हे त्यांना दहा वर्षांत लक्षात आले नाही का? मराठा समाजाची आरक्षणाची मागणी जुनी आहे. स्वतःकडे जबाबदारी असताना ती पूर्ण केली नाही. आज ते आपली राजकीय पोळी भाजत असल्याचे विखे पाटील म्हणाले.

## मराठा समाजाला ओबीसी आरक्षण देणे कायदेशीरदृष्ट्या अशक्य : पाटील

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१:** मराठा आरक्षणाच्या प्रश्नावर मनोज जरांगे पाटील यांनी मुंबईत उपोषण सुरू केले असताना, भाजप नेते चंद्रकांत पाटील यांनी मराठा समाजाला ओबीसीतून आरक्षण देणे शक्य नसल्याचे सांगितले आहे. तसेच, त्यांनी जरांगे यांच्या आंदोलनावर आणि विरोधी पक्षांच्या भूमिकेवरही टीका केली आहे.



चंद्रकांत पाटील म्हणाले की, मराठे हे सामाजिक मागास नाहीत. मराठ्यांना दलितांसारखी अस्पृश्यतेची वागणूक मिळालेली नाही, असे ते म्हणाले. त्यांनी एहर आरक्षणालाच मराठा समाजाचे खरे आरक्षण म्हटले. एखाद्या जातीला मागास ठरवण्याचा अधिकार केवळ मागासवर्गीय आयोगाला आहे, तो शिंदे समितीला नाही, असे स्पष्ट करत त्यांनी आंदोलनाच्या कायदेशीर बाबींवर प्रश्नचिन्ह उपस्थित केले.

चंद्रकांत पाटील म्हणाले की, कायदेशीरदृष्ट्या ज्याचा दाखला नाही अशा मराठा समाजातील व्यक्तींना ओबीसी मधून आरक्षण मिळणे अशक्य आहे. आता वेळ मारून नेण्यासाठी जरी काही मागण्या मान्य केल्या तरी त्या कायदेशीरदृष्ट्या टिकणा?या नसतील.

पाटील म्हणाले की, पितृसत्ताक पद्धतीनुसार सगेसोयरे हे फक्त वडिलांकडचेच मानले जातात, आणि आता लाखो मराठा बांधवांना कुणबी दाखल्याचा लाभ होत आहे. त्यांनी शरद पवार यांच्या तामिळनाडूच्या उदाहरणावरही टीका केली. तामिळनाडूचे आरक्षण अजूनही सर्वोच्च न्यायालयात प्रलंबित आहे आणि ते टिकणारे नाही, असे पाटील म्हणाले.

आझाद मैदानावर आंदोलनाला परवानगी दिली असतानाही सामान्य मुंबईकरांना वेठीस धरणे चुकीचे आहे. हे आंदोलन राजकीय असून, राजकीय वापर करण्याचा प्रयत्न सुरू असल्याचा आरोपही त्यांनी केला.

## ३७० हटवणारे गृहमंत्री मराठा आरक्षणावर गप्प का?

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१:** केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मुंबईत येऊन काय केले? त्यांनी केवळ मुंबईचा महापौर हा भाजपचा झाला पाहिजे म्हणजे, गुजराती, अमराठी झाला पाहिजे हे भाजपच्या नेत्यांना सांगितले आहे. गृहमंत्री लालबाग च्या राजाकडे जात प्रार्थना करतात की मुंबईचा महापौर हा एक उपरा भाजपचा होऊ देत, असे म्हणत उबाठाचे नेते संजय राऊत यांनी भाजपवर टीकास्त्र डागले आहे.

संजय राऊत म्हणाले की, भर पावसात मराठा समाज बांधव उपोषणाला बसले आहेत. मुंबईतील अनेक भागात मराठा बांधव आल्याने तो परिसर विस्कळीत झाला आहे. काल इथे देशाचे गृहमंत्री अमित शहा येऊन गेले. त्यांच्याबरोबर भाजपचे सर्व लोक उपस्थित होते. इतका गंभीर प्रश्न मुंबईत सुरू आहे. तो प्रश्न केंद्र सरकारशी निगडीत आहे. तर आमची अपेक्षा होती देशाचे गृहमंत्री तिथे जातील आणि दिलासा देतील. तोडगा काढण्याचा प्रयत्न करतील. 370 हटवून काश्मीर प्रश्न जर गृहमंत्री सोडवू शकतात त्यासाठी घटनेत बदल करु शकतात ते गृहमंत्री मराठा समाजाच्या न्याय हक्कासाठी घटनेत बदल करु शकतात. 370 कलम हटवण्याचे श्रेय जसे ते घेतात तसेच हे श्रेय त्यांना घेता आले असते. पण त्यांनी ते केले नाही.

**संजय राऊतांचा परखड सवाल**



संजय राऊत म्हणाले की, मुंबईमध्ये मराठी माणसाचा पराभव होऊ द्या आणि ही मराठी आम्हाला मिळावी ही प्रार्थना करण्यासाठी लालबाग च्या राजाच्या दर्शनाला गेले होते.म्हणून ज्या संख्येने मराठी बांधव मुंबईत जमत आहे त्यांचे आम्ही स्वागत करत आहोत. आम्हाला त्यांचा काहीच त्रास होत नाही. आम्ही त्यांचे स्वागत करु. उद्धव ठाकरेंनी शिवसैनिकांना आवाहन केले आहे, की मराठा बांधवांना जी काही मदत शक्य आहे ती आपण करावी. अमित शहांनी जो प्रकार केला तो अत्यंत क्रुर आहे.

संजय राऊत म्हणाले की, देवेंद्र फडणवीस, एकनाथ शिंदे हे मराठी माणूस नाहीत. ते अमित शहा यांच्या मागे फिरत होते पण त्यांनी मराठा बांधवांसाठी काहीही केले नाही. आमचा पक्ष त्यांच्या सोबत आहे आम्ही त्यांना सर्व काही सहकार्य करू. अमित शहा, देवेंद्र फडणवीस यांचे सरकार मराठी माणसांना मारायला निघाले आहे, अशी टीका त्यांनी केली.

## ओसाड गावची पाटीलकी काय कामाची?

मनोज जरांगे पाटील यांनी परत एकदा मुंबईच्या आझाद मैदानात मराठा समाजाला टिकणारे आरक्षण मिळावे किंवा ओबीसी प्रवर्गात मराठ्यांचा सामावेश करण्यात यावा यासाठीचे आंदोलन सुरू केले आहे. तर दुसरीकडे ओबीसींचे नेते लक्ष्मण हाके आणि विद्यमान मंत्री छगन भुजबळ हे ओबीसी प्रवर्गात मराठ्यांचा समावेश कदापीही करू नये, यावर दटून बसले आहेत.

यामुळे फडणवीस सरकार अडकित्यात सापडले आहे. मराठा समाज मागासलेला असण्याचे मुळ कारणं शेतमालाला योग्य भाव न मिळणे हे आहे.यात कुणबी प्रवर्गाचा पणं समावेश होतो आहे. शेतमालाच्या भावाची तुलना करतांना सोन्याच्या किंमतीचे उदाहरण दिले जाते.

■ मिलिंद गड्डमवार
सामाजिक कार्यकर्ता, मुक्त पत्रकार
राजुरा, जि. चंद्रपूर.
9511215200

सोन्याच्या किंमतीत शंभर पेक्षा अधिक पटीने वाढ झालेली आहे.तर पांढऱ्या सोन्याची (कापसाची) किंमत ही आहे तीथेच आहे.यात मोठ्या प्रमाणात वाढ झालेली नाही.शेती उत्पादनाची किंमत हे केंद्र सरकार ठरवते आहे. जेंव्हाकी शेती मालकाला शेतमालाचा भाव ठरविण्याचा अधिकार असला पाहिजे.

तो नसल्याने त्याची वाट लागलेली आहे. निसर्गावर आधारीत शेती ही ' पिकले तर शेती, नाहीतर माती ' अशी अवस्था आहे. यामुळे शेतकरी आत्महत्येत वाढ झालेली आहे. हे दुर्दैव शेतकऱ्यांच्या नशिबी आलेले आहे. यावर कुठलेही सरकारे उत्तर शोधू शकलेले नाहीत. ही शेतकऱ्यांची विटंबना, प्रतारणा ठरते आहे.

सद्य परिस्थितीत आरक्षणाने भरलेल्या लोकांचेच पोट भरते आहे. यासाठीच आरक्षणाचे सुध्दा वर्गीकरण करण्यात यावे अशी मागणी सुप्रीम कोर्टाने मान्य केलेली आहे. यांस सुध्दा पोट भरलेल्या लोकांचा प्रखर विरोध होतो आहे. आरक्षणाने कायमचा आर्थिक व सामाजिक प्रश्न सुटू शकेल असे वाटत नाही. कारण ही सतत चालणारी एक प्रक्रीया आहे. यामध्ये कालमानानुसार बदल करीत राहणे अपेक्षित आहे. तरच ते पाणी स्वच्छ व वाहते असणार आहे.

शेती परवडत नाही, शेतीतून केवळ कर्जाचेच पीक येते. असे म्हणून चालणार नाही.यासाठी शेतीला उद्योगाचा दर्जा द्यावा लागेल. शेतीचे उत्पन्न करमुक्त असल्याने याचा फायदा मोठ्याप्रमाणावर व्यापारी वर्ग घेतांना आढळून येत आहेत. ते आपल्या शेतातील पीकाचे आकडे फुगवून सांगत आहेत.

यातून कराचा लाभ घेत आहेत. काळा पैसा पांढरा करीत आहेत. तर दुसरीकडे खऱ्या शेतकऱ्याला शेतीत पीक घेणे कठीण झाले आहे. खर्च अधिक आणि उत्पादन कमी होत असल्याने हा व्यवसाय परवडणारा नाही असे ते सांगत आहेत. यातील सत्य समजून घेतले पाहिजे.

आरक्षणामुळे सगळ्या समस्या सुटतील हाच मुळात गोड गैरसमज आहे. यासाठी शेतकऱ्यांच्या उत्थानासाठी उभे राहणे जास्त गरजेचे आहे.आरोग्य आणि शिक्षणाचे सरकारीकरण करणे गरजेचे आहे. त्याची खाजगीकरणाकडे होत असलेली वाटचाल ही आजची खरी चिंतेची बाब ठरत आहे. प्रचंड भ्रष्टाचार फोफावल्यामुळे जास्तीचा पैसा विविध कामांवर खर्च होऊनही कामे मार्गी लागतांना दिसून येत नाहीत.

निकृष्ट दर्जाची कामें केली जात आहेत. शेतीतील गुंतवणुक कमी होत चालली आहे. याचा गैरफायदा मोठ मोठे अदाणी-अंबाणी सारखे उद्योजक हे घेणारच आहेत.कारणं ते निवडणुकीसाठी पैसे पेरतात आणि यातून अमाप पीक घेतात .ही बाब लपून राहिलेली नाही.

जनता आपले मत विकते आहे. याचा अर्थ आपला स्वाभिमान गहाण ठेवते आहे. आपले श्रम हे सत्कारणी लावण्यासाठी आणि कायमचा बंदोबस्त करण्यासाठी शेमालाचा भाव ठरविण्याचा अधिकार शेतकऱ्यांना प्राप्त झाला पाहिजे. तो त्यांचा मुलभूत अधिकार आहे. यावरून प्रचंड मोठे आंदोलन उभे राहिले पाहिजे. केंद्र सरकार हादरले गेले पाहिजे. नाही तर सरकारी नोकरीसाठी आहे त्या शेतीची विल्हेवाट लावून शेतकरी देशोधडीला लागता कामा नये.

ही बाब लक्षात घेऊन पुढील आंदोलनाची वाटचाल ठरवली गेली पाहिजे. शेती प्रश्नावर शेती सबंधाने जे गाढे अभ्यासक असतील त्यांची मदत सरकारने घेतली गेली पाहिजे. शेती अभ्यासक मंडळी यासाठी सहकार्य करण्यास तयार आहेत.आता शेती प्रश्नांवर कायमचा उपाय हवा आहे. मलम पट्टी करून काही कामाची नाही.हे लक्षात घेतले पाहिजे.

पुढे चालून एआयचा जमाना येतो आहे. सर्वकाही एआय करते आहे. मानवप्राणी हा फक्त आदेश देईल तसे काम एआय न थकता, न कंटाळता करीत राहील. तेही पध्दशीरपणे ! यामुळे मानवी श्रमाची बचत होणार आहे. यांत्रिकीकरणाला चालना मिळणार आहे. मग तिथे कुठे आले आरक्षण ?

आता शेतकऱ्यांच्या पोरांनी नवीन आधुनिक तंत्रज्ञान अवगत करून फुड आणि पॅकेजिंग उद्योग धंद्याकडे स्वतःहून वळणे गरजेचे झाले आहे. पॅकींग सामुग्रीवर कुठली किंमत लिहीली जाते याचे कुठलेही मोजमाप नाही. याचाच फायदा व्यापारी वर्ग उचलत आहेत.

सद्य परिस्थितीत ' मेहनत करें मुर्गा (शेतकरी) अंडा खाये फकीर (व्यापारी) ' अशी गत झाली आहे. हे दुष्टचक्र बदलले गेले पाहिजे. तरच शेतकऱ्यांच्या पोरांना सुगीचे दिवस येवू शकतील. आरक्षणामुळे काही जणांच्याच परिस्थितीत थोडाबहूत फरक पडू शकतो. परंतु व्यवहार ज्ञान आत्मसात केल्याने संपुर्ण शेतकऱ्यांच्या परिस्थितीत बदल घडून येऊ शकतो. पहा पटते काय ते ?

एआय तंत्रज्ञानाचा वापर कठीण ठिकाणी, जिथे मृत्यूला सामोरे जावे लागते अश्या ठिकाणी झाला पाहिजे. जास्तीत जास्त ठिकाणी मनुष्यबळाचा वापर करण्याचा कायदा पास झाला पाहिजे.तरच या सुशिक्षीत बेरोजगारांच्या हातांना, डोक्यांना काम, रोजगार उपलब्ध होऊ शकणार आहे. असे घडून आले नाही तर ती ओसाड गावची पाटीलकीच ठरणार आहे. हे विसरून चालणार नाही.

■ ■ ■

# मराठा आंदोलकांनी भरले सीएसएमटी स्थानक



## दिवसभर आंदोलनात लढा, रात्री फलाटावर विश्रांती, मिळेल तेथे भाकर तुकडा

■ **महासागर प्रतिनिधी, मुंबई, दि. ३१ :** मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे आझाद मैदानावर उपोषणाला बसले आहेत. त्यांच्या आंदोलनाचा शनिवार हा दुसरा दिवस होता. मनोज जरांगे यांना पाठिंबा देण्यासाठी राज्यभरातील लाखो मराठा समाजबांधव मुंबईत दाखल झाले आहेत.

आपल्या न्याय्य हक्कासाठी ते मुंबईत शांततापूर्ण मार्गाने आंदोलन करत आहेत. मुंबईत दाखल झालेल्या हजारो आंदोलकांनी रात्री सीएसएमटी (छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस) रेल्वेस्थानकावर मुक्काम ठोकला आहे. दिवसभर विविध ठिकाणी आंदोलनात सहभागी झाल्यानंतर थकलेल्या आंदोलकांनी फलाट क्रमांक 3 आणि 4 वर आरामाची आणि झोपण्याची व्यवस्था केली आहे.

आंदोलकांनी आपल्या न्याय्य हक्कांसाठी लढताना, दिवसभर शांततापूर्ण मार्गाने आंदोलन केले. त्यानंतर, आता त्यांनी रेल्वेस्थानकावरच आपले तात्पुरते निवासस्थान तयार केले आहे, जिथे ते एकत्र राहून पुढच्या वाटचालीची तयारी करत आहेत. फलाट क्रमांक 1 वर जेवणाच्या पंगती बसल्या असून, मुंबईतील मराठा बांधवांकडूनही मोठ्या प्रमाणात अन्नदान केले जात आहे. अनेक आंदोलकांनी झोपण्यासाठी टेंट आणले आहेत, जेणेकरून त्यांची गैरसोय होणार नाही. रस्त्यात जेथे जागा मिहेल तेथे कडेला बसून मराठा आंदोलक भाकरतुकडा खात आहेत.

महासागर
सोमवार, दि. 1 सप्टेंबर 2025
अमरावती
पान 3



# बजाज खिलौना दुकानाला पुन्हा आग

## दोन तासांच्या प्रयत्नानंतर आग आटोक्यात | सुरक्षेवर प्रश्नचिन्ह

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 31)**- शहरातील सिटी कोतवाली पोलिस ठाण्यासमोर असलेल्या 'बजाज खिलोना' या तीन मजली इमारतीला रविवारी दुपारी पुन्हा एकदा भीषण आग लागली. दुपारी साडेतीन ते चार वाजताच्या दरम्यान लागलेल्या या आगीमुळे परिसर धुराने गडद झाला होता. रविवारी वाहतुकीचा ताण कमी असल्याने मोठी दुर्घटना टळली, मात्र नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण पसरले.

प्राप्त माहितीनुसार, 'बजाज खिलोना' व 'बेबी ट्रायसिकल' दुकानाच्या तिसऱ्या मजल्यावरून अचानक धुराचे लोट बाहेर येऊ लागले. काही क्षणांतच आगीने भीषण रूप धारण केले. साधारणपणे या मार्गावर नेहमीच मोठी वर्दळ असते. मात्र सुट्टीचा दिवस असल्याने गर्दी कमी होती आणि वाहतूक कोंडी टळली.

घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाची पाच वाहने घटनास्थळी दाखल झाली. जवानांनी युद्धपातळीवर प्रयत्न करून तब्बल दोन तासांत आग आटोक्यात आणली. दरम्यान, पोलिसांनी तातडीने मोठा बंदोबस्त उभारला. आजूबाजूच्या दुकानदार व व्यापाऱ्यांमध्ये प्रचंड चिंता निर्माण झाली होती.



### अवघ्या काही महिन्यांपुर्वी पेटले होते दुकान

काही महिन्यांपूर्वी या दुकानाला आग लागून मोठे नुकसान झाले होते. पुन्हा अशाच प्रकारे आग लागल्याने सुरक्षेच्या दृष्टीने आवश्यक अग्निशमन यंत्रणा आहे का, याबाबत शंका उपस्थित होत आहे. आगीचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. आर्थिक नुकसानीचा अंदाजही प्रशासनाकडून व्यक्त करण्यात आलेला नाही.

### फायर ऑडिटकडे दुर्लक्ष

अमरावती शहरात आगीच्या घटना घडल्या की फायर ऑडिटचा विषय चर्चेत येतो. मंगल कार्यालये, हॉस्पिटल्स, हॉटेल्स, मॉल्स, थिएटर्स, क्लासेस आदी ठिकाणी फायर ऑडिट अनिवार्य आहे. परंतु बहुतेक व्यावसायिक याकडे दुर्लक्ष करतात. प्रशासकीय यंत्रणाही सक्ती करत नसल्याने वारंवार आग लागण्याच्या घटना घडत आहेत, ही चिंतेची बाब मानली जात आहे.

# चंद्रभागा नदीच्या पुरात दोन जणांचा बुडून मृत्यू

## चमक सुरवाडा व अरेगाव-खांजामानगर परिसरात घडल्या दोन वेगळ्या घटना





**महासागर प्रतिनिधी**

**अचलपूर, (दि. 31) - तालुक्यातील मुसळधार पावसामुळे नदी-नाले तुडुंब भरून वाहत असताना चंद्रभागा नदीपात्रात दोन दुर्दैवी घटना घडल्या आहेत. या घटनांमध्ये दोन व्यक्तींना जीव गमवावा लागला असून परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे.**

### स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण

एकाच नदीत सलग दोन दिवसांमध्ये दोन वेगळ्या घटनांत दोन जणांचा मृत्यू झाल्यामुळे परिसरात खळबळ उडाली आहे. चंद्रभागा नदीला आलेल्या पुरामुळे नागरिकांना धोका टाळण्यासाठी प्रशासनाने सतर्कता बाळगण्याचे आवाहन केले आहे

### पाय घसरल्याने घडली घटना



दि. 30 ऑगस्ट रोजी तालुक्यातील चमक सुरवाडा येथे ही घटना घडली. सततच्या पावसामुळे चंद्रभागा नदीला मोठ्या प्रमाणात पूर आहे . अश्यातच ज्ञानदीप पारिसे (वय 42, रा. चमक सुरवाडा) यांचा पाय घसरून ते नदीपात्रात वाहून गेले. सलग शोधमोहीमीनंतर आज सकाळी (31 ऑगस्ट) त्यांचा मृतदेह सापडला. सरमसपूरा पोलीस ठाण्याच्या कर्मचाऱ्यांनी घटनास्थळी येऊन मृतदेह ताब्यात घेऊन उपजिल्हा रुग्णालय, अचलपूर येथे शवविच्छेदनासाठी पाठविला.

### चंद्रभागेत आढळला मृतदेह



याच चंद्रभागा नदीपात्रात आज सकाळी दुसऱ्या घटनेत आणखी एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. मृताचे नाव जनकलाल बाबू शेलुकर (रा. सोमठाणा) असे असून, मृतदेह अरेगाव-खांजामानगर परिसरातील नदीपात्रात दिसला. घटनेची माहिती मिळताच पथ्रोट पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा करून मृतदेह उपजिल्हा रुग्णालय, अचलपूर येथे शवविच्छेदनासाठी पाठविला.

## बेपत्ता युवकाचा भुलेश्वरी नदीपात्रात मृतदेह

**दर्यापूर** - अंजनगाव सुर्जी तालुक्यातील लाखनवाडी गावातील बेपत्ता युवकाचा मृतदेह रविवारी (31 ऑगस्ट) लेहेगाव रेल्वे परिसरातील भुलेश्वरी नदीपात्रात आढळून आला. या घटनेमुळे परिसरात मोठी खळबळ उडाली. मृतकाचे नाव चेतन ढोके (35 वर्षे, रा. लाखनवाडी, ता. अंजनगाव सुर्जी) असे आहे. तो शुक्रवार, दि. 29 ऑगस्टपासून घरातून बेपत्ता होता. दोन दिवसांनंतर रविवारी सकाळी लेहेगाव रेल्वे शेतशिवारातील भुलेश्वरी नदीपात्रात



त्याचा मृतदेह एका शेतकऱ्याच्या नजरेस पडला. याबाबत शेतकऱ्याने पोलिस पाटलांना माहिती दिली. त्यानंतर पोलिस पाटलांनी दर्यापूर पोलिसांना कळविले. दरम्यान, एपीआय अभय चौथनकर यांच्यासह पोलिसांनी घटनास्थळी धाव घेऊन पंचनामा केला. मृतदेहाची अवस्था अत्यंत खराब असल्याने जागेवरच शवविच्छेदन करण्यात आले. मृतकाच्या पश्चात आई असून, या घटनेने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे.

### लोहा लाईन दुकानातून 2.32 लाखांचा मुद्देमाल चोरीला

**अमरावती** - सिटी कोतवाली पोलिस स्टेशन परिसरातील इतवारा बाजारमधील लोहा लाईन येथील एका दुकानातून 2 लाख 32 हजारांचा मोबाईल व इतर साहित्य चोरीला गेल्याची घटना समोर आली आहे. आरोपींशी जुन्या वादातून ही चोरी झाल्याचे स्पष्ट झाले आहे. अभिजीत प्रकाश सिंगरे (38, शिक्षक कॉलनी) यांच्या तक्रारीवरून पोलिसांनी मोहम्मद मदस्सीर अजीज (30), मोहम्मद तैशिफ मोहम्मद याकूब (50), मोहम्मद अकील मोहम्मद याकूब (40) व गोलू नावाच्या तरुणाविरुद्ध गुन्हा नोंदविला आहे.

# डीजे साऊंड सिस्टिम चोरीचा लागला छडा

## 24 तासांत मोर्शी पोलिसांची कामगिरी



**महासागर प्रतिनिधी**

**मोर्शी, (दि. 31)**- मोर्शी पोलिसांनी डीजे साऊंड सिस्टिमची ईलेक्ट्रॉनिक मिक्सर मशिन चोरी करणाऱ्या चोरट्याला अवघ्या 24 तासांत गजाआड केले. ही कारवाई 30 ऑगस्ट रोजी उघडकीस आली.

फिर्यादी संजय विठ्ठलराव नागले (वय 49, रा. दापोरी) यांची सम्राट बँड पार्टी असून, 29 ऑगस्ट रोजी सकाळी 6 वाजता त्यांनी त्यांच्या आयसर गाडीजवळ पाहणी केली असता, गाडीत ठेवलेली स्टुडीओ कंपनीची चार मिक्सर मशिन चोरीला गेल्याचे दिसून आले. प्रत्येकी किंमत 10 हजार रुपये असलेल्या या मशिनचे एकूण मूल्य 40 हजार रुपये होते.

सदर प्रकरणी पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला. गोपनीय माहितीच्या आधारे पोलिसांनी कसून तपास सुरू केला. त्यानुसार शनिवारी आरोपी रोहित बाबाराव नागले याला अटक करण्यात आली. त्याच्याकडून चोरीस गेलेले सर्व चार मिक्सर मशिन जप्त करण्यात आले.

ही यशस्वी कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अप्पर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत आणि उपविभागीय पोलीस अधिकारी संतोष खांडेकर यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. पोलीस निरीक्षक राहुल आठवले यांच्या नेतृत्वाखालील पथकात सपोनि राहुल गवई, पोउपनि आकाश शिवणकर, पोलीस अंमलदार निलेश देशमुख, सौरभ धरमठोक, छत्रपती करपते व स्वप्नील बायस्कर यांचा समावेश होता. सध्या आरोपीवर पुढील तपास मोर्शी पोलिसांकडून सुरू आहे.

# सायबर फसवणूकीत 1 लाखांचा गंडा

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 31)** - सायबर गुन्हेगारांनी पुन्हा एकदा फसवणुकीची नवी पद्धत वापरून शहरातील एका व्यावसायिकाला तब्बल 1 लाखांचा गंडा घातला आहे. ही घटना 30 ऑगस्ट रोजी उघडकीस आली असून सिटी कोतवाली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

फिर्यादी मनिष जयसुकलाल भायाणी (57, रा. विजयगड अपार्टमेंट, मांगीलाल प्लॉट, कॅन रोड, अमरावती) हे एका कामाशी संबंधित रिफंडबाबत त्यांच्या मोबाईलवर बोलत होते.

त्याचवेळी त्यांना एका अनोळखी क्रमांकावरून व्हॉट्सॲप ऑडिओ कॉल आला. फिर्यादी यांनी तो कॉल नाकारला. तथापि, रिफंडची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर जेव्हा त्यांनी ॲक्सिस बँकेतील आपले खाते तपासले, तेव्हा त्यांच्या खात्यातून तब्बल 1 लाखांची रक्कम सायबर फसवणुकीतून काढून घेण्यात आल्याचे समोर आले. फिर्यादींनी तातडीने पोलीस ठाणे सायबर येथे ऑनलाईन तक्रार नोंदवली. तक्रारीच्या आधारे सिटी कोतवाली पोलिसांनी भादंविच्या कलम 318(4) तसेच कलम 66(क) माहिती तंत्रज्ञान अधिनियम नुसार गुन्हा दाखल केला आहे. सायबर गुन्हेगार वेगवेगळ्या पद्धतीने कॉल किंवा मेसेज करून फसवणूक करत असल्याने अनोळखी नंबरवरून आलेले कॉल, लिंक अथवा रिफंडसंबंधी संदेशांना प्रतिसाद देऊ नये, असा इशारा पोलिस प्रशासनाने नागरिकांना दिला आहे. तसेच कोणतीही संशयास्पद घटना घडल्यास त्वरित सायबर हेल्पलाईनवर संपर्क साधण्याचे आवाहनही करण्यात आले आहे.



# एमडी ड्रग्ज तस्करीत तिघे अटकेत

## पंचवटी चौकात अमरावती गुन्हेशाखेची धडक कारवाइ | 2.63 लाखांचा मुद्देमाल जप्त

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 31)** - शहरातील तरुणाईला अंमली पदार्थाच्या विळख्यात खेचणाऱ्या मॅफेडॉन (एम.डी.) या घातक ड्रग्जच्या विक्रेत्यांवर अमरावती गुन्हेशाखेने मोठा शह दिला आहे. पंचवटी चौकात सापळा रचून पोलिसांनी ऑटोमधून आलेल्या तिघांना पकडले. त्यांच्या ताब्यातून 23.800 ग्रॅम एम.डी. पावडर, ऑटो रिक्षा व इलेक्ट्रॉनिक काटा असा एकूण 2 लाख 63 हजार 500 रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. 30 ऑगस्ट रोजी गुप्त माहितीच्या आधारे गुन्हेशाखेचे पथक गस्त घालत असताना संशयित ऑटो (क्र. एमएच 27 बीडब्ल्यू 7490) पंचवटी चौकातील रोशनी हॉटेलसमोर आल्याचे दिसले. पोलिसांनी तात्काळ सापळा रचून आरोपींना पकडले. अटक आरोपींची नावे अब्दूल राकीब अब्दूल राजीक (20, ऑटो चालक, रा. कमलीवाले दर्गा, जुनी वस्ती, बडनेरा), अब्दूल नासीर अब्दूल रहीम (19, रा. यशोधरा नगर, नागपूर) आणि सैयद रजा सैयद झहूर (23, रा. शुक्रवारा बाजार, बडनेरा) अशी आहेत. आरोपींवर एन.डी.पी.एस. ॲक्टनुसार गाडगेनगर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला असून, तिघांनाही अटक झाली आहे. त्यांनी एम.डी. कुणाकडून खरेदी केला आणि अमरावतीत पुरवठा कसा होत होता, याचा तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस आयुक्त अरविंद चावरिया, पोलीस उपायुक्त गणेश शिंदे, श्याम घुगे व रमेश धुमाळ यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक संदीप चव्हाण यांच्या नेतृत्वाखाली पार पडली. यात एपीआय अमोल कडू, मनीष वाकोडे, महेश इंगोले, तसेच गुन्हेशाखेचे अनेक जवान सहभागी होते.

### आणखी एम.डी. तस्कर रडारवर

अटक आरोपींच्या चौकशीतून शहरातील आणखी पुरवठादारांची नावे समोर येण्याची शक्यता असून, त्यांच्यावर लवकरच कारवाई होणार असल्याचे गुन्हेशाखेने स्पष्ट केले आहे. तसेच शहरात एम.डी. विक्री, सेवन किंवा साठा बाळगणाऱ्यांवर कडक मोहीम राबवण्याचे आदेश पोलीस आयुक्त अरविंद चावरिया यांनी दिले आहेत.

### झेडपीत नोकरीचे आमिष दाखवून 8 लाखाची फसवणूक

**अमरावती** - जिल्हा परिषदेतील कनिष्ठ अभियंता पद मिळवून देतो असे खोटे आश्वासन देऊन साईनगर येथील एका युवकाची 8 लाखाने फसवणूक केल्याची घटना शुक्रवारी समोर आली आहे. या प्रकरणात विकास विक्रांत पोवते (29, रा. साईनकृपा कॉलनी, साईनगर) याच्या तक्रारीवरून राजापेठ पोलिस ठाण्यात आरोपी शोएब अली शब्बीर अली (29, रा. चांदुरबाजार) याच्याविरुध्द भादंवी कलम 420, 406 अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. फिर्यादीनुसार, आरोपी अली शब्बीर यांने विकास यांना जिल्हा परिषदेत कनिष्ठ अभियंता पद मिळवून देतो असे सांगितले होते. यासाठी त्याने 8 लाख रुपये घेतले. परंतू ही कामगिरी पूर्ण न केल्याने फिर्यादीला मोठा आर्थिक फटका बसला. त्यामुळे त्यांनी राजापेठ पोलिसात धाव घेतली.

# अंजनसिंगी ते मंगरूळ राज्य मार्गाची दुर्दशा

### ग्रामीण जनतेच्या जीवाला सततचा धोका

**महासागर प्रतिनिधी**

**धामणगाव रेल्वे, (दि. 31)**- अंजनसिंगी ते मंगरूळला जोडणारा महत्त्वाचा राज्य मार्ग गेल्या काही महिन्यांपासून अत्यंत दयनीय अवस्थेत आहे. चिंचपूरङ्कशिदोडीङ्कमंगरूळ या मार्गावरील खोल खड्डे व उखडलेले डांबरीकरण यामुळे प्रवाशांना अक्षरशः जीव मुठीत धरून प्रवास करावा लागत आहे. अपघातांचा धोका दिवसेंदिवस वाढत असून नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

या रस्त्याचा वापर दररोज शेकडो शेतकरी, विद्यार्थी, नोकरीसाठी जाणारे लोक आणि ग्रामीण भागातील नागरिक करतात. परंतु दुर्दशाग्रस्त रस्त्यामुळे विशेषतः दुचाकीस्वारांना मोठ्या संकटाचा सामना करावा लागत आहे. आतापर्यंत अनेक बाईकस्वार जखमी झाले असून, सुदैवाने जीवितहानी टळली आहे.





शिदोडी येथील तालुका काँग्रेस कमिटी सचिव शैलेश निस्ताने यांनी प्रशासनावर थेट टीका करताना सांगितले की, राज्य मार्ग असूनसुद्धा याकडे पूर्ण दुर्लक्ष झाले आहे. रस्ता दुरुस्तीसाठी प्रशासन कोणाच्या तरी मृत्यूची वाट पाहत आहे का? असा सवाल ग्रामस्थांमध्ये केला जात आहे.

दरम्यान, ग्रामीण भागातील पायाभूत सुविधांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असल्याची चर्चा सुरू आहे. एका बाजूला समृद्धी महामार्ग, शक्तिपीठ महामार्ग यांसारख्या भव्य योजनांना गती मिळत असताना, दैनंदिन जीवनाशी थेट निगडीत असलेले राज्य मार्ग मात्र अर्धवट व धोकादायक अवस्थेत सोडले गेले आहेत.

अधिवक्ता महल्ले यांनी सरकारवर टीका करताना म्हटले की, ग्रामीण जनतेला जनावरांप्रमाणे वागणूक दिली जात आहे. श्रीमंतांसाठी आलिशान महामार्ग, तर सर्वसामान्यांसाठी जीवघेणे रस्ते, ही अत्यंत दुर्दैवी बाब आहे. ग्रामस्थांनी शासनाकडे तातडीने या मार्गाची दुरुस्ती करण्याची मागणी केली असून, अन्यथा मोठी जीवितहानी होण्याची भीती व्यक्त केली आहे.

# गांजा वाहतूक करताना अट्टल मोटरसायकल चोर अटकेत

### स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

**महासागर प्रतिनिधी**

**अमरावती, (दि. 31)**- ग्रामिण हद्दीत स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने कारवाई करून एका अट्टल गुन्हेगाराला गांज्यासह जेरबंद केले. त्याच्याकडून दोन चोरीच्या मोटरसायकलीही जप्त करण्यात आल्या. या कारवाईत एकूण 1,05,500 रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. विक्रम उर्फ विक्की कृपाप्रसाद नांदणे (रा. वाकी रायपूर, ता. भातकुली) असे आरोपीचे नाव आहे.

30 ऑगस्ट रोजी स्थानिक गुन्हे शाखेचे पथक चांदूरबाजार पोलीस ठाण्याच्या हद्दीत गस्त घालत असताना गुप्त माहितीच्या आधारे कारवाई करण्यात आली. माहिती मिळाली होती की विक्की नांदणे लाल रंगाच्या



मोटरसायकलवर गांजा घेऊन येत आहे. त्यानुसार खरवाडी शिवारातील पोल्ट्री फार्मजवळ नाकाबंदी करण्यात आली.

काही वेळाने संशयित मोटरसायकलसह दिसताच त्याला चौकशीसाठी थांबवले. सुरुवातीला तो बाजार करून घरी जात असल्याचे सांगत होता. मात्र पंचासमक्ष तपासणी केली असता त्याच्या बॅगेत 1 किलो 277 ग्रॅम गांजा आढळून आला. पुढील चौकशीत आरोपीने चांदूरबाजार आणि अकोला येथून प्रत्येकी एक मोटरसायकल चोरी केल्याची कबुली दिली. त्यानुसार दोन मोटरसायकली जप्त करण्यात आल्या.

सदर आरोपीसह मुद्देमाल चांदूरबाजार पोलिसांच्या ताब्यात देण्यात आला असून पुढील तपास सुरू आहे. ही कारवाई पोलीस अधीक्षक विशाल आनंद, अपर पोलीस अधीक्षक पंकज कुमावत व उपविभागीय अधिकारी माधव गरुड यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडली. स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक किरण वानखडे यांच्या नेतृत्वाखालील पथकाने ही कारवाई केली.

आरएनआय ४६९७५/१९८५ महासागर अमरावती
मालक, मुद्रक, प्रकाशक श्रीकृष्ण तनसुखदास चांडक यांनी अरूणोदय प्रेस, कॉटन मार्केट, नागपूर १८ येथे छापून दैनिक महासागर कार्यालय, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक, अमरावती येथे प्रकाशित केले. संपादक -श्रीकृष्ण तनसुखदास चांडक ( पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर राहील ) अमरावती मुख्य कार्यालय, पत्ता. दैनिक महासागर, होटल टूरिस्टच्या बाजूला रेल्वे स्टेशन चौक अमरावती, फोन नं. ९५१८९३४५०४

# मग, शासन दुटप्पी का?

महाराष्ट्रातील सामाजिक राजकीय परंपरेत मराठा समाजाचे योगदान अतुलनीय आहे. शौर्य, पराक्रम, शेतमजुरी, नेतृत्व आणि समाजकारण यातून हा समाज घडला. पण गेल्या अनेक दशकांपासून मराठा समाजाला आरक्षणाचा प्रश्न चिघळत ठेवण्यात आला आहे. हा प्रश्न फक्त आरक्षणा पुरता मर्यादित नाही, तर मराठा व कुणबी हे एकच आहेत का? या मूळ प्रश्नावर तो आधारलेला आहे.

-------------

आज मनोज जरांगे पाटील यांसारखे लढवय्ये कार्यकर्ते ठामपणे सांगत आहेत मराठा, कुणबी, पाटील, देशमुख हे स्वतंत्र नाहीत; हे सर्व एकाच समाजाचे भाग आहेत. याचे पुरावे इतके ठोस आहेत की, कोणत्याही शासनाने किंवा न्यायालयाने त्याकडे दुर्लक्ष करणे म्हणजे न्याय, समाज आणि इतिहास या तिन्हींचा अपमान आहे.

**इतिहास आणि परंपरेतील एकात्मता**

मराठा आणि कुणबी समाजात विवाह, बेटीव्यवहार, रोटीव्यवहार शतकानुशतके होत आले आहेत. कुणबी शेतकरी, पाटील गावप्रमुख, देशमुख परगण्याचे नेते आणि मराठा योद्धा अशी विभागणी ही कार्यपद्धतीवर आधारित होती, जातिभेदावर नव्हे. त्यामुळे कुणबी आणि मराठा या नावांमध्ये भिन्नता असली तरी त्यांच्या जीवनपद्धती, परंपरा, संस्कृती आणि सामाजिक आचार एकच राहिले आहेत.

मराठा म्हणजे कुणबी, आणि कुणबी म्हणजे मराठा, ही धारणा फक्त लोक कथांमध्ये नाही, तर सामाजिक घटनांमध्ये प्रत्यक्ष दिसून येते. ग्रामीण भागातील असंख्य कुटुंबे मराठाझकुणबी नात्यांनी एकमेकांशी जोडलेली आहेत. कुणबी घरातील मुलगी मराठा घरात जाते, मराठा घरातील मुलगी कुणबी घरात जाते, आणि कुठेही अडचण येत नाही. जर हे दोन वेगळे समाज असते, तर असा स्नेहसंबंध कसा शक्य झाला असता?

**न्यायालयाचा ऐतिहासिक निर्णय**

१९२१ साली मुंबई हायकोटाने दिलेला निर्णय हा या वादावर शिक्कामोर्तब करणारा आहे. त्या निर्णयात स्पष्ट नमूद केले आहे की, मराठा (क्षत्रिय) आणि कुळंबी/कुणबी हे एकच आहेत. न्यायालयासमोर ठेवलेले पुरावे, परंपरा आणि सामाजिक नोंदी यांच्या आधारे हा निष्कर्ष नोंदवला गेला.

म्हणजे शंभरहून अधिक वर्षांपूर्वी न्यायालयाने हा वाद संपवून टाकला होता. तरीदेखील आज शासन हीच गोष्ट मान्य करण्यास तयार नाही. हे प्रशासनाच्या दुटप्पी वृत्तीचे द्योतक आहे.



**शासनाची टाळाटाळ**

जर शासनाने खरोखरच समाज हिताचा विचार केला असता, तर एका साध्या शासन निर्णयाने (जीआर) ने हा प्रश्न कायमचा सुटू शकला असता. याआधी ओबीसी प्रवर्गात अनेक जातींना समाविष्ट करण्यात आले आहे. त्यासाठी जीआर काढून कायदेशीर प्रक्रिया पूर्ण करण्यात आली आहे. मग मराठा समाजाला त्याच पद्धतीने न्याय का दिला जात नाही?

खरे तर, प्रश्न इतकाच आहे की शासनाला समाजाला न्याय द्यायचा आहे का नाही? कारण प्रक्रिया कठीण नाही, पण राजकीय धाडस लागते.

गजानन कुसुम ओंकार हरणे
लेखक, साहित्यिक कवी, वक्ता
राज्य उपाध्यक्ष,
अ. भा. मराठा सेवा संघ
जिल्हा परिषद नगर,
खडकी, अकोला
9822942623

**फोडा आणि राज्य करा..चा खेळ**

आज राज्यात शासन-प्रशासनाकडून "फोडा आणि राज्य करा" हीच नीती वापरली जात आहे. एकीकडे ओबीसींना प्रोत्साहन, दुसरीकडे मराठ्यांना दडपण, आणि तिसरीकडे या दोन समाजांत संघर्ष उभा करणे हा खेळ सुरू आहे.

"एक भाऊ मराठा, एक भाऊ कुणबी, एक भाऊ देशमुख" हे सर्व स्वतंत्र नाहीत, पण त्यांना वेगळे मानून राजकीय पोळी भाजली जात आहे.

**आंदोलनांचा उद्रेक**

आज मनोजदादा जरांगे पाटील यांसारखे सामाजिक कार्यकर्ते मुंबईत आमरण उपोषणाला बसले आहेत. त्यांचा मुद्दा एकच आहे शासनाने त्वरित निर्णय घेऊन मराठ्यांना ओबीसी प्रमाणपत्र द्यावे. कारण शासन जितका वेळ खेचत आहे, तितका समाजातील असंतोष वाढत आहे. महाराष्ट्रात कुठेही आंदोलन भडकू शकते.

शासनाला जर खरंच राज्यातील शांतता जपायची असेल, तर हा प्रश्न लगेच सोडवायला हवा. नाहीतर परिस्थिती बिघडण्याची पूर्ण शक्यता आहे.

**प्रश्न सुटण्याचा मार्ग सोपा**

या प्रश्नाला सोडवण्यासाठी फार मोठा कायदेशीर गोंधळ नाही. शासनाने एक शासननिर्णय काढून मराठा, कुणबी, पाटील, देशमुख हे एकच असल्याचे स्पष्ट करावे, आणि त्या सर्वांना ओबीसी प्रमाणपत्र देण्याचे आदेश द्यावेत.

केंद्र सरकारकडे सुद्धा या संदर्भात कायदेकरीता मार्ग उपलब्ध आहे. इच्छाशक्ती असेल, तर हा प्रश्न एका दिवसात निकाली निघू शकतो. पण इच्छाशक्तीच नसल्याने हा प्रश्न वर्षानुवर्षे लांबणीवर टाकला जात आहे.

**सामाजिक सलोखा धोक्यात**

जातीय वाद निर्माण करून राजकारण करणाऱ्यांनी लक्षात घ्यायला हवे की, समाजातील शांतता आणि एकोपा हा महाराष्ट्राचा आत्मा आहे. जर शासनाने न्यायालयीन निर्णय, सामाजिक परंपरा आणि लोकभावना मान्य केली नाही, तर सामाजिक सलोखा धोक्यात येईल.

आज काळाची गरज आहे,माणसाने माणसाला जोडावे, माणसाने माणसाला वाचवावे. समाज फोडण्या ऐवजी समाज जोडण्याचे काम शासनाने करावे.

**निष्कर्ष**

मराठा, कुणबी, पाटील, देशमुख हे वेगवेगळे नाहीत; ते सर्व एकाच समाजाचे वारकरी आहेत. याचे पुरावे इतिहास, परंपरा, सामाजिक संबंध आणि न्यायालयीन निर्णय या चारही स्तरांवर निर्विवाद आहेत. मग प्रश्न आहे शासन हे सत्य का मान्य करत नाही? समाजाला वेगळे करून, वाद निर्माण करून, राजकारण साधायचे आहे म्हणून का?

शासनाने लक्षात ठेवावे की, हा प्रश्न लांबवला गेला, तर महाराष्ट्रातील सामाजिक सौहार्द, लोकशाहीवरील विश्वास आणि युवकांच्या भवितव्याला मोठा धोका निर्माण होईल.

म्हणूनच काळाची हाक स्पष्ट आहे...
मराठा समाजाला ओबीसी प्रमाणपत्र देण्यासाठी तातडीने जीआर काढावा.
१९२१ च्या हायकोर्टाच्या निर्णयाला मान्यता द्यावी.
समाजाला जोडणारा निर्णय घेऊन महाराष्ट्राचा सामाजिक सलोखा अबाधित ठेवावा.
आजची पिढी या प्रश्नाचे उत्तर अपेक्षीत आहे. शासनाने फोडा आणि राज्य करा.. ही नीती बाजूला ठेवून, जोडा आणि न्याय द्या.. ही नीती स्वीकारली, तर महाराष्ट्राच्या समाजजीवनाला नवी दिशा मिळेल.

---

# कुपोषण : सकस पोषण आहारांचे फलीत!

राज्यातील बालकांचे कुपोषण रोखण्यासाठी विविध प्रकारच्या उपयोजना आज अमलात असल्या तरी त्या अपयशी ठरत आहेत. त्यामुळे पाच वर्षाखालील प्रत्येकी तीन पैकी एक बालक कुपोषित असल्याचा धक्कादायक निष्कर्ष अलीकडेच भारतीय लोकसंख्या विज्ञान संस्थेच्या (आयआयपीए) या अभ्यासाच्या अहवालातून म्हटल्याचे वृत्त समोर आले.

या अभ्यास अहवालानुसार राज्यात पाच वर्षाखालील पस्तीस टक्के मुले वाढ खुंटलेली व कमी वजनाची आणि सव्वीस टक्के कुपोषित आहे. म्हणजेच प्रत्येकी तीन पैकी एक मूल कुपोषित असल्याचा निष्कर्ष या संस्थेने काढला आहे. तसेच (आयआयपीए) च्या सुक्ष्म अभ्यासानुसार राज्यात १९९२ मध्ये मध्यम कुपोषणाचे प्रमाण विस टक्के होते. ते २०२१ मध्ये सव्वीस टक्क्यांवर पोहचले.

जन्माच्या वेळी बाळाचे वजन कमी. लहान वयात मातृत्व. शिक्षणाचा अभाव. अस्वच्छ राहणीमान. आणि स्तनपानाचा विलंब या बाबी बालकांच्या कुपोषणास कारणीभूत ठरल्या होत्या व आजही बहुतांशी त्या कायम आहेत. बाल कुपोषणाच्या संदर्भात २०१४ पासून तर २०२१ पर्यंत पोषण स्थितीत फारसा असा बदल झाला नाही, त्यामुळे कुपोषणाची तीव्रता ही दिवसेंदिवस वाढतचं आहे.

ग्रामीण भागातील वाढत्या कुपोषणाच्या संदर्भात सामाजिक व आर्थिक विषमता, पोषण आहाराचा अभाव आणि अपुरी आरोग्य व्यवस्था हे घटक कारणीभूत आहे. तर शहरी भागातील कुपोषणांच्या प्रमुख कारणांमध्ये ग्रामीण भागातून शहरांकडे होण्याऱ्या स्थलांतरित मजुरांची वाढती संख्या होय. तसेच त्यांचे अत्यंत निकृष्ट जीवनमान मानले पाहिजे.

खेड्यातून रोजगारासाठी महानगरांकडे स्थलांतरित होणाऱ्या या कुटुंबीयांना ना पुरेशी आरोग्य सुविधा असते, ना सकस पोषण आहार, ना शुद्ध पिण्याचे पाणी. हात मजुरीवर काम करणाऱ्या लाखों कुटुंबावर दोन वेळेचे पोटभर अन्न मिळण्याची क्षमता नाही.

त्यात निरक्षरता, आर्थिक चणचण, महिला व बालकांच्या आरोग्याची होणारी हेळसांड, वाढती महागाई, ढासळती आर्थिक परिस्थिती अशा अगणित समस्यांच्या गर्तेत मुलांना सकस आहाराचा पुरवठा पाल्यांच्या आवाक्या बाहेरचा ठरतो. आज सकस पोषण आहारांच्या अभावामुळे कुपोषणाची अधिकाधिक तीव्रपणे होत आहे.

बाल कुपोषण कमी करण्याच्या संदर्भात राज्य शासनाच्या अनेक योजना कार्यान्वित आहेत. लाखो आरोग्य कर्मचारी, विविध टास्क फोर्स, शिबिरे सुद्धा उभारली जातात. आर्थिक बजेटमध्ये तरतुदी केली जाते. तरीसुद्धा बाल कुपोषणाची तीव्रता दिवसेंदिवस वाढताना दृष्टीस पडते. शासन पातळीवर 'इंटिग्रेटेड चाइल्ड डेव्हलपमेंट सर्व्हिसेस', 'मिशन पोषण २.०', 'सुपोषण अभियान' अशा योजनांची आखणी आहे. परंतु याही योजना नेहमीप्रमाणे लाभार्थ्यांपर्यंत पोहोचत नाही.

शहरी भागातील बालकुपोषण हे स्थलांतरित कुटुंबीयांच्या बालकांची संबंधित आहे.यातील बालके शाळाबाह्य आहेत. त्यामुळे शालेय पोषण आहाराचा कुठलाही लाभ यांना मिळत नाही. कुपोषणाच्या बाबतीत पोषण शिक्षण हे महत्त्वाची बाब आहे. मात्र त्याची पूर्तता सुलभ होणे जरुरीचे आहे.

राज्यात एकात्मिक बाल विकास सेवा योजना, महिला व बालकल्याण विकास विभागाच्या माध्यमातून अंगणवाडी योजना राबविण्यात येते.ही योजना मुख्यत्वे शून्य ते सहा वर्षे वयोगटातील बालकांच्या भौतिक, शारीरिक आणि सर्वांगीण विकासासाठी आहे.पोषणयुक्त आहार, लसीकरण,आरोग्य तपासणी, आरोग्य शिक्षण, औपचारिक शालेय शिक्षण केंद्रातून देण्याचा व्यापक प्रयत्न व्हायला हवा.

राज्यातील कुपोषण मुक्तीसाठी काम करणाऱ्या ग्रामीण भागातील अंगणवाड्या आज स्वतःच्या इमारतीविना आहेत. समाज मंदिरात, पत्रांच्या शेडमध्ये, भाड्याच्या जागेत, तर कुठे उघड्या झाडाखाली सुद्धा भरतात. त्यात मोठी सुधारणा आज अपेक्षित आहे.

बाल कुपोषणाच्या समस्येवर मात करीत असताना कुपोषित बालकांच्या पालकांचे स्थलांतर थांबवले पाहिजे.

कुपोषित बालकांच्या कुटुंबांचे विशेष सर्वेक्षण करून त्यांच्या सकस पोषणावर भर देणे गरजेचे ठरते. कुपोषणाची समस्या ही आरोग्याशी संबंधित नव्हे, तर विकासाची आणि आर्थिक प्रगतीची समस्या आहे. त्यामुळे बाल कुपोषण नियंत्रणासाठी सर्वोतीपरी प्रामाणिक प्रयत्न होणे आवश्यक आहे.

■ ■ ■



शशिकांत मधुकर तोटे
दारव्हा, जि. यवतमाळ
९१३०८३५४५८
shashikanttote1979@gmail.com

---

# शालार्थ घोटाळा : पोलिसांच्या एकापेक्षा अधिक एसआयटी बरखास्त

नागपूरमध्ये गेल्या काही महिन्यांपासून सुरू असलेल्या अतिसक्रिय पोलिस कारवाईला अखेर आळा बसला आहे. शिक्षक, मुख्याध्यापक आणि शाळा प्रशासन यांना मोठ्या प्रमाणावर गुन्हेगार ठरविण्याच्या प्रवृत्तीला आळा घालत नागपूर एसआयटी तसेच पोलिस महासंचालकांच्या एसआयटीचे औपचारिक विसर्जन करण्यात आले आहे. यामुळे आता संपूर्ण चौकशीसाठी एकच राज्यस्तरीय प्रशासकीय एसआयटी जबाबदारी घेणार आहे.

या प्रकाशनाचे वाचक आणि माज्या लेखांचे अनुसरण करणाऱ्यांसाठी ही घटना नवीन नाही. माज्या २३ जुलै २०२५ च्या लेखात मी स्पष्ट केलं होतं की नागपूर पोलिसांनी सुरू ठेवलेल्या अटक मोहीमा आणि समन्स हे कायदेशीरदृष्ट्या संदिग्ध आहेत. कारण एकाच गुन्ह्याची समांतर चौकशी वेगवेगळ्या यंत्रणांनी करणं न्यायालयीनदृष्ट्या अमान्य ठरू शकतं. सर्वोच्च न्यायालयानेही वारंवार यावर स्पष्ट मत दिलं आहे.

**या निर्णयाचा अर्थ काय?**

**एकत्रित अधिकारक्षेत्र** : स्थानिक युनिट्सने जमा केलेले सर्व कागदपत्र, पुरावे व चौकशी आता राज्यस्तरीय एसआयटीकडे हस्तांतरित होणार.

न्यायालयीन पुनरावलोकन शक्य : नागपूर पोलिसांनी आधी दिलेले समन्स आता अधिकारक्षेत्राच्या कारणावरून न्यायालयीन आक्षेप घेतला जाऊ शकतो.

**शाळांना दिलासा** : अचानक कारवाया आणि विभागीय चौकशीतील निष्कर्ष न लागल्यामुळे निर्माण झालेल्या भीतीच्या वातावरणाला हा निर्णय काही प्रमाणात शांत करतो.

**मुख्य प्रवाहातील माध्यमांतील उणीव** : बहुतेक वृत्तपत्रांनी ही बातमी केवळ प्रशासकीय घोषणा म्हणून दिली. परंतु, यामागील गोंधळ, अनावश्यक खर्च आणि नागरिकांना होणारे त्रास याकडे फारसं लक्ष दिलं नाही. दुर्लक्षित झालेले काही महत्त्वाचे प्रश्न असेः

राज्यव्यापी एसआयटी स्थापन झाल्यानंतरही अनेक स्थानिक एसआयटींना कारवाई का करू देण्यात आली?

या तांत्रिक आणि प्रक्रियात्मक चुकांमुळे झालेल्या शासकीय खर्चासाठी जबाबदार कोण?

शिक्षक, कर्मचारी यांसारख्या सर्वसामान्य नागरिकांना अनावश्यक छळापासून वाचवण्यासाठी काय हमी आहे?

माझं विनम्र आवाहन आहे की पत्रकार आणि माध्यमसंस्था फक्त सनसनाटी किंवा विभागीय निवेदनं पोहोचवणं थांबवावं. नागरिकांना तांत्रिक आणि कायदेशीर बाबींचं स्पष्ट, साध्या भाषेत स्पष्टीकरण हवं आहे. पत्रकारिता ही स्वतंत्र तपासणीची भूमिका निभावली पाहिजे, केवळ सरकारी घोषणांचा प्रतिध्वनी नव्हे.

**निष्कर्षः**

स्थानिक आणि अनेक एसआयटींचं विसर्जन हा स्पष्टता देणारा दुरुस्तीचा निर्णय आहे. मात्र या संपूर्ण घटनेतून शिकण्यासारखं म्हणजे या गोष्टींवर नियंत्रण फक्त भविष्योन्मुख पत्रकारिता आणि सखोल विश्लेषणानेच ठेवता येईल.

निर्दोष शिक्षक, मुख्याध्यापक व संस्थाचालकांनी एकत्रित कायदेशीर बचावाची युक्ती विचारात घेतली पाहिजे. कारण वाढत्या वकिली खचार्मुळे न्यायालयीन लढाई लांबणीवर पडून ती असमान होऊ शकते.

आपल्या समाजातील शिक्षकांना सरसकट गुन्हेगार ठरविण्याचा प्रयत्न झाला, तर त्याचे परिणाम पुढच्या पिढ्यांवर भीषण स्वरूपात उमटतील.

■ ■ ■



अरुण सोपानराव कराळे
दत्तवाडी, नागपूर.
९०९६३२६२७२

---

# अंधारात डोळ्यांना प्रकाश देणारी लेन्स



चीनमधील **विज्ञान** आणि **तंत्रज्ञान** विद्यापीठातील शास्त्रज्ञांनी एक **कॉन्टॅक्ट लेन्स** तयार केला आहे. जो लोकांना **रात्री** पाहण्यास मदत करेल.

**लेन्स कसे काम करते?**

हे कॉन्टॅक्ट लेन्स **सोने, सोडियम** आणि गॅडोलिनीयमच्या नॅनोपार्टिकल्सपासून बनलेले आहे. हे नॅनोपार्टिकल्स 800 ते 1600 नॅनोमीटरच्या **इन्फ्रारेड प्रकाशाचे** 3 प्राथमिक रंगामध्ये रूपांतर करतात. यामुळे तो **प्रकाश मानवांना** दिसेल.

**या लेन्सचे** सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे ते कोणत्याही **शस्त्रक्रियेशिवाय काम** करते. डोळे बंद करूनही हे लेन्स **चांगले काम करते. कारण** इन्फ्रारेड प्रकाश पापण्यांमधून **जाऊ शकतो.**



**तथापि, या लेन्समधून दिसणारे फोटो थोडे अस्पष्ट आहेत. याबद्दल अजूनही प्रयोग सुरू आहेत. तेनाईट व्हिजन गॉगल इतके शक्तिशाली नाहीत.**



---

# अचलपूर मतदारसंघ राजकीय पार्श्वभूमी

अचलपूर हा महाराष्ट्रातील अमरावती जिल्ह्यातील एक महत्वाचा विधानसभा मतदारसंघ आहे. २०२४ विधानसभा निवडणूकांमध्ये तीन प्रमुख राजकीय प्रवाह – भाजपा (भाजप), काँग्रेस आणि प्रहार जनशक्ती पक्ष यांचा समांतर सामना झाला.




या मतदारसंघात प्रहार जनशक्ती पक्षाने (पीजेपी) २०१९ मध्ये विजयी प्राप्त केला होता, ज्याचे प्रतीक म्हणजे चारवेळेस आमदार राहिलेला बच्चू कडू. काँग्रेस आणि भाजपसह इतरही पक्ष स्पर्धेत होते.

२०२४ निवडणूक निकाल आणि विरोध

२० नोव्हेंबर २०२४ रोजी झालेल्या निवडणुकीतः भाजपचे प्रवीण वसंतराव तायडे विजेत झाले, ७८,२०१ मतांनी पीजेपीचे बच्चू कडू दुसऱ्या क्रमांकावर, ६६,०७० मतांनी. काँग्रेसचे अनिरुद्ध उर्फ बबलुभाऊ सुभानराव देशमुख हे तिसऱ्या स्थानावर, ६२,७९१ मतांनी.)

मतांच्या टक्केवारीतही भाजपचा प्रबल वर्चस्व दिसते. भाजप ३६.७७%, पीजेपी ३१.०७%, काँग्रेस २९.५२%.)

या निवडणुकीतील मुख्य स्पर्धा थेट भाजप व काँग्रेसमध्ये नव्हती, तर आणि भाजपमध्ये होती. काँग्रेस विशिष्ट तिसऱ्या नंबरवर होता आणि तितक्या जोरात स्पर्धा करत नसल्याचे चित्र दिसते. तथापि, मतांची तफावत खूप घट्ट होती, त्यामुळे काँग्रेसला अदरक पदवीदार न मिळणे हीच घटना ठरली.

भाजपकडून ही विजयाची धक्का – स्थानिक प्रभाव, प्रस्थापित राजकीय संघटन आणि ताज्या लोकल ट्रेंडचा परिणाम मानले जाऊ शकतात. काँग्रेसकडेही मजबूत ऐतिहासिक आधार असून, तो हा क्षेत्र पीजेपी आणि भाजपमध्ये वाटला गेला.

**भाजपचा प्रसार आणि प्रत्याशीची जबाबदारी**

प्रवीण तायडे हे नव्या उमेदवार असूनही भाजपा संघटनेत प्रभावी भूमिका बजावली, ज्यामुळे त्यांनी विजयाचा झोका साधला.

**पीजेपी व काँग्रेसची स्थानिक भूमिका**

बच्चू कडू हे दीर्घ काळ समाजातील विश्वासू राजकीय चेहरा राहिले होते, ज्यांनी प्रतिक्रिया केंद्रित केले. परंतु या वेळी त्यांच्या नेतृत्वासमोर भाजपची मजबूत संघटनेची जाळी होती. काँग्रेसने तिसऱ्या क्रमांकावर आल्याने त्यांची भूमिका अजूनही महत्त्वाची आहे. ते पुन्हा स्पर्धेत आणण्यासाठी प्रभावी रणनिती आखणे आवश्यक आहे.

पीजेपी व काँग्रेसमधील मतांचे विभाजन भाजपच्या बाजूने गेले. साधारणतः विरोधी शक्तींचे मत विभाजले गेले आणि निश्चित राजकीय गटाला फायदा झाला. भाजपने केंद्र व राज्य स्तरावरील धोरणांचा प्रमुख फायदा घेतला असण्याची शक्यता आहे.

२०२४ निकालांनी स्पष्ट केले की, काँग्रेस पीजेपीसारख्या तृतीय पयार्यांसोबत हात मिळवून स्थिर संघटन निर्माण करू शकते.

भाजपसाठी हा विजय आदर्श आहे आणि भविष्यातील स्पर्धेत त्यांनी आपल्या तळाची व्यापक रणनीती आखावी.

स्थानिक मुद्दे (सामाजिक, विकासात्मक, मतदारांशी संवाद) यांमध्ये दोन्ही पक्षांनी पुढील काळात अधिक लक्ष देणे आवश्यक आहे.

अचलपूर मतदारसंघात २०२४ च्या विधानसभा निवडणुकीत भाजप, पीजेपी आणि काँग्रेस यांच्यात रणनीतिक आणि तात्विक स्पर्धा घडली. भाजपचे विजय हे संघटनात्मक ताकद, लोकल जनसमर्थन व प्रबल प्रचार यांचा परिणाम होते. पीजेपीचा दीर्घकालीन प्रभाव कमी झाला असला तरी त्यांची लोकप्रीयता अद्याप कायम आहे. काँग्रेससाठी ही जागा पुन्हा स्पर्धात्मक बनवण्यासाठी संघटनात्मक सुधारणा व संवाद धोरणांना प्रामुख्याने स्थान देणे गरजेचे आहे.

या प्रकारच्या राजकीय परिदृश्यात, स्थानिक नेतृत्व, जनादेशाचा प्रवाह व संघटनाचे समन्वय हे निर्णायक ठरतात. पुढील निवडणुकांमध्ये अचलपूरवर कोणते पक्षात्मक किंवा कॉआलिशनमूलक परिणाम दिसतील, हे उत्सुकतेने पाहायला मिळेल.

■ ■ ■



बादलकुमार डकरे
चांदूर बाजार

---

## वाचक लिहितात

### सुखसमृद्धीसाठी ज्येष्ठा गौरी व्रत...

भाद्रपद शुक्ल पक्षात ज्येष्ठा गौरी व्रत केले जाते. अखंड सौभाग्यप्राप्तीसाठी स्त्रिया हे व्रत करतात. पुराणात अशी कथा आहे की, असुरांच्या त्रासाला कंटाळून सर्व स्त्रिया श्रीमहालक्ष्मी गौरीला शरण गेल्या. त्यांनी आपले सौभाग्य अक्षय करण्याविषयी तिची प्रार्थना केली. श्रीमहालक्ष्मी गौरीने भाद्रपद शुक्ल अष्टमीला असुरांचा संहार करून शरण आलेल्या स्त्रियांच्या पतींना तसेच पृथ्वीवरील प्राण्यांना सुखी केले. म्हणूनच अखंड सौभाग्यप्राप्तीसाठी स्त्रिया ज्येष्ठा गौरीचे व्रत करतात.

हे व्रत तीन दिवस चालते. महाराष्ट्रात बहुतांश ठिकाणी पाच लहान मडक्यांची उतरंड रचून त्यावर गौरीचा मातीचा मुखवटा बसवतात. काही ठिकाणी सुवासिक फुलांच्या वनस्पतीची रोपे किंवा तेरड्याची रोपे एकत्र बांधून त्यांची प्रतिमा बनवली जाते आणि त्यावर मातीचा मुखवटा चढवतात. त्या मूर्तीला साडी नेसवून अलंकारांनी सजवले जाते.

काही ठिकाणी धातूची किंवा मातीची प्रतिमा करून अथवा कागदावर श्रीमहालक्ष्मीचे चित्र काढून पूजन केले जाते; तर काही ठिकाणी नदीकाठचे पाच लहान खडे आणून त्यांचे गौरी म्हणून पूजन करतात.

गौरीची स्थापना झाल्यानंतर दुसऱ्या दिवशी तिची पूजा करून नैवेद्य दाखवतात. तिसऱ्या दिवशी गौरीचे विसर्जन करतात. ज्येष्ठा गौरी व्रत केल्याने श्रीगणेशासह श्रीमहालक्ष्मीचा कृपाशीर्वाद लाभतो आणि ऐहिक जीवनात सुख-समृद्धी प्राप्त होते.

■ सौ. प्रिया बागडदेव, छिंदवाडा

### श्राध्दाचे महत्त्व

व्यक्तीच्या मृत्यूनंतर त्यांच्या आत्म्यास सद्गती मिळावी म्हणून श्राध्द केले जाते. भाद्रपद महिन्यातील कृष्णपक्षात पंधरा दिवस हे महालय श्राध्द करण्यासाठी असतात. श्रध्दा या शब्दापासून श्राध्द हा शब्द तयार झाला आहे. श्रध्देने केले जाते ते श्राध्द होय. देश, काल आणि योग्य स्थळ पाहून श्रध्दा तसेच विधींनी युक्त असे पितरांना उद्देशून ब्राम्हणांना जे काही दिले जाते त्याला श्राध्द असे म्हणतात.

इहलोक सोडून गेलेल्या आपल्या वाडवडीलांनी आपल्यासाठी आपण जन्माला आल्यापासून जे काही केले आहे त्याची परतफेड करणे अशक्य असते. श्राध्द म्हणजे पितरांचे कृतज्ञतेने स्मरण करणे एवढेच नाहीतर तो एक विधी आहे. श्राद्ध केल्याने पितरांचे रक्षण होते. पितरांना पुढच्या पुढच्या टप्यात गती मिळून त्यांचा पुढील प्रवास सुखाचा होतो. श्रध्देने श्राध्द करणाऱ्या वंशजांचेही जीवन सुखकर होते. कारण श्रध्देने श्राध्द केल्याने त्यांना त्यांच्या पितरांचे कृपाशीर्वाद मिळतात. श्राध्द केल्याने पितर वर्षभर तृप्त रहातात.

■ भीमराव साळुंखे, सातारा.

---

# या ड्रायफ्रूट्सचे सेवन आरोग्यासाठी वरदान



शरीर निरोगी आणि तंदुरस्त राहण्यासाठी खाण्यापिण्याच्या सवयी योग्य असाव्या लागतात. अनेकजण त्यांच्या आहारात ड्रायफ्रुट्सचा समावेश करत असतात. जसे की काजू, नट्स, बदाम, पिस्ता. पिस्ता हा इतर ड्रायफ्रुट्सपेक्षा महाग आहे. परंतु त्यात आढळणारे पोषक घटक आपल्या आरोग्याला अनेक प्रकारे फायदेशीर ठरतात.

**पिस्ता खाण्याचे फायदे**

पिस्ता आरोग्यासाठी इतर ड्रायफ्रुट्सपेक्षा जास्त फायदेशीर आहे. त्यात व्हिटॅमिन बी 6, प्रथिने, खनिजे, फायबर आणि अँटीऑक्सिडंट गुणधर्म भरपूर असतात, जे आपली रोगप्रतिकारक शक्ती मजबूत करतात.

पिस्त्याचे सेवन अनेक आजारांना प्रतिबंध करते. यात ल्युटीन आणि झेक्सॅन्थिनसारखे अँटीऑक्सिडंट गुणधर्म असतात, जे डोळ्यांसाठी खूप फायदेशीर असतात. पिस्त्याचे सेवन केल्याने निद्रानाश, भूक न लागणे, लठ्ठपणा आणि संधिवाताच्या आजारांपासून आराम मिळतो. हृदय आणि त्वचेशी संबंधित आजारांसाठी देखील हे फायदेशीर मानले जाते.

गर्भवती महिलांसाठी पिस्त्याचे सेवन खूपच फायदेशीर मानले जाते. यातील पोषक तत्व महिलांना गर्भावस्थेत फायदेशीर ठरतात. यातील ओमेगा 3 फॅटी ॲसिड गर्भवती महिलांसाठी आणि त्यांच्या बाळांसाठी फायदेशीर ठरतात.

पिस्त्यामध्ये प्रोटिन्सचे प्रमाण अधिक असते. यामुळे आपल्या शरीरात नवीन रक्ताच्या पेशींची वाढ होण्यास आणि मासंपेशींच्या विकासात मदत होते. जर तुम्ही वजन कमी करण्याचा प्रयत्न करत असाल तर पिस्ता हे हेल्दी स्नॅक्स म्हणून आहारात समावेश करू शकतात.

**पिस्ता खाण्याची योग्य पद्धतः.** तज्ञांच्या मते, पिस्ता खाण्यापूर्वी ते पाण्यात भिजवा आणि नंतर सेवन करा. कारण पिस्त्याचा स्वभाव उष्ण आहे, म्हणून ते मर्यादित प्रमाणात सेवन करा, किंवा मिठाई व इतर पदार्थांमध्ये मिक्स करून त्याचे सेवन करा. यामुळे तुमच्या अरोग्याला निश्चितच फायदा होईल.

■ ■ ■

---

## अशोकायन



प्रा. अशोक सारडा
मेहकर
(९४२१३९४३३९)

# आत्मबळ!

गणेश गौराईचा उत्सव
फुलवी भक्तिचा मळा
मनी आत्म समाधानाचा
आनंद मिळे वेगळा..!

संसाराचा गाडा ओढता
मन जेंव्हा जेंव्हा हारते
भिऊ नकोस आहे पाठीशी
हे आश्वासन उभारी देते ...

# एक ‘हो’ आठ लोकांना नवसंजीवनी देऊ शकतो : अपोलो हॉस्पिटल्स जीवनरक्षक अवयव प्रत्यारोपणात अग्रणी



**नवी मुंबई, ३१ ऑगस्ट :** अंतःकरण अशांत असतानाही, बुद्धी शांत ठेऊन घेतलेला एक निर्णय अनेकांच्या जीवनात आशा निर्माण करू शकतो. जागतिक अवयवदान दिनानिमित्त, अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईने अशा दात्यांच्या धैर्याचा, दान प्राप्तकर्त्यांच्या लवचिकतेचा आणि अवयव प्रत्यारोपणामुळे घडून येणाऱ्या, जीवन बदलवून टाकणाऱ्या परिणामाचा सन्मान केला – नव्या जीवनाकडे नेणारा एक असा प्रवास जो विज्ञान, कौशल्य आणि मानवता एकत्र येऊन घडवून आणतात.

प्रत्यारोपणासाठी पश्चिम भारतातील एक अग्रगण्य केंद्र म्हणून, अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबईने अचूक शस्त्रक्रिया आणि व्यापक रुग्णसेवा प्रदान करून जीवनरक्षक म्हणून अतुलनीय प्रतिष्ठा मिळवली आहे. २०१७ पासून, या रुग्णालयाने ४०८ मूत्रपिंड प्रत्यारोपण, २२९ यकृत प्रत्यारोपण, ११ हृदय प्रत्यारोपण आणि १३ कॉर्निया प्रत्यारोपण शस्त्रक्रिया केल्या आहेत, यातील प्रत्येक केस जीवन जगण्याची दुसरी संधी दर्शवते, जे असाधारण टीमवर्क आणि अढळ समर्पणामुळे शक्य झाले आहे.

गेल्या दशकात भारताने अवयव प्रत्यारोपणात लक्षणीय प्रगती केली आहे, तरीही मागणी आणि उपलब्धता यांच्यातील वाढती तफावत हे एक गंभीर आव्हान आहे. राष्ट्रीय अवयव आणि ऊतक प्रत्यारोपण संघटनेच्याच्या माहितीनुसार, दरवर्षी हजारो रुग्ण प्रतीक्षा यादीत असल्याने, यकृत, मूत्रपिंड आणि हृदय प्रत्यारोपणाची मागणी सतत वाढत आहे, अवयवदानाचे प्रमाण अत्यंत कमी आहे. परंतु सक्रिय सरकारी कार्यक्रम, रुग्णालयाकडून चालवले जाणारे उपक्रम आणि वाढती जनजागृती यामुळे महाराष्ट्र अवयवदानात आघाडीवर असलेले एक राज्य आहे.

अवयवदानाचे सखोल महत्त्व अधोरेखित करताना, अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई येथील हेपॅटोलॉजी आणि लिव्हर ट्रान्सप्लांटचे सीनियर कन्सल्टन्ट डॉ. अमेय सोनवणे म्हणाले: प्रत्येक प्रत्यारोपण हे केवळ वैद्यकीय कामगिरीपेक्षाही जास्त मानवी नातेसंबंधांची कहाणी आहे. प्रत्येक शस्त्रक्रियेमागे एक कुटुंब असते ज्यांनी त्यांच्या सर्वात कठीण काळात 'हो' म्हटले आणि त्यांचे दुःख दुसऱ्यासाठी जीवनादानामध्ये रूपांतरित करण्याचा निर्णय घेतला. त्यांचा एक 'हो' अवयव निकामी झाल्यामुळे मृत्यूशी झुंजणाऱ्या व्यक्तीसाठी जीवनरेखा बनते. रुग्णांनी आमच्यावर ठेवलेला विश्वास आम्ही पवित्र मानतो आणि अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई येथे, आम्ही त्या विश्वासाचा आदर करतो, काळजीपूर्वक, अचूक शस्त्रक्रिया, प्रगत पोस्ट-ऑपरेटिव्ह देखभाल आणि प्राप्तकर्त्यांप्रती आयुष्यभराची वचनबद्धता. आमची भूमिका ऑपरेशन थिएटरमध्ये संपत नाही – आम्ही याची पुरेपूर काळजी घेतो की प्रत्येक प्राप्तकर्ता पूर्णपणे जगू शकेल, स्वतःच्या कुटुंबांकडे परत जाऊ शकेल आणि आजाराने त्यांच्यापासून हिरावून घेतलेल्या क्षणांना पुन्हा जगू शकेल.

अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई येथील सिनियर कन्सल्टन्ट, नेफ्रोलॉजी, किडनी ट्रान्सप्लांट फिजिशियन आणि हायपरटेन्शन स्पेशालिस्ट डॉ. अमित लंगोटे म्हणाले: एक अवयवदाता आठ जणांचे जीव वाचवू शकतो – आणि त्याचा परिणाम त्या आठ जणांच्या कुटुंबांवर, मित्रांवर आणि संपूर्ण समुदायावर होतो. मूत्रपिंड निकामी झाल्यामुळे केवळ आरोग्याचे अडचणीत येते असे नाही तर उपजीविका आणि भावनिक कल्याणातही व्यत्यय येऊ शकतो. प्रत्यारोपण केवळ अवयवांचे कार्य सुरळीत करत नाही तर, आशा, स्वातंत्र्य आणि प्रतिष्ठा देखील पुन्हा मिळवून देते. अपोलो हॉस्पिटल्स नवी मुंबई येथे, आम्ही एक कार्यक्रम तयार केला आहे जो या प्रत्यारोपण प्रवासाच्या प्रत्येक पैलूची नीट काळजी घेतो – प्रत्यारोपणापूर्वीच्या संपूर्ण निदानापासून ते दीर्घकालीन रिहॅबिलिटेशनपर्यंत – कारण यश केवळ जिवंत राहण्यामध्ये नाही तर जीवनाच्या गुणवत्तेमध्ये आहे.

# स्टार युनियन दाई–इची लाइफ इन्शुरन्सने गणेशोत्सवात महामोदक अभियानाचे अनावरण केले

**नागपुर, ३१ ऑगस्ट :** स्टार युनियन दाई–इची लाइफ इन्शुरन्स (एसयूडी लाईफ) ने पुण्यात सुरू असलेल्या गणेशोत्सवानिमित्त आपले नवे अभियान एसयूडी लाईफ महा मोदक सुरू केले आहे. या उपक्रमाचा उद्देश राज्यातील सर्वात मोठ्या उत्सवासोबत सांस्कृतिक नाळ मजबूत करून कुटुंबांचे संरक्षण व जीवन समृद्ध करण्याच्या ब्रँडच्या मूलभूत मूल्यांना अधोरेखित करणे तसेच प्रादेशिक स्तरावरील बांधिलकी अधिक दृढ करणे हा आहे.

३० ऑगस्ट २०२५ ते ५ सप्टेंबर २०२५ या कालावधीत, महाराष्ट्राच्या सांस्कृतिक राजधानीत महा मोदकच्या माध्यमातून समाजाशी अर्थपूर्ण संवाद साधला जाणार आहे. या उपक्रमाद्वारे एसयूडी लाईफच्या उपाययोजनांबद्दल जनजागृती केली जाईल, इच्छुक सल्लागारांसाठी करिअरच्या संधी उपलब्ध करून दिल्या जातील तसेच पर्यावरणीय जबाबदारीचे महत्त्वही अधोरेखित केले जाईल.

या मोहिमेचे प्रमुख आकर्षण म्हणजे एक महाकाय, फिरता मोदक जो बाप्पाच्या आवडत्या गोड पदार्थाला दिलेला प्रतीकात्मक मान आहे. हा मोदक अडथळामुक्त सुरुवात, समृद्धी आणि संरक्षण यांचे प्रतीक असून, एसयूडी लाईफ त्यांच्या जीवनविमा सेवांच्या माध्यमातून प्रत्येक भारतीय कुटुंबापर्यंत पोहोचण्याच्या मानस ठेवते.

विशेष सजवलेल्या व्हॅनवर बसवलेला महा मोदक औंध, बाणेर, विमाननगर, खराडी, सांगवी, पिंपळे सौदागर, एनआयबीएम, उंद्री, चिंचवड, निगडी तसेच पुण्याच्या पेठ परिसरातील नामांकित गणेश मंडळांना भेट देणार आहे. याशिवाय तो स्थानिक बाजारपेठा, निवासी संकुले, महाविद्यालये, सार्वजनिक चौक आणि शॉपिंग कॉम्प्लेक्समध्येही थांबणार आहे. या अभियानाचा उद्देश जीवनविम्याचे महत्त्व पटवून देणे, एसयूडी लाईफ सल्लागार बनण्याच्या संधींची माहिती देणे आणि सर्वांच्या सर्वांगीण आरोग्याची काळजी घेणाऱ्या यू मॅटर ॲपविषयी जागरूकता निर्माण करणे हा आहे.

गणेशोत्सव हा एकत्रितपणा, नवी सुरुवात आणि आनंद यांचा उत्सव आहे. बाप्पा हे विघ्नहर्ता, शुभसूचक आणि संरक्षणाचे प्रतीक आहेत. आमचे महा मोदक अभियान या मूल्यांचे प्रतीक आहे. भारतातील ग्रामीण व उपेक्षित भागांमध्ये अद्याप विम्याच्या कवचापासून वंचित असलेल्या कुटुंबांपर्यंत सुरक्षा व समृद्धीचा संदेश पोहोचवण्याचे आमचे ध्येय आहे, असे स्टार युनियन दाई–इची लाइफ इन्शुरन्सचे व्यवस्थापकीय संचालक आणि मुख्य कार्यकारी अधिकारी अभय तिवारी यांनी सांगितले.

हा उपक्रम केवळ उत्सवापुरता मर्यादित न राहता, अधिकाधिक कुटुंबांना विम्याच्या संरक्षणाखाली आणण्यासाठी आम्ही नवनवीन मार्ग शोधत राहू, असे अभय तिवारी यांनी पुढे सांगितले.

# सॅमसंगने मुंबईमध्ये ‘गॅलॅक्सी एम्पॉवर्ड’चा विस्तार केला, शिक्षकांना एआय आणि तंत्रज्ञान प्रशिक्षण देणार

**मुंबई, ३१ ऑगस्ट:** सॅमसंग या भारतातील सर्वात मोठ्या ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँडने आज त्यांचा अद्वितीय समुदाय–केंद्रित उपक्रम गॅलॅक्सी एम्पॉवर्डच्या मुंबई चॅप्टरला लाँच केले. या उपक्रमाचा शिक्षक, मुख्याध्यापक व शालेय प्रशासनाला अत्याधुनिक डिजिटल साधने व आधुनिक अध्यापन पद्धतींसह अधिक कुशल करत वर्गांमध्ये परिवर्तन घडवून आणण्याचा मनसुबा आहे.

नवी दिल्लीमध्ये हा उपक्रम यशस्वी ठरला, जेथे हा उपक्रम २५० हून अधिक शाळांपर्यंत पोहोचला आणि २,७०० हून अधिक शिक्षकांना प्रमाणित केले. या यशानंतर गॅलॅक्सी एम्पॉवर्ड आता देशाच्या शिक्षण परिसंस्थेवर दीर्घकालीन प्रभाव निर्माण करण्याच्या महत्त्वाकांक्षेसह भारताची आर्थिक व शैक्षणिक राजधानी मुंबईमध्ये आपली उपस्थिती वाढवत आहे.

मुंबईतील लाँच कार्यक्रमात महाराष्ट्र आणि शेजारच्या राज्यांतील २५० शाळांमधील ३५० हून अधिक शिक्षक व शाळाप्रमुख एकत्र आले, ज्यामधून या उपक्रमाला मिळत असलेली पसंती आणि शिक्षकांमध्ये व्यावसायिक विकासाची मागणी दिसून आली.

या कार्यक्रमाला महाराष्ट्राचे कौशल्य विकास, उद्योजकता व नाविन्यतता मंत्री मंगल प्रभात लोढा, युनेस्को, पॅरिसमधील भारताचे राजदूत (ॲम्बेसेडर) व कायमचे प्रतिनिधी विशाल व्ही. शर्मा आणि सीबीएसईचे सचिव हिमांशू गुप्तार यांच्यासह सॅमसंग इंडियाचे वरिष्ठ प्रमुख, शिक्षण तज्ञ आणि सीबीएसई, आयसीएसई, आयबी, आयजीसीएसई व राज्य मंडळांचे प्रतिनिधीत्व करणारे शेकडो शिक्षक उपस्थित होते.

''मुंबई भारतीय शिक्षणामधील नाविन्यतेच्या उत्सांहाचे प्रतिनिधीत्व करते. गॅलॅक्सी एम्पॉवर्डसह आम्ही देशभरातील शिक्षकांना आवश्यक साधनांसह सुसज्ज करत आहोत, ज्यामुळे ते विद्यार्थ्यांशी अधिक संलग्न होतील, त्यांच्यामध्ये जिज्ञासूवृत्ती निर्माण करतील आणि वर्गांमध्ये अर्थपूर्ण परिवर्तन घडवून आणतील. आमचा २०२५ पर्यंत २०,००० शिक्षकांना सक्षम करण्याचा दृष्टिकोन आहे आणि मुंबई त्या प्रवासामधील महत्त्वपूर्ण टप्पा आहे,'' असे सॅमसंग इंडियाचे एमएक्स बिझनेसचे वरिष्ठ उपाध्यक्ष राजू पुल्लन म्हणाले.

''भारत झपाट्याने प्रगतीच्यो दिशेने वाटचाल करत आहे आणि सॅमसंग गॅलॅक्सी एम्पॉवर्ड सारख्या उपक्रमांमधून कुशल, भविष्यासाठी सुसज्ज देश घडवण्याप्रती आमची संयुक्तध कटिबद्धता दिसून येते. प्रत्येक व्यक्तीने आपले सर्वोत्तम दिले तर कोणीही भारताला विश्व गुरू बनण्यापासून थांबवू शकत नाही. सॅमसंग यासंदर्भात प्रेरणदायी दिशा स्थापत करत आहे. शिक्षकांना सक्षम करत आपण एकत्रित समाजाच्या भविष्याला आकार देऊ आणि भारत नव्या उंचीवर पोहोचेल,'' असे महाराष्ट्राचे कौशल्य विकास, उद्योजकता व नाविन्याता मंत्री मंगल प्रभात लोढा म्हणाले.

# टाटा डिजिटल ओएनडीसी नेटवर्कवर क्रेडिटचे सार्वत्रिकीकरण करण्यात आघाडीवर

**मुंबई, ३१ ऑगस्ट :** टाटा डिजिटल* ओपन नेटवर्क फॉर डिजिटल कॉमर्स (ओएनडीसी) या आपल्या लवकर आणि प्रभावी अंगिकार केलेल्या नेटवर्कच्या माध्यमातून भारतात क्रेडिट क्सेसचे डेमोक्रटायझेशन (सार्वत्रिकीकरण) करण्याच्या कार्यात आघाडीच्या कंपन्यांपैकी एक म्हणून वेगाने उदयास येत आहे. ओएनडीसी वर वित्तीय सेवांसाठीच्या पहिल्या आणि सर्वात मोठ्या बायर प्लॅटफॉर्मपैकी एक म्हणून, टाटा डिजिटलने मागील ३ महिन्यांत आधीच १० लाखांहून अधिक वैयक्तिक कर्जासाठीची अर्ज प्रक्रिया सुलभ केली आहे. त्यामुळे ओएनडीसी नेटवर्कवर अर्ज, युजर्स आणि डिस्बर्सल्समध्ये सर्वाधिक वाटा मिळाला आहे.

ही महत्त्वपूर्ण सुरुवात म्हणजे टाटा डिजिटलचा व्यापक विस्तार, ग्राहकांचा विश्वास आणि विस्तृत पोहोच यांचा थेट परिणाम आहे. आणि हे ओएनडीसी च्या खुल्या, आंतरकार्यरत आणि डिजिटल सेवांसाठी सर्वसमाविष्ट चौकट तयार करण्याच्या मुख्य दृष्टीकोनाशी पूर्णपणे सुसंगत आहे. या प्रयत्नाच्या केंद्रस्थानी टाटा डिजिटलची मजबूत लोन मार्केटप्लेस असून ती टाटा न्यू ने होस्ट केली आहे. यामध्ये आता १४ लेंडिंग पार्टनर्स आहेत. त्यापैकी २ ओएनडीसी नेटवर्कद्वारे इंटिग्रेट केलेले आहेत. बहुविध वित्तपुरवठादार असलेली ही चौकट वेतनधारक आणि स्वयंरोजगार असणाऱ्या व्यक्तींना, तसेच नव्याने कर्ज घेणाऱ्यांना अधिक लवचिकता, स्पर्धात्मक दर आणि वैयक्तिकृत अर्ज पर्याय उपलब्ध करून देते.

टाटा डिजिटलच्या फायनान्शियल सर्व्हिसेसचे अध्यक्ष गौरव हझराती म्हणाले, ओएनडीसी नेटवर्कवरील आमच्या सहभागामुळे भारताच्या डिजिटल पब्लिक इन्फ्रास्ट्रक्चरला पाठबळ देण्याबरोबरच वित्तीय उत्पादने मिळविण्याच्या संधीचे सार्वत्रिकीकरण करण्याबाबत असलेली टाटा डिजिटलची बांधिलकी दिसून येते. टाटा न्यूवरील आमची लोन मार्केटप्लेस आता विविध उत्पादन विभागांमध्ये १४ लेंडर्ससोबत आहे. आम्ही विशेषतः गोल्ड लोनमध्ये मजबूत वाढ पाहिली आहे. या प्लॅटफॉर्मची बदलणारी बाजारपेठीय प्राधान्ये आणि ग्राहकांच्या गरजांशी जुळवून घेण्याची क्षमता यातून दिसते. ओएनडीसी नेटवर्कची ताकद वापरून आम्ही फक्त डिजिटल, अखंड आणि त्रासमुक्त कर्ज घेण्याचा अनुभव देत नाही, तर आपल्या देशातील दुर्लक्षित आणि वंचित वर्गांना सेवा देण्यासाठीही सक्रियपणे कार्य करत आहोत.

ओएनडीसी चे कार्यरत सीईओ आणि सीओओ विभोर जैन म्हणाले, ओएनडीसी नेटवर्क भारतात कर्ज कसे मिळते आणि वितरित केले जाते यात आमूलाग्र बदल करत आहे. एका सिंगल आणि सुलभ इंटिग्रेशनमुळे, फिनटेक्स त्वरित विस्तृत लेंडिंग पार्टनर्सच्या नेटवर्कशी जोडले जाऊ शकतात आणि हीच प्रक्रिया उलट पद्धतीनेही होते. ग्राहकांना प्रत्येक वित्तपुरवठादाराकडे स्वतंत्रपणे न जाता अनेक कर्ज पर्याय पारदर्शकपणे मिळतात. डिराईव्हड डेटाच्या शक्तीचा लाभ घेत हे ओपन आणि इंटरऑपरेबल नेटवर्क दुर्लक्षित आणि वंचित वर्गांना जबाबदारीने कर्ज देणे आणि विस्तार करणे शक्य करते. त्यामुळे मोठ्या प्रमाणावर खरे वित्तीय समावेशन साध्य होते. जिथे कर्ज मिळविणे ही सोपी, विनाअडथळा आणि सर्वसमावेशक प्रक्रिया असेल अशी शक्तिशाली, सर्वांना सामावून घेणारी कर्ज परिसंस्था तयार करणे हे आमचे अंतिम उद्दिष्ट आहे.

# भारतात एआय अवलंबनाला गती

**मुंबई, ३१ ऑगस्ट :** आज, मेटा रिलायन्स इंडस्ट्रीज लिमिटेड (आरआयएल) सोबत धोरणात्मक संयुक्त उपक्रम (जेव्ही) स्थापन करण्याचा आमचा हेतू जाहीर करत आहे. या उपक्रमाचा भारतीय उद्योगांसाठी लामावर आधारित एंटरप्राइझ एआय सोल्यूशन्स विकसित करण्यातचा मनसुबा आहे.

या सहयोगाची घोषणा करत मेटाचे संस्थासपक व मुख्यो कार्यकारी अधिकारी मार्क झुकरबर्ग म्हणाले, ''आम्हाला भारतातील डेव्हलपर्स आणि उद्योगांसाठी ओपन–सोर्स एआयची क्षमता आणण्यासाठी रिलायन्ससोबत आमचा सहयोग अधिक दृढ करण्यातचा आनंद होत आहे. या संयुक्त उपक्रमाच्या माध्यमातून आम्ही मेटाच्या लामा मॉडेल्स वास्तविक जगामध्ये वापरात आणत आहोत आणि मी मेटाला उद्योग क्षेत्रात त्यांची उपस्थिती वाढवताना पाहण्यासाठी उत्सुक आहे, जेथे आम्ही सहयोगाने नवीन क्षमता सादर करत आहोत.''

या सहयोगाची मुलभूत बाब म्हणजे मेटाची भारताप्रती अविरत कटिबद्धता आणि एआय तंत्रज्ञानाचे लोकशाहीकरण करण्याप्रती रिलायन्ससोबत त्याचे संयुक्त मिशन विक्री, विपणन, आयटी, ग्राहक सेवा, वित्त आणि इतर क्षेत्रांमध्ये विशिष्ट व्यावसायिक गरजांसाठी सर्वोत्तम एआय सोल्यूशन्स डिझाइन करण्यासाठी मेटाच्या ओपन–सोर्स लामा मॉडेल्सचा फायदा घेण्याचे या संयुक्तत उपक्रमाचे उद्दिष्ट असेल. हा संयुक्ता उपक्रम कंपन्यांना जनरेटिव्ह एआय ॲप्लिकेशन्स कस्टमाइझ आणि तैनात करण्यासाठी संपूर्ण सुरक्षित वातावरण देईल आणि क्रॉस–फंक्शन व उद्योग–विशिष्ट वापरामधील समस्यांचे निराकरण करण्यापसाठी आधीच कन्फिग्युअर केलेल्या एआय सोल्यूशन्सची श्रेणी देईल. डिजिटल पायाभूत सुविधांमध्ये आघाडीवर असलेल्या आरआयएलसोबत सहयोगामुळे भारतातील उद्योगांना एआय फायदे मिळतील. मेटाच्या लामा मॉडेल्स आरआयएलच्या प्रबळ डिजिटल पायाशी विनासायासपणे एकत्रित करून हा संयुक्ता उपक्रम कमी किमतीत उच्च कार्यक्षम मॉडेल्सचे प्रमाण वाढवण्यास सक्षम असेल. जिओचे विस्तृत कनेक्टिव्हिटी नेटवर्क आणि आरआयएलचे प्रगत एआय डेटा सेंटर्स खर्च कमी करण्यामध्ये, तसेच सुरक्षित, कमी–विलंब एआय तैनाती सुनिश्चित करण्यामध्ये महत्त्वपूर्ण भूमिका बजावतील.

# शॉप्सीकडून वर्षातील सर्वात मोठा सेल ‘ग्रँड शॉप्सी मेळा’ची घोषणा

**मुंबई, ३१ ऑगस्ट :** भारत आगामी सणासुदीच्या काळासाठी सज्ज असताना फ्लिपकार्टचा शॉप्सी त्यांचे बहुप्रतिक्षित शॉपिंग सेलिब्रेशन आणि वर्षातील सर्वात मोठा सेल 'ग्रँड शॉप्सी मेळा (जीएसएम)' परत घेऊन येत आहे. २९ ऑगस्ट ते ७ सप्टेंबरपर्यंत सुरू असणारा हा इव्हेण्ट थीम 'ऐसे गिरेंग दाम, शॉपिंग होगी सुबह शाम'सह अद्वितीय उत्साहाची खात्री देतो.

ग्राहक सणासुदीच्या काळादरम्यान त्यांच्या प्रियजनांना गिफ्टसह उत्साहित करू पाहत असताना शॉप्सी भारतभरातील कुटुंबांना बजेटमध्ये खरेदी करण्यास मदत करत आहे. यंदा, जीएसएममध्ये फॅशन, जीवनशैली, घरगुती साहित्य व सौंदर्य प्रसाधने अशा श्रेणीमधील १४९ रूपयांपेक्षा कमी किंमत असलेली १ कोटीहून अधिक उत्पादने आहेत, जी मूल्याप्रती जागरूक ग्राहकांसाठी काळजीपूर्वक डिझाइन करण्यात आली आहेत. जीएसएम किमतींसह अपवादात्मक मूल्य देईल, ज्यांची तुलना करता येऊ शकत नाही, ज्यामुळे हा आतापर्यंतचा सर्वात किफायतशीर फेस्टिव्ह शॉपिंग इव्हेण्ट आहे. द्वितीय, तृतीय व चतुर्थ श्रेणीच्या शहरांमधील लाखो ग्राहकांसाठी जीएसएम सणासुदीच्या काळाच्या शुभारंभाचे प्रतीक आहे, जो अद्वितीय किफायतशीर दरामध्ये आनंद देतो. सुधारित पुरवठा साखळी सुसज्जता आणि प्रत्येक उत्सवी गरजांसाठी सर्वोत्तम ऑफर्ससह शॉप्सी हा सीझनमधील शॉपिंगला अधिक उत्साहवर्धक, सहजसाध्य आणि सर्वसमावेशक करण्यासाठी सज्ज आहे.

फ्लिपकार्टच्या शॉप्सी व फ्लिपकार्ट मार्केटप्लेसचे व्यवसाय प्रमुख कपिल थिरानी म्हणाले, ''सणासुदीचा काळ जवळ आला असताना ग्रँड शॉप्सी मेळा भारतातील मूल्य–केंद्रित खरेदीचा प्रमुख स्रोत असण्यास सज्ज आहे. अद्वितीय किफायतशीरपणासह व्यापक श्रेणी देण्यासाठी डिझाइन करण्यात आलेला जीएसएम कुटुंबांना तडजोड न करता उत्सव साजरा करण्यास मदत करतो, तसेच विक्रेत्यांना द्वितीय, तृतीय व चतुर्थ श्रेणीच्या शहरांमधील लाखो नवीन ग्राहकांपर्यंत पोहोचण्यासाठी मजबूत प्लॅटफॉर्म देतो. आम्हाला विश्वास आहे की, हे पर्व फेस्टिव्ह शॉपिंगला अधिक आनंददायी, सर्वसमावेशक आणि मूल्य–केंद्रित करेल.''

जीएसएमचे हे पर्व खरेदीदारांना विक्रेत्यांकडून श्रेणींमधील आकर्षक ऑफर्स देईल. खरेदीदार मर्यादित कालावधीसाठी असलेल्या अद्वितीय व विलक्षण डिल्सचा आनंद घेऊ शकतात, जसे १५० रूपयांमध्ये बेडशीट्स, ९९ रूपयांमध्ये ड्रेसेस, १५० रूपयांमध्ये कुर्ता आणि इतर अनेक. ग्रँड क्रेझी ऑफर्स, झटपट डिल्स, तासाला किमतीमध्ये घट आणि लिमिटेड–स्टॉक स्पेशल्ससह जीएसएमला प्रत्येक भेट आनंद, विविधता व अद्वितीय बचतींची खात्री देते.

लाँच झाल्यापासून जीएसएम किफायतशीर फेस्टिव्ह शॉपिंगचे गंतव्य ठरले आहे, सतत भारतभरातील वाढत्या ग्राहकवर्गाचे लक्ष वेधून घेत आहे. सुधारित वेअरहाऊसिंग, वाढते लॉजिस्टिक्स आणि अतिरिक्त मनुष्यबळासह शॉप्सी वाढत्या मागणीची पूर्तता करण्यास सज्ज आहे, ज्यामधून चतुर्थ श्रेणीच्या दुर्गम शहरांसह देशभरात सहजपणे डिलिव्हरींची खात्री मिळते.

शॉप्सी ॲप व वेबसाइटवर अद्वितीय ऑफर्स आणि उत्साही, आनंदमय शॉपिंग अनुभवाचा आनंद घ्या.

# गावात नवा ट्विस्ट: माएरा मिश्रा वाइल्ड कार्ड स्पर्धक म्हणून सहभागी!

**मुंबई, ३१ ऑगस्ट :** छोरियाँ चली गाँवच्या स्पर्धकांमध्ये अनिता हसानंदानी, अंजुम फकीह, कृष्णा श्रॉफ, डॉली जावेद, एरिका पॅकार्ड, रमीत संधू, सुरभी आणि समृद्धी मेहरा यांनी या स्पर्धेत मनापासून आपल्या प्रयत्न, ताकद आणि उत्साह ओतले आहेत. गावात चिकाटी, हशा आणि बदलाचे अनेक क्षण पाहायला मिळाले असले तरी हा शो या आठवड्यात प्रेक्षकांसाठी एक रोमांचक ट्विस्ट घेऊन आला. गणेश चतुर्थीच्या खास एपिसोडमध्ये लोकप्रिय अभिनेत्री माएरा मिश्रा पाहुणी म्हणून आली, पण सर्वांना आश्चर्यचकित करत तिने जाहीर केले की ती आता अधिकृतपणे वाइल्ड कार्ड एन्ट्री म्हणून राहणार आहे!

भाग्यलक्ष्मी मधील भूमिकेद्वारे प्रेक्षकांची मने जिंकून आता नव्या रिॲलिटी शोमध्ये पाऊल टाकत माएरा मिश्रा आपल्या पुढच्या मोठ्या पर्वासाठी सज्ज झाली आहे. आपल्या प्रभावी अभिनयासाठी आणि ताकदीच्या पडद्यावरील उपस्थितीसाठी ओळखली जाणारी माएराने टेलिव्हिजनवर एक निष्ठावान चाहतावर्ग निर्माण केला आहे आणि आता ती स्वतःचा एक वेगळाच पैलू सादर करणार आहे. गावात प्रवेश करताना माएरा शहरातील सुखसोयी बाजूला ठेवून ग्रामीण जीवनाचा साधेपणा स्वीकारणार आहे. ताकद, चिकाटी आणि आत्मबलाची परीक्षा घेणाऱ्या आव्हानांना सामोरे जात ती हा अनुभव मनापासून जगण्यासाठी उत्सुक आहे.

आपल्या एन्ट्रीबद्दल बोलताना माएरा मिश्रा म्हणाली, छोरियाँ चली गाँवचा भाग बनताना मला खूप आनंद होत आहे. या शोची संकल्पना आणि स्पर्धकांचे धैर्य पाहून मी खूप प्रेरित झाले आहे. वाइल्ड कार्ड एन्ट्री म्हणून येणे हे रोमांचक तर आहेच, पण थोडे भीतीदायकही आहे. याचा अर्थ मला पटकन सगळे समजून घ्यावे लागेल, जलदगतीने जुळवून घ्यावे लागेल आणि पूर्णपणे नवीन वातावरणात स्वतःला सिद्ध करावे लागेल. पण हाच भाग मला सर्वात जास्त उत्साहित करतो. हा शो मला एक व्यक्ती म्हणून वाढण्याची, जीवन त्याच्या साध्या पण कठीण रूपात अनुभवण्याची आणि लोकांशी खरीखुरी नाती जोडण्याची संधी देतो. मला वाटतं प्रेक्षक माझा असा एक पैलू पाहतील जो त्यांनी कधी पाहिलाच नाही अगदी विना फिल्टर, प्रामाणिक आणि ठाम. पुढे काय आहे हे अनुभवण्यासाठी मी खूप उत्सुक आहे आणि गावातील प्रत्येक क्षणाचा पूर्ण आनंद घेण्यासाठी आतुर झाले आहे.

मायरा छोरियाँ चली गाँवमध्ये सहभागी होत असल्याने तिच्या उपस्थितीमुळे स्पर्धेत नवा जोश आणि वेगळे समीकरण येणार आहे. प्रेक्षकांसाठी नवी आव्हाने, नात्यांमध्ये बदल आणि आणखी काही आश्चर्यचकित करणाऱ्या गोष्टींचा ठेवा घेऊन हा प्रवास सज्ज आहे.


## आज का अंदाज

सोमवार १ सप्टेंबर २०२५
जबरदस्त पास होणारे चान्सेस
पत्थर फोड एकच

कल्याण बाजार

| 2 | 5 | 6 | 9 |
|---|---|---|---|
| 141 | 690 | 790 | 234 |
| 390 | 780 | 600 | 379 |
| 200 | 500 | 457 | 478 |
| 21 | 51 | 60 | 90 |
| 24 | 54 | 68 | 98 |
| 23 | 53 | 67 | 97 |

मुंबई बाजार

| 3 | 4 | 5 | 8 |
|---|---|---|---|
| 120 | 167 | 456 | 189 |
| 300 | 356 | 357 | 279 |
| 229 | 220 | 258 | 369 |
| 31 | 41 | 59 | 89 |
| 32 | 42 | 57 | 87 |
| 33 | 44 | 55 | 88 |

१ सप्टेंबर २०२५
सर्व बाजारांसाठी

| | | | |
|---|---|---|---|
| 02 | 12 | 46 | 73 |
| 05 | 15 | 49 | 76 |
| 08 | 18 | 43 | 79 |

सर्व बाजारांसाठी सिंगल अंक
ओपन टू क्लोज
8 9 0 1 2

कल्याण, मुंबई आणि सर्व बाजारासाठी 60 पानांचा चार्ट मिळेल. 100 टक्के खात्रीशीर.

प्रो. बालाजी कुमार
9822486034


# रिद्धिमा पंडितची लताच्या रूपात ग्लॅमरस एंट्री

**मुंबई, ३१ ऑगस्ट :** सोनी सबवरील उफ्फ ये लव है मुश्किल ... मध्ये नवीन दमदार एंट्रीमुळे कथेतील रोमांच वाढला असून युग (शब्बीर अहलूवालिया) आणि कैरी (आशी सिंह) यांच्या विश्वातदेखील खळबळ माजली आहे. अभिनेत्री ऋद्धिमा पंडित लताच्या भूमिकेत मालिकेत दाखल होत आहे. ही अशी व्यक्तिरेखा आहे जिला एक भूतकाळ आहे आणि जिच्या मोहक अदांमध्ये आणि रहस्यमयतेत मित्र आणि शत्रू यांच्यातील रेष धूसर होते.

लता काही या कथानकातील साधेसुधे पात्र नाही. ती आकर्षक, ठरेल आणि मोहक आहे. आपल्या आधुनिक शैलीने आणि सौंदर्याने ती लोकांचे लक्ष वेधून घेते आणि त्यांच्या नकळत त्यांना मुग्ध करते. वरवर पाहता ती उमद्या स्वभावाची आणि संभाषण–चतुर आहे. पण त्याच्या मागे तिचे चलाख डोके आहे. लोकांच्या मनाचा ती बरोबर अंदाज घेते. समोरच्याची दुखरी बाजू ओळखून आपल्या फायद्यानुसार तिला गोष्टी वळवता येतात. तिच्या भावनिक बुद्धीमत्तेत तिची ताकद दडलेली आहे. समोरच्याच्या नकळत ती त्याच्यावर ताबा मिळवते.

आपल्या भूमिकेविषयी बोलताना ऋद्धिमा पंडित म्हणते, लताची भूमिका स्वीकारताना मला तिच्या स्वभावातील गुंतागुंत फार आवडली होती. ती सुंदर आणि ग्लॅमरस आहे पण तिची खरी ओळख ही नाही. ती बोलण्यात हुशार, चलाख आहे आणि स्वतःचा फायदा कसा करून घ्यावा हे तिला बरोबर समजते. तिच्या स्वभावाचा अंदाज बांधणे कठीण आहे. कधी ती फटकळ वाटते तर कधी फारच मोहक वाटते. त्यामुळे तिच्याबाबतीत तुम्हाला बेसावध राहून चालत नाही. एक अभिनेत्री म्हणून लालित्य आणि धोका यामधील बारीक रेषेवर चालणारी व्यक्तिरेखा साकारणे थरारक आहे. लता नक्कीच युग आणि कैरीच्या जीवनात खळबळ माजवणार आहे. प्रेक्षकांना नक्कीच तिची कहाणी जाणून घेण्याची उत्सुकता वाटेल.

# राशीभविष्य

**मेष :** आजचा दिवस खूप व्यस्त राहणार आहे. आज तुम्ही तुमच्या व्यवसायात काही बदल करण्याची योजना आखाल, ज्यामुळे तुम्हाला भविष्यात चांगले फायदे मिळतील.

**वृषभ :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप चांगला जाणार आहे. आज तुम्हाला नोकरीत नवीन संधी मिळतील, ज्याचा फायदा घेऊन तुम्ही तुमचा व्यवसाय वाढवू शकता. आज कामासाठी खूप धावपळ होईल.

**मिथुन :** आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल असेल. आज तुमची आवश्यक आणि महत्त्वाची कामे पूर्ण होतील, ज्यामुळे तुमचा आत्मविश्वास वाढेल. आज दुकान किंवा घराशी संबंधित काम सुरू करू शकता.

**कर्क :** आज तुम्ही मित्रांसोबत पिकनिकला जाऊ शकता, तुम्हाला त्याचा आनंद मिळेल. घरासाठी आरामदायी वस्तूंची खरेदी होईल. सहकाजयांच्या मदतीने सर्व कामे पूर्ण होतील.

**सिंह :** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. आज तुम्ही तुमच्या वडिलांशी काही कामाबद्दल बोलाल, ज्यामध्ये ते तुम्हाला पूर्ण सहकार्य करतील. आज कौटुंबिक जबाबदाजया पूर्ण कराल.

**कन्या :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप चांगला असेल. आज तुम्ही तुमचे काम उत्तम पद्धतीने कराल, ज्यामुळे बॉस तुमची प्रशंसा करतील. आज तुमचे नोकरीशी संबंधित काम यशस्वी होईल.

**तूळ :** आजचा दिवस तुमच्यासाठी अनुकूल असेल. आज ऑफिसमध्ये तुमच्या कामगिरीचे कौतुक केले जाईल आणि कनिष्ठ कर्मचारीही तुमच्याकडून शिकण्याचा प्रयत्न करतील.

**वृश्चिक :** आजचा दिवस तुमच्यासाठी खूप चांगला असेल. आज तुम्ही संपूर्ण दिवसासाठी एक ध्येय ठेवून काम कराल, ज्यामुळे तुमचे बहुतेक काम पूर्ण होईल. आज सार्वजनिक क्षेत्रात तुमची प्रतिमा चांगली असेल.


**धनु :** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला असेल. आज तुमचे व्यावसायिक व्यवहार सुरळीत सुरू राहतील आणि तुमचे व्यावसायिक संबंधही मजबूत होतील. आज उत्पन्नासोबतच तुमचे खर्चही वाढतील.

**मकर :** आज तुम्ही नवीन योजनांबाबत खूप उत्साहित असाल. आज तुम्ही कौटुंबिक आणि सामाजिक उपक्रमांमध्येही योगदान द्याल. तुमची आर्थिक स्थिती मजबूत होईल.

**कुंभ :** आज तुम्हाला व्यवसायातील प्रलंबित काम पूर्ण करण्यात यश मिळू शकते, ज्यामुळे तुम्ही इतर कामांचे नियोजन देखील कराल. नातेवाईकाच्या आगमनामुळे घरातील वातावरण आनंदी असेल.

**मीन :** आजचा दिवस तुमच्यासाठी चांगला जाणार आहे. आज तुम्ही तुमचे जीवन योग्य दिशेने घेऊन जाल आणि लवकरच तुम्हाला चांगले परिणाम मिळतील. आज वडीलधाजयांचा सहवास मिळेल.

# शब्दकोडे क्रमांक २२०७



**आडवे शब्द :–**
१) काडीमोड, विवाहविच्छेद करणे, (वा. प्र.)
५) निर्लज्ज
९) पोपट
१०) करवत
११) मृत्युदेवता
१३) पहिला ऋतू
१५) ग्रणाची सावली
१८) हृदय
१९) घरोघरी प्याले जाणारे एक पेय
२०) नमन
२१) प्रयत्न
२३) ढग
२५) ममता, प्रेम
२७) अंतःकरण
२८) क्षमा मागणारा
३०) तेजाब चित्रपटातील पाढ्यांचे गीत
३३) दशानन
३५) कासवाची पाठ
३६) कुबेराचा सेवक
३७) एक कोल्हापुरी दागिना
३९) ताडाच्या झाडाचा बुंधा
४१) प्रार्थना, उपासना
४३) हात व पंजा यांना जोडणारा अवयव
४५) मायापाश नसलेला, एकटा
४६) अग्रलेख लिहिणारा
४७) पवित्र, शुद्ध
५०) गाय
५१) मोठी टोपली
५२) पचेल असे खोटे कारण
५६) द्रव्य
५८) चौक
५९) मद्य, दारू, पश्चिम दिशा
६०) स्वतःला
६१) अवस्था, स्थिती
६२) दिवस
६३) मुक्काम
६४) मेहुणा
६५) पंख
६६) सदन
६७) दया
६८) मनाला वाटणारी अशाश्वततेची भीती
७०) रचणे, रचण्याची मजुरी
७२) राज्य
७३) अर्णव, समुद्र
७४) प्रजा

**उभे शब्द :–**
१) पदर
२) लग्नानंतरची मिरवणूक
३) लबाडीचा हेतू
४) शहर
५) आकार नसलेला
६) संगीतातील एक राग
७) सीता पती
८) संध्याकाळ
१२) मुंबईचा घरगडी
१४) लोकसभा
१५) पार्वती, आदिमाया
१६) अरण्य
१७) दुतोंडी चर्मवाद्य
२२) खानेसुमारी
२३) लांबचे नातेसंबंध
२४) रोगाची पूर्वचिन्हे दिसू लागणे
२६) मागणारा
२९) केर
३०) सर्व प्रकारची दुःखे
३१) धागा
३२) पती, यजमान
३४) छाती
३७) छोटी ताटली
३८) सृष्टी, विश्व
४०) डफावर गाणे म्हणणारा
४१) जाळ, ज्वाला, दाह
४२) हादरा
४३) कामदेव
४४) डाक
४५) वर्ष, साल
४८) अरण्यवास
४९) वरचा भाग
५१) दरोडा
५२) नवनीत
५३) कमळाचे तळे
५४) सैल
५५) स्वतःच्या जवळचा
५७) बाजेची कापडी पट्टी
५८) विड्याची पाने तोडण्याचे एक वाकडे हत्यार
६३) शेत, जाणे–येणे, राबता
६४) सात्विक वृत्तिचा, पुण्यात्मा पुरुष
६५) पुन्हा
६६) मोठा हातोडा
६८) जरब, भीती
६९) हात
७१) परमेश्वर


(उत्तर उद्याच्या अंकात)

## मागील शब्दकोड्याचे उत्तर

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| उ | दं | ड | | क | म | त | र | ता | | ख | | पा | या |
| | त | | स | प | क | | ज | न | म | त | | य | |
| आ | मं | त्र | ण | | रं | गी | त | | ज | रा | बा | ज | रा |
| | ज | स्त | | म | द | त | | सा | ल | | र | मा | |
| भा | न | | म्या | न | | क्र | व | | द | ण | क्र | | उ |
| र | | क्र | न | | प | र | स | दा | र | | | पा | प |
| ती | र | क | मा | न | | | न | र | म | चा | रा | | वि |
| य | म | | र | म | णी | य | | | ज | | व | ळ | भा |
| ज | | उ | | स्का | | था | रा | | ल | व | ण | | ग |
| न | ग | र | क | र | | सं | म | ती | | | भा | ग | |
| ता | र | क | स | | ला | भ | | | म | द | त | नी | स |
| प | | णे | | सं | भ | व | नी | य | | स | | म | ग |
| क्ष | मा | | खा | | दा | | र | म | ता | रा | म | | ळी |
| | न | वा | र | | य | क्ष | | न | ल | | य | म | क |
| आ | व | ळा | | र | क | मा | ला | | व्य | थि | त | | डे |

# निधी वळविण्याचा आरोप खोडून काढला

**पत्रावरच अडकले प्रकरण ? | आजी आणि माजी आमदार आमने-सामने**



दिनांक 15 ऑक्टोंबर 2024 ला बच्चू कडू यांनी 14 ऑक्टोबर च्या शासन निर्णयानुसार दोन कोटी वीस लाख रुपये च्या कामांमध्ये बदल करण्यासाठी दिलेले पत्र.

(सदर पत्र हे प्रवीण तायडे यांनी दाखविले पत्रकार परिषद नुसार आहे?




भाजप च्या पत्रकार परिषद मध्ये उपस्थित आमदार प्रवीण तायडे आणि अन्य फोटो



प्रहार च्या पत्रकार परिषद प्रसन्न अढाव व इतर लेटर पॅड बद्दल सांगताना



सोशल मीडियावर व्हायरल होत असलेले आमदार प्रवीण तायडे यांचे पत्र दिनांक 9. 5. 2025



दिनांक 21 मे 2025 ला पत्रकार परिषद मध्ये दाखवलेले बच्चू कडू यांचे पत्र

**महासागर प्रतिनिधी**
**चांदूर बाजार, (दि. 31)** – अचलपूर मतदारसंघातील दहा कोटी रुपयांचा निधी वळविण्याच्या प्रकरणाने सध्या जिल्ह्यातील राजकारण चांगलेच तापविले आहे. सुरुवातीला सोशल मीडियावर आलेल्या बातमीनुसार या निधीपैकी साडेसात कोटी रुपये मोर्शी-वरुड मतदारसंघात वळविण्यात आल्याची चर्चा झाली. यामुळे विद्यमान आमदार प्रवीण तायडे यांच्यावर निष्क्रीय असल्याचे आरोप झाले. मात्र 30 ऑगस्ट रोजी अमरावती येथे घेतलेल्या पत्रकार परिषदेत आमदार तायडे यांनी निधी माझ्या कारणाने नव्हे, तर तत्कालीन आमदार बच्चू कडू यांच्या पत्रावरच वळविला गेला, असा धक्कादायक खुलासा केला.

त्यांनी माहिती अधिकारातून काढलेले दस्तऐवज दाखवत 21 ऑक्टोबर 2024 रोजी बच्चू कडू यांनी निधी बदलण्याचे पत्र दिले आणि लगेच दुसऱ्याच दिवशी उपमुख्यमंत्री कार्यालयाने आदेश जारी केले, असे सांगितले. यामुळे मंत्रालय स्तरावर इतक्या झपाट्याने काम कसे झाले यावर अनेकांनी शंका उपस्थित केली. पत्रकार परिषदेत शिवराय कुलकर्णी, मुरली माकोडे, रुपेश ढेपे, प्रमोद कोरडे उपस्थित होते.

दुसरीकडे प्रहार पक्षाने मात्र उलट आरोप करत तायडे यांनीच 9 मे 2025 रोजी पत्र दिले असून त्यावरून निधी वळवला गेला, असा दावा केला. तसेच बच्चू कडू यांच्या नावाने फिरविण्यात आलेले पत्र खोटे, बनावट लेटरपॅडवर लिहिलेले व सहीसुद्धा खोटी असल्याचे सांगण्यात आले. पण त्यांच्याकडे असलेले तायडे यांचे पत्र कुठून मिळाले याचा खुलासा मात्र झाला नाही.

हा पत्र प्रकरणाचा खेळ पोलीस स्टेशनपर्यंत पोहोचला आहे. भाजपचे तालुका अध्यक्ष रमेश तायवाडे यांनी प्रहारने दाखवलेले तायडे यांचे पत्र खोटे असल्याचा आरोप करून याप्रकरणी चांदूर बाजार पोलिसांकडे तक्रार दाखल केली आहे. याबाबत ठाणेदार अशोक जाधव यांनी प्रतिक्रिया देण्यास टाळाटाळ केली. दुसरीकडे प्रहारकडूनही बनावट पत्राविरोधात तक्रार होणार असल्याचे सूत्रांकडून समजते.

यामुळे शेवटी अचलपूर मतदारसंघासाठी आलेला साडेसात कोटी रुपयांचा निधी मोर्शी-वरुडकडे वळविल्याने मतदारसंघात नाराजी पसरली असून या प्रकरणाचा राजकीय परिणाम होणार हे निश्चित आहे. आता कोणते पत्र खरे आणि कोणते बनावट याचा तपास कोण करणार हा मोठा प्रश्न आहे.

## 157 आमदारांनी निधी बदलला

राज्यातील 157 आमदारांनी आपल्या मतदारसंघात निधी बदलण्यासाठी पत्र दिले आहे. मात्र अचलपूरचे तत्कालीन आमदार बच्चू कडू यांनी मात्र निधी दुसऱ्याच मतदारसंघात वळवला, असा दावा तायडे यांनी केला.

## तायडे यांना ठेवले अंधारात ?

दहा कोटी रुपयांचा निधी बदलला जात असताना स्थानिक आमदारांना माहितीच देण्यात आली नाही. त्यामुळे तायडे यांना मुद्दाम अंधारात ठेवले का? हा प्रश्न उपस्थित होत असून पत्रव्यवहाराची सत्यता तपासण्याची मागणी होत आहे.



पथ्रोट- माजी पंचायत समिती सभापती नितिन पटेल (पांढरी खा.) यांच्या कडील महालक्ष्मी.

**मावळे यांच्या गणपतीला 106 वर्षांची परंपरा**



दर्यापूर - कोकर्डा येथील मावळे कुटुंबाकडे 1919 पासून गणेशोत्सव साजरा केला जात असून यंदा 106 वे वर्ष आहे. दहा दिवस आरती, भजन, पूजन तसेच स्नेहभोजन आयोजित केले जाते. परंपरा पुढेही कायम ठेवण्याचा संकल्प कुटुंबीयांनी व्यक्त केला.

**गणराया गजराजांच्या गाभाऱ्यात देखावा**



दर्यापूर - गणेशोत्सवाला उत्साहपूर्ण सुरुवात झाली असून, घरोघरी बाप्पांना विविध सजावटीत विराजमान करण्यात आले आहे. स्टेट बँक ऑफ इंडियाच्या पाठीमागे राहणाऱ्या महेश कलंत्री यांच्या कुटुंबीयांनी यंदा 'गणराया गजराजांच्या गाभाऱ्यात' हा देखावा साकारला आहे. यात महादेव, कैलास पर्वत, तसेच केदारनाथ मंदिराचे दर्शन घडविण्यात आले. ही अभिनव संकल्पना शिवानी व हर्षिका कलंत्री यांनी उभी केली. याआधी चंद्रयान, कमळावरील बाप्पा, मोरपंखावरील गणेश असे देखावे त्यांनी साकारले होते. या उपक्रमाचे सर्वत्र कौतुक होत असून श्रद्धा व कलेचा सुंदर संगम यात अनुभवता येतो.




# भन्ते संघरक्षित यांचा जन्मशताब्दी महोत्सव साजरा

**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव बारी, (दि. 31)** – ऊर्गेन संघरक्षित इंटरनॅशनल स्कूलमध्ये त्रिरत्न बौद्ध महासंघाचे संस्थापक पुज्य भंते ऊर्गेन संघरक्षित यांचा 100 वा जन्मशताब्दी महोत्सव मोठ्या उत्साहात पार पडला.

कार्यक्रमाला प्रमुख अतिथी म्हणून धम्मचारी आर्यसिद्धी, धम्मचारिणी पद्ममणी, आनंद माध्यमिक विद्यालयाचे मुख्याध्यापक संदीप रक्षित (धम्मचारी रत्नराज), स्मिता रक्षित व शाळेच्या मुख्याध्यापिका प्रविणा चिंचोळे आदी उपस्थित होते. सूत्रसंचालन सिद्धी किशोर मेश्राम (इ.9 वी) हिने केले. प्रारंभी आदर्शपूजन व 'अत्त दीप भव' प्रार्थना गीत सादर करण्यात आले. विद्यार्थिनींनी भंतेंच्या जीवनावर आधारित गाणे सादर केले. संदीप रक्षित यांनी भंते संघरक्षित यांच्या कार्याचा परिचय करून दिला. प्रमुख अतिथी धम्मचारी आर्यसिद्धी यांनी विद्यार्थ्यांना उत्तम शिक्षकातील गुण, खऱ्या मैत्रीचे महत्त्व तसेच त्रिरत्न बौद्ध महासंघाचे 56 देशांतील कार्य याबाबत मार्गदर्शन केले. शिक्षिका चारुशीला पंडित यांनी भंतेंच्या जीवनातील महत्त्वपूर्ण पैलूंची माहिती दिली. शेवटी त्यांच्या आयुष्यावर आधारित चित्रफीत दाखवण्यात आली व शिक्षिका दिक्षा वाहणे यांनी त्याविषयी माहिती दिली. कार्यक्रमाच्या समारोपाला मुलांना खाऊ वाटप करून जन्मशताब्दी महोत्सव साजरा करण्यात आला.

# मोर्शी येथील सिंभोरा चौकात रंगला दहीहंडीचा थरार!

## शिवतांडव गोविंदा पथकाला प्रथम पारितोषिक





**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, (दि. 31)**– तालुका राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष व माजी आमदार देवेंद्र भुयार मित्र परिवाराच्या वतीने सिंभोरा चौक येथे 25 ऑगस्ट रोजी भव्य दहीहंडी महोत्सवाचे आयोजन करण्यात आले. संध्याकाळी सहा वाजता सुरू झालेल्या या कार्यक्रमाला मोर्शी तालुक्यासह परिसरातील नागरिकांनी मोठी उपस्थिती लावली.

दरवर्षीप्रमाणे यावर्षीदेखील माजी आमदार देवेंद्र भुयार यांच्या संकल्पनेतून दहीहंडीचा थरार रंगला. या स्पर्धेत शिरजगाव कसबा येथील शिवतांडव गोविंदा पथकाने बाजी मारत प्रथम पारितोषिक म्हणून 51,000 रुपये मिळवले, तर कालभैरव गोविंदा पथकाला द्वितीय पारितोषिक 31,000 रुपये देण्यात आले. तसेच सहभागी सर्व टीमना प्रोत्साहनपर बक्षीसे मान्यवरांच्या हस्ते प्रदान करण्यात आली.

या कार्यक्रमाचे उद्घाटन माजी आमदार देवेंद्र भुयार यांच्या हस्ते व जिल्हा परिषदेच्या माजी अध्यक्षा सुरेखा ठाकरे यांच्या अध्यक्षतेखाली पार पडले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीचे जिल्हाध्यक्ष संतोष महात्मे, प्रदेश सदस्य बाळासाहेब कोहळे, डॉ. मोनाली भुयार, राजेश बर्वे, प्रवीण भुजाडे यांच्यासह मोर्शी-वरुड भागातील पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# तरोडा येथे विश्व मांगल्य बालसभा

**विद्यार्थ्यांनी चित्रकला व नृत्य सादरीकरणातून दाखवली कला**



**महासागर प्रतिनिधी**
**मोर्शी, (दि. 31)**– तालुक्यातील जिल्हा परिषद प्राथमिक शाळा, तरोडा येथे डॉ. वसुधा बोंडे यांच्या प्रेरणेने व विश्व मांगल्य सभा मोर्शीच्या अध्यक्षा प्रतिभा राऊत यांच्या अध्यक्षतेखाली विश्व मांगल्य बालसभा पार पडली.

या प्रसंगी उपाध्यक्ष शितल गेडाम, सचिव अनीता लांजेवार, बालसंयोजिका कविता ठाकरे, गावाच्या सरपंच उषा आढाव तसेच शाळेच्या मुख्याध्यापिका संगीता खडतकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. शाळेच्या विद्यार्थ्यांनी गणेशमुर्ती, मोदक सजावट या विषयांवर सुंदर चित्रे रेखाटली तसेच नृत्य सादरीकरणाने सर्वांची मने जिंकली. अध्यक्षा प्रतिभा राऊत यांनी विश्व मांगल्य व मातृशक्ती यावर मार्गदर्शन केले. कविता ठाकरे यांनी गणपती नाममहिमा सांगितला. सरपंच उषा आढाव यांनी शिक्षक हा कुंभाराप्रमाणे विद्यार्थ्यांना घडवतो असे प्रतिपादन केले. या कार्यक्रमाला गावातील पालकवर्गासह मोठ्या संख्येने नागरिक उपस्थित होते. शितल अढाऊ, सपना अढाऊ, जयश्री अढाऊ, अरूणा वानखडे, प्रज्ञा ढोक, माधुरी धारुडे, आश्विनी शंकरपाडे, मनिषा शंकरपाडे, जयश्री शेरेकर, सपना आठवले, छाया शंकरपाडे आदींसह अनेक मान्यवरांनी सहभाग नोंदवला.

# राजकुमार पटेल पाचव्यांदा बदलणार पक्ष

## काँग्रेसमध्ये प्रवेश करणार ?

**महासागर प्रतिनिधी**
**चुरणी, (दि. 31)**– मेळघाटचे माजी आमदार राजकुमार पटेल पुन्हा एकदा चर्चेत आले असून ते काँग्रेसमध्ये प्रवेश करणार अशी चर्चा वेगाने पसरली आहे. येत्या 3 सप्टेंबरला काँग्रेसचे प्रदेशाध्यक्ष हर्षवर्धन सपकाळ अमरावती दौऱ्यावर येणार आहेत. त्यावेळी पटेल यांचा पक्षप्रवेश होण्याची शक्यता वर्तवली जात आहे. गेल्या 25 ते 30 वर्षांपासून मेळघाटचे राजकारण पटेल यांच्या भोवती फिरते आहे. ग्रामपंचायत, जिल्हा परिषद ते लोकसभा अशा सर्वच निवडणुकांमध्ये त्यांचे नाव नेहमीच अग्रस्थानी राहिले आहे. राजकारणाचा वारसा लाभलेल्या पटेल यांचे वडील दयाराम पटेल मंत्री होते. विद्यार्थी दशेतच त्यांनी समाजकारणाला सुरुवात केली. 1995 मध्ये बहुजन समाज पक्षाकडून त्यांनी पहिली निवडणूक लढवली. 1999 आणि 2004 मध्ये भाजपकडून आमदार झाले. 2009 मध्ये थोडक्या मताने पराभव पत्करावा लागला. 2014 मध्ये राष्ट्रवादी काँग्रेसकडून निवडणूक लढवली पण पुन्हा पराभव झाला. 2019 मध्ये प्रहारच्या पाठिंब्याने अपक्ष म्हणून विक्रमी मतांनी विजय मिळवला. मात्र 2024 मध्ये प्रहारकडून निवडणूक लढवत असताना त्यांचा मोठ्या फरकाने पराभव झाला. त्यांच्या या राजकीय कारकिर्दीत आतापर्यंत पाच वेळा पक्षबदल झाले आहेत. तरीही मेळघाटात त्यांना मानणारा मोठा वर्ग आहे. दांडगा संपर्क आणि व्यक्तिगत ओळख ही त्यांची ताकद मानली जाते. त्यामुळे त्यांचा काँग्रेस प्रवेश झाल्यास पक्षाला काही प्रमाणात फायदा होईल, अशी चर्चा सुरू आहे. मात्र, त्यामुळे काँग्रेसमधील जुने कार्यकर्ते नाराज होण्याची शक्यता नाकारता येत नाही. मेळघाटातील आगामी राजकीय समीकरणे ठरवण्यासाठी 3 सप्टेंबरला पटेल कोणता निर्णय घेतात याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.



# गावंडगाव बु. शेतकऱ्यांचा हंबरडा

**दरवर्षी पिकांचे प्रचंड नुकसान | नुकसान भरपाई व कायमस्वरूपी उपाययोजनांची मागणी**



**महासागर प्रतिनिधी**
**अंजनगाव सुर्जी, (दि. 31)**– मौजा गावंडगाव बु. येथील शेतकऱ्यांचा उदरनिर्वाह दरवर्षी पाण्याच्या तडाख्यामुळे डळमळीत झाला आहे. चिंचोली बु. ते गावंडगाव बु. या मार्गाने येणारे पाणी थेट शेतात शिरून शेती खरडून टाकते, उभ्या पिकांचा विलय होतो आणि शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढवते..येथील बहुतांश शेतकरी अल्पभूधारक असून सरासरी 1.50 हेक्टर जमिनीतच ते कसब करून उदरनिर्वाह भागवतात. मात्र पिकांचे सतत होणारे नुकसान, त्यातही नुकसानभरपाई न मिळाल्याने त्यांची आर्थिक स्थिती ढासळली आहे. तलाठी व कृषी सेवकांनी पाहणी केली असली तरी अहवाल कधीच शेतकऱ्यांपर्यंत पोहोचत नाही, अशी तक्रार त्यांनी केली.

## बांध फुटल्या ने नुकसान

बांध फुटल्यामुळे शेत खरडून गेले, पिके नष्ट झाली. दरवर्षी हाच प्रश्न कायम राहतो, पण प्रशासन फक्त पाहणी करून फाईल दाबून टाकते. आमच्यावर आत्महत्येची वेळ येते आहे. आम्हाला योग्य नुकसानभरपाई मिळावी आणि वाहत्या पाण्याचा कायमस्वरूपी बंदोबस्त व्हावा, असे शेतकरी शिल्पा महेंद्र कात्रे यांनी सांगितले.

## प्रशासनाकडे मागणी

शेतकऱ्यांनी तहसीलदार, जिल्हाधिकारी, बांधकाम विभाग तसेच मंडल अधिकाऱ्यांकडे निवेदन दिले असून, तातडीने ठोस उपाययोजना करून कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी आर्त मागणी केली आहे. अन्यथा शेतकरी तीव्र आंदोलनाचा इशारा देत आहेत.

# जिजाऊ बँकेने निर्माण केली नव उद्योजकांकरिता संधी

## आमदार सुलभा खोडके




**महासागर प्रतिनिधी**
**अमरावती, (दि. 31)** – जिजाऊ कमर्शियल को-ऑपरेटिव्ह बँकेतर्फे नवउद्योजकांसाठी नवउद्योगांना संधी आणि आर्थिक साक्षरता या विषयावर कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले. या कार्यशाळेत प्रमुख अतिथी म्हणून आमदार सुलभा खोडके यांनी मार्गदर्शन केले. त्यांनी सांगितले की, जिजाऊ बँकेचा हा उपक्रम युवकांसाठी अत्यंत स्तुत्य असून, नवउद्योजकांनी याचा फायदा घ्यावा.

कार्यक्रमाचे उद्घाटन आमदार संजय खोडके यांच्या हस्ते झाले. त्यांनी अमरावती शहरात औद्योगिक विकासासाठी जिजाऊ बँकेचे योगदान महत्त्वाचे असल्याचे सांगितले. टाटा समूहाच्या सहकार्याने अमरावती अभियांत्रिकी महाविद्यालयात सेंटर फॉर एक्सलन्स स्थापन करण्याची माहितीही त्यांनी दिली. अध्यक्ष अविनाश कोठाळे यांनी बँकेच्या 25 व्या वर्षानिमित्त हे वर्ष उद्योग वर्ष म्हणून घोषित केल्याचे सांगितले. त्यांनी बँकेची 900 कोटींपर्यंतची आर्थिक उलाढाल, नवउद्योजकांसाठी कर्ज सुविधा, तसेच विविध सरकारी योजनांच्या माध्यमातून तरुणांनी उद्योग क्लस्टर उभारणीसाठी पुढे यावे, असे आवाहन केले.

नाशिकच्या दिपाली चांडक यांनी नवउद्योजकांसाठी उद्योग नोंदणी, सरकारी सबसिडी योजना आणि पब्लिक प्रोक्युरमेंट पॉलिसीबाबत मार्गदर्शन केले. तर आयसीआयसीचे प्रशिक्षक संतोष शिरसीकर यांनी सिस्टिमॅटिक इन्व्हेस्टमेंट प्लॅन (एसआयपी) व आधुनिक गुंतवणूक पद्धतींबाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे संचालन अर्चना बारबुद्धे यांनी केले. या वेळी 200 हून अधिक सभासद, अधिकारी, बँकेचे पदाधिकारी व विविध क्षेत्रातील मान्यवर उपस्थित होते.

# उंच कुटुंबाची वार्षिक कमाई ८२ कोटी रुपये!

मुलांची उंची त्यांच्या आई-वडीलांच्या उंचीवर अवलंबून असते; परंतु काही प्रकरणात मुलांची उंची आई-वडीलांपेक्षा जास्त उंच असते; परंतु अमेरिकेतील एका कुटुंबातील सर्वांची उंची अगदी ताडामाडासारखी आहे. या कुटुंबातील सर्वच लोक सहा फुटांपेक्षा जास्त उंच आहेत. यामुळे या कुटुंबाला सहा फुटी परिवार असे म्हटले जाते. हे लोक दरवर्षी ८२ कोटी रुपये कमावतात. यांच्या कमाईची पद्धतही आश्चर्यकारक आहे.

अमेरिकेच्या फ्लोरिडा येथे राहणारे टेमारा कुटुंब अलिकडे 'सोशल मीडिया'वर 'सर्वात उंच कुटुंब' म्हणून गाजत आहे. या कुटुंबातील सदस्यांची उंची ६ फूट ३ इंचापासून ते ६ फूट १० इंचापर्यंत आहे. हेच त्यांच्या प्रसिद्धीचे आणि कमाईचे साधन बनले आहे. या कुटुंबातील सर्वात चर्चित व्यक्ती ६ फूट २ इंच उंचीची मारी टेमारा आहे. तिचे इंस्टाग्रामवर ३० लाखाहून अधिक फॉलोअर्स आहेत आणि वार्षिक सुमारे १० मिलियन डॉलर (सुमारे ८२ कोटी) कमाई आहे; परंतु मारी कुटुंबातील सर्वात उंच नाही, तर तिचा मोठा भाऊ ट्रॉयची उंची ६ फूट १० इंच आहे. शेनची उंची ६ फूट ९ इंच आहे. दोन्ही बास्केटबॉल खेळाडू राहिले आहेत आणि कमाईमध्ये एकमेकांचे प्रतिस्पर्धी आहेत. ट्रॉय वर्षाला एक लाख डॉलर तर शेन ५० हजार डॉलर कमावत आहे.




मारी हीची आई क्रिस्टीन (६३ वर्ष, उंची ६ फूट ५ इंच) ही आधी इमर्जन्सी ऑपरेटर म्हणून काम करायची. आता पुरुषांच्या बुटांचे (युके साईज १३) फोटो विकून चांगली कमाई करते. मारीचे वडील मायकल (६५ वर्ष, उंची ६ फूट ३ इंच) आधी इलेक्ट्रीशियन होते. आता कुटुंबाच्या कंटेंट प्रोजेक्टमध्ये सहभागी होऊन वर्षाला ५० हजार डॉलर कमावत आहेत. मारी म्हणते की त्यांचे बालपण आर्थिकदृष्ट्या खडतर होते. आई-वडीलांनी नेहमीच मुलांच्या गरजांना प्राधान्य दिले; परंतु स्वत:साठी कधी जास्त पैसे खर्च केले नाही. त्यामुळे त्यांना आता आर्थिकदृष्ट्या सुरक्षित कुटुंबाला पाहून सर्वाधिक आनंद वाटतो आहे. सुमारे चार वर्षांपूर्वी मारीने तिची एक लाख डॉलर वार्षिक पगाराची नोकरी सोडून 'ओन्ली फॅन्स' वर काम सुरू केले. सुरुवातीला ती एकटी व्हिडीओ तयार करायची; परंतु आई-वडील आणि भाऊ नेहमीच बॅकग्राऊंडला दिसायचे कवा मदत करायचे.

हळूहळू मारीने त्यांनाही छोट्या-छोट्या स्किट्समध्ये सामील करणे सुरू केले. सर्वांनी त्यासाठी विनातक्रार तयारी दाखवली. आईला हे मजेदार वाटले तर वडीलांना हसू आले. भावांनी आव्हान म्हणून हे स्वीकारले. पहिल्या व्हिडीओत कुटुंबाने आपल्या उंचीची तुलना करत सर्वात उंच ते सर्वात छोटे असे ओळीने उभे राहत पोझ दिली. त्यांची उंची जास्त असल्याने सर्वसाधारण फर्निचर त्यांना कसे पुरेसे पुरत नाही असे दाखवले. आता हे कुटुंब 'टॉल फॅमिली ऑनलाईन' नावाने प्रसिद्ध आहेत. उंचावर ठेवलेली एखादी वस्तू सहज काढणे, दरवाजाच्या चौकटीला धडकणे, छोट्या कारमध्ये बसताना येणारी अडचण, या शिवाय डान्स, प्रँक्स आणि रोजचे अनुभव त्यांच्याद्वारे मजेदार अंदाजात सादर केले जातात.

## कॅलिडोस्कोप



# तो बनला ८०० मुलांचा पिता

१०० वर्षांच्या दिएगोने आपल्या नामशेष होणाऱ्या प्रजातीला वाचवलं आहे. दिएगो एक, दोन नाही तर तब्बल ८०० मुलांचा पिता आहे. आता हा दिएगो माणूस नाही तर कासव आहे. या कासवाचं वजन ८० किलो आहे. १०० वर्षांचा दिएगो हे 'चेलोनोएडिस हूडेनसिस' नामक प्रजातीचं कासव आहे. ही प्रजाती नामशेष होण्याच्या मार्गावर होती. जवळपास ५० वर्षांपूर्वी या प्रजातीची दोन नर तर १२ मादी कासवं उरली होती. त्यामुळे काही दिवसातच या प्रजातीचं अस्तित्व संपेल, अशी भीती व्यक्त करण्यात आली होती. ही कासवं गालापोगास बेटांवरच्या भल्या मोठ्या परिसरात रहात होती. त्यामुळे त्यांची संख्या वाढत नव्हती. म्हणूनच दिएगो आणि इतर कासवांना १९६५ मध्ये कॅप्टिव्ह ब्रिडग कार्यक्रमाअंतर्गत दक्षिण कॅलिफॉर्नियातल्या सांताक्रूज आयलंड प्राणी संग्रहालयात आणण्यात आलं होतं. दिएगोला बारा मादी कासवांसोबत ठेवण्यात आलं होतं. या काळात या कासवांची संख्या २००० झाली. यात दिएगोने प्रमुख भूमिका बजावली. दिएगो यापैकी ८०० पिलांचा पिता बनला. दिएगो जवळपास पाच दशकं आपल्या प्रजातीची लोकसंख्या वाढवण्यासाठी झटला. त्यानंतर तो निवृत्त झाला आणि त्याची रवानगी पुन्हा पॅसिफिक महासागरातल्या गालापोगास बेटांवर करण्यात आली.

# 'चॅटजीपीटी'चा सल्ला पडला महाग





'सोशल मीडिया' आणि वाढत्या टेक्नॉलॉजीमुळे आजकाल लोकांकडून त्याचा वापर, त्यावर अवलंबून राहणे वाढले आहे. 'चॅटजीपीटी' आल्यापासून तर अनेकजण सर्रास त्याचा वापर करत असतात; मात्र त्यावर आंधळेपणाने विश्वास ठेवून काहीही अवलंबणे जीवासाठी धोकादायक ठरू शकते. याचे एक ज्वलंत, जितेजागते उदाहरण समोर आले असून 'चॅटजीपीटी'चा सल्ला ऐकणे एका माणसाला इतके महागात पडले, की त्याची रवानगी थेट हॉस्पिटलमध्येच झाली.

खरे तर, 'चॅटजीपीटी'ने सुचवलेल्या डाएट प्लॅनचे पालन केल्यानंतर एका तरुणाला रुग्णालयात दाखल करावे लागले. डॉक्टरांचे म्हणणे आहे, की आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय) शी संबंधित ब्रोमाइड विषबाधेची ही कदाचित पहिलीच घटना आहे. वॉशिंग्टन विद्यापीठातील डॉक्टरांनी 'नल्स ऑफ इंटरनल मेडिसिन: क्लिनिकल केसेस'मध्ये प्रकाशित केलेल्या अहवालानुसार एका माणसाने त्याच्या आहारातून मीठ (सोडियम क्लोराईड) कमी करण्यासाठी 'चॅटजीपीटी'चा सल्ला घेतला. त्यानंतर 'चॅटजीपीटी' ने त्याला क्लोराईडऐवजी सोडियम ब्रोमाइड घेण्याचा सल्ला दिल्याचा आरोप आहे. त्या माणसाने तीन महिने हा सल्ला पाळला; पण त्यादरम्यान त्याची प्रकृती बिघडू लागली. त्याला पॅरानोईया आणि मतिभ्रम यासारख्या व्याधींची गंभीर लक्षणे जाणवू लागली आणि अखेर रुग्णालयात दाखल करावे लागले.

अखेर रुग्णालयात दाखल केल्यानंतर, जेव्हा त्याला रुग्णाला विचारण्यात आले, तेव्हा त्याने सांगितले, की त्याच्या आजाराचे कारण चॅटजीपीटी आहे, तेव्हा डॉक्टरांनी स्वतः 'चॅट जीपीटी'ला तोच प्रश्न विचारला आणि 'एआय'ने पुन्हा ब्रोमाइड हा पर्याय सुचवला; परंतु ते मानवी वापरासाठी असुरक्षित आहे. हे काही त्याने स्पष्ट केले नाही. यावरून असे दिसून येते की एआय संदर्भ न समजता माहिती देऊ शकते, जे अत्यंत धोकादायक आहे, असे डॉक्टरांचे म्हणणे आहे; मात्र सुदैवाने तीन आठवड्यांच्या उपचारानंतर ती व्यक्ती पूर्णपणे बरी झाली. या घटनेनंतर, डॉक्टरांनी एक गंभीर इशारा दिला आहे. 'एआय टूल्स' वैज्ञानिक माहिती अधिक सुलभ करू शकतात; परंतु ते कोणत्याही परिस्थितीत व्यावसायिक वैद्यकीय सल्लयाची जागा घेऊ शकत नाहीत. आरोग्याशी संबंधित बाबींमध्ये नेहमीच तज्ज्ञांचा सल्ला घ्यावा, कारण 'एआय' कधी कधी चुकीचे मार्गदर्शन देऊ शकते; जे घातक ठरू शकते, असा सल्ला डॉक्टरांनी दिला आहे.

# कुठून आलं सोनं?

सोन्यासारख्या चमचमत्या धातूचं आकर्षण नसणारी व्यक्ती विरळाच! सोन्याचे दागिने, नाणी, विटा यांना प्रचंड मागणी असते. भारतात प्रचंड पैसा ओतून सोन्याची खरेदी केली जाते. इतर देशांमध्येही सोन्याची खरेदी होते. असा हा धातू कुठून आला, याच्या निर्मितीचं रहस्य काय, असे प्रश्न काहीजणांना पडतात. सोन्याची उत्पत्ती कशी झाली,



याबाबत बरेच तर्क लढवले जातात. पण सोनं अंतराळातून पृथ्वीवर आल्याचं काही संशोधकांचं म्हणणं आहे. पृथ्वीच्या पोटात दडलेलं सोनं अंतराळातून उल्कांच्या रुपात पृथ्वीवर आल्याचं संशोधक सांगतात. अर्थात याबाबतही मतंमतांतरं आहेत. पण शास्त्रज्ञांकडे याचे ठोस पुरावे असल्याचं म्हटलं जातं. सोनं अंतराळातून उल्कापडांच्या रुपात पृथ्वीवर आलं, असं जॉन एमस्ली या शास्त्रज्ञाचं म्हणणं आहे. सोनं अंतराळातून आल्याबाबत विविध तर्क लढवले जातात. १९७० मध्ये अपोलो यान चंद्रावर उतरलं. त्यानंतर अंतराळातून पृथ्वीवर झालेल्या उल्कावर्षावामुळे सोन्याची उत्पत्ती झाल्याचा दावा केला जाऊ लागला. याबाबत बरंच संशोधन करण्यात आलं आहे. त्यामुळे पृथ्वीवरचं सोनं ही अंतराळाची देणगी असल्याची बाब नाकारता येण्यासारखी नाही.

# प्रेयसीसाठी चोरला चंद्रावरचा दगड!

प्रेयसीसाठी चंद्र-तारे तोडून आणण्याचे आश्वासन प्रियकर आपल्या प्रेयसीला देत असतात. एका माणसाने हे वाक्य खरे करून दाखवले. त्याने त्याच्या प्रेयसाठीसाठी चक्क 'लूनर रॉक' म्हणजेच चंद्रावरचा दगड चोरून आणला, तोही 'नासा'च्या लॅबमध्ये घुसून. विशेष म्हणजे त्याने चोरलेल्या या लूनर रॉकची किमत २१ लाख डॉलर इतकी होती.

नासातून चंद्रावरील दगड चोरणाऱ्या माणसाचे नाव रॉबर्ट थॅड आहे. रॉबर्टने सांगितले, की तो नासामध्ये काम करणाऱ्या टिफनीवर प्रेम करत होता. रॉबर्ट तिच्या खूप प्रेमात होता, त्याला त्याच्या प्रेयसीसोबतचे नाते अधिक रोमँटिक बनवण्याची कल्पना सुचली आणि ती होती चंद्रावरील प्रणय. यासाठी त्याने एक योजना आखली. रॉबर्टने नासाच्या प्रयोगशाळेत ठेवलेला चंद्राचा एक खडक चोरला. त्याने त्याची मैत्रीण टिफनी फाउलरलाही याबद्दल सांगितले. दोघांनी मिळून चंद्राचा तुकडा चोरण्याची योजना आखली.

अखेर चंद्रावरचा खडक चोरल्यानंतर रॉबर्टने घरी आणला आणि आपल्या बेडमध्ये लपवून ठेवला. नंतर त्याच बेडवर त्याने फाउलरसोबत प्रणय केला.



रॉबर्ट म्हणतो, की यापेक्षा चांगले काहीही असू शकत नव्हते. कारण तो चंद्रावर रोमान्स करण्यासारखाच अनुभव होता असेही त्याने सांगितले. माजी नासा इंटर्न रॉबर्ट थॅड आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी चंद्रावरचा खडक चोरण्यासाठी सुरक्षा कॅमेरे पुन्हा डिझाइन केले. त्यांनी निओप्रीन बॉडीसूट घातले आणि प्रयोगशाळेत प्रवेश मिळवण्यासाठी अधिकृत बॅजदेखील बनवले. या सर्व गोष्टींच्या मदतीने रॉबर्ट, फाउलर आणि त्यांच्या एका मित्राला १७ पौंड वजनाचा चंद्राचा दगड चोरण्यात यश आले.

'एफबीआय'च्या सांगण्यानुसार, मात्र त्या खरेदीदाराला त्या लूनर रॉकच्या स्रोताबद्दल संशय येताच त्याने एजन्सीला माहिती दिली. त्यानंतर 'एफबीआय'ने रॉबर्ट आणि त्याच्या साथीदारांना पकडण्यासाठी गुप्त कारवाई केली. अखेर रॉबर्टने आपला गुन्हा कबूल केला. या चोरीसाठी, गुन्ह्यासाठी त्याला आठ वर्षांची शिक्षा झाली, मात्र नंतर त्याला दोन वर्षं आधीच सोडून देण्यात आले तर फाऊल हिला दीडशे तासांच्या सामुदायिक सेवेची आणि नऊ हजार डॉलर्सच्या दंडाची शिक्षा सुनावण्यात आली.

# प्लास्टिकचा असाही वापर




लाकडापासून विविध वस्तू तयार केल्या जातात. लाकडं मिळवण्यासाठी झाडांची कत्तल केली जाते. एकीकडे झाडं तोडली जात असताना पर्यावरणाला हानीकारक अशा प्लास्टिकचा वापर वाढत आहे. म्हणूनच कॅनडातल्या एका कंपनीने प्लास्टिकचा पुनर्वापर करून लाकडाला पर्यायी वस्तूची निर्मिती केली आहे. 'गुडवूड' असं या कंपनीचं नाव आहे. या वस्तूचा वापर इमारत बांधण्यासाठी केला जात आहे. यात खिळेही ठोकता येतात. लाकडाऐवजी या वस्तूचा वापर केला जाऊ शकतो. ही कंपनी कॅनडामधल्या नोवा स्कॉटिया प्रांतातल्या हॉलीफ्लॅक्स परिसरातल्या जवळपास ८० टक्के प्लास्टिकचा पुनर्वापर करते तर उर्वरित २० टक्के प्लास्टिक इतर कंपन्यांकडे पाठवलं जातं. यामुळे प्लास्टिकचं प्रमाण कमी होतं शिवाय लाकडाला पर्याय उपलब्ध झाल्यामुळे झाडं तोडली जात नाहीत. 'गुडवूड'च्या या शोधामुळे स्थानिकांसह इथलं प्रशासनही आनंदी आहे. प्लास्टिकचा वापर पूर्णपणे थांबवणं शक्य नाही. म्हणूनच प्लास्टिकचा पुनर्वापर करण्याचा पर्याय योग्य असल्याचं कंपनीचं म्हणणं आहे.

# असेही निकष देखणेपणाचे!

जगात सौंदर्याचे निकष प्रत्येक ठिकाणी वेगवेगळे आहेत. एकीकडे सडपातळ शरीर आणि सिक्स-पॅक ॲब्सला सौंदर्याचे प्रतीक मानले जाते, तर दुसरीकडे इथियोपियातील बोडी जमातीमध्ये सुटलेले पोट आणि स्थूल शरीरच पुरुषांना सर्वात देखणे बनवते. बोडी जमातीमध्ये बाहेर निघालेले पोट आणि फुगलेले गाल केवळ पुरुषांना आकर्षक बनवत नाहीत, तर त्यांना लग्नासाठी सर्वात योग्य उमेदवारही बनवतात.

इथियोपियाच्या ओमो खोऱ्यात राहणारी बोडी जमात, जी मीन नावानेही ओळखली जाते, तिच्या अनोख्या सांस्कृतिक परंपरांसाठी प्रसिद्ध आहे. येथे दरवर्षी जूनमध्ये काएल समारंभ आयोजित केला जातो, जो जमातीचा नववर्ष उत्सव आहे. या समारंभाचे मुख्य आकर्षण आहे पुरुषांमधील सर्वात स्थूल होण्याची स्पर्धा. या स्पर्धेत सहभागी होण्यासाठी प्रत्येक कुटुंब आपल्या घरातील अविवाहित पुरुषाची निवड करते. हा पुरुष पुढील सहा महिने विशेष आहार आणि जीवनशैलीचे पालन करतो. या काळात ते गायीचे रक्त आणि दूध यांचे मिश्रण सेवन करतात, ज्यामुळे त्यांचे वजन झपाट्याने वाढते.

या अनोख्या प्रक्रियेत पुरुषांना वेगळ्या झोपडीत सहा महिने रहावे लागते. या काळात त्यांना कोणतीही शारीरिक हालचाल करण्याची कवा लैंगिक संबंध ठेवण्याची परवानगी नसते. महिला आणि मुली त्यांच्यासाठी गायीचे ताजे रक्त आणि दूध आणतात. बोडी जमातीमध्ये गाय पवित्र मानली जाते. त्यामुळे अनोख्या पद्धतीने रक्त काढण्यात येते. नंतर मातीने ते बंद केले जातो; जेणेकरून गायीचा जीव वाचेल. हा आहार सेवन करणे सोपे नाही. उष्ण हवामानामुळे रक्त लवकर गोठते आणि स्पर्धकांना सकाळी-सकाळी दोन लिटर रक्त आणि दूधाचे मिश्रण त्वरित प्यावे लागते. अनेक पुरुष इतक्या प्रमाणात आहार पचवू शकत नाहीत आणि उलटी करतात. तरीही, जे या आव्हानाला पार करतात, ते काएल समारंभाच्या दिवशी आपले स्थूल शरीर प्रदर्शित करतात. या दिवशी पुरुष आपल्या शरीरावर माती आणि राख लावतात आणि शहामृगाच्या पंखांपासून बनवलेले दागिने घालतात. नंतर ते एका पवित्र झाडाभोवती तासनतास प्रदक्षिणा घालतात, जिथे जमातीचे इतर लोक आणि महिला त्यांचा उत्साह वाढवतात.

या स्पर्धेचा विजेता तो पुरुष ठरतो, ज्याचे पोट सर्वात मोठे असते. त्याला कोणतेही भौतिक बक्षीस मिळत नाही; पण तो आयुष्यभरासाठी जमातीचा नायक बनतो. बोडी जमातीच्या महिला मोठ्या पोटाच्या पुरुषांना अत्यंत आकर्षक मानतात आणि अशी समजूत आहे की त्या या पुरुषांशी लग्न करण्यासाठी उत्सुक असतात. समारंभानंतर, पुरुष सामान्य आहाराकडे परत येतात आणि काही आठवड्यांतच त्यांचे वाढलेले वजन कमी होते; पण त्यांची नायकाची प्रतिमा आयुष्यभर कायम राहते. बोडी जमातीमध्ये प्रत्येक मुलाचे स्वप्न असते की मोठे होऊन या स्पर्धेत सहभागी व्हावे आणि नायक बनावे.



# आरक्षण समाजाला नव्हे, तर जातीला..

## ओबीसी नेते बबनराव तायवाडे यांची भूमिका

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :
भारतीय राज्यघटनेनुसार कोणत्याही समाजाला आरक्षण देता येत नाही, तर ते जातीला देता येते. त्यामुळे भाऊसाहेब पंजाबराव देशमुख यांनी भारताला स्वातंत्र्य मिळाल्याच्या काळात मराठा समाजातील लोकांना कुणबी जातीचे प्रमाणपत्र मिळवण्याचे आवाहन केले होते.
मात्र, विदर्भ वगळता इतर कुठल्याही भागातील मराठा समाजाने तेव्हा कुणबी जातीचे प्रमाणपत्र घेतले नाही. त्यामुळे आता मराठा समाजाला ओबीसी प्रवगार्तून आरक्षण देणे शक्य नसल्याचे राष्ट्रीय ओबीसी महासंघाचे अध्यक्ष बबनराव तायवाडे यांनी सांगितले आहे.

नागपूर भोसले घराण्याचे वंशज मुधोजी राजे भोसले यांनीही मराठा समाजाला वेगळ्या प्रवगार्तून आरक्षण देण्याची भूमिका घेतली आहे, त्यांच्या या भूमिकेचे ओबीसी महासंघ स्वागत करत असल्याचे बबनराव तायवाडे यांनी स्पष्ट केले आहे.

पंजाबराव देशमुख म्हणजे महाराष्ट्रातल्या कृषी व शिक्षण क्रांतीचे जनक. दलितांसाठी मंदिर खुले करण्याच्या आंदोलनावेळेपासून त्यांच्यात व डॉ.बाबासाहेब आंबेडकरांच्या मध्ये चांगली मैत्री निर्माण झाली होती. या कुणबी समाजाला मुख्य प्रवाहात आणण्यासाठी घटनेमध्ये काही तरतुदी कराव्यात अशी सुचना त्यांनी बाबासाहेबांना केली, त्यानंतर ६० च्या दशकात पंजाबराव देशमुखांनी मराठा शेतकरी मराठा नसून मराठा कुणबी आहे अशी मांडणी केली आणि ती घटनात्मकरीत्या मंजूर करण्यात आली. त्यावेळी विदर्भातल्या शेतकऱ्यांनी मोठ्या प्रमाणावर कुणबी असल्याची प्रमाणपत्र मिळवली. त्यामुळेच विदर्भातील बहुसंख्य कुणबी समाजाला आरक्षण मिळाले. यामागे डॉ. पंजाबराव देशमुखांचा खूप मोठा हात होता. पंजाबराव देशमुखांच्या या दूरदृष्टीचा फायदा विदर्भातील कुणबी समाजाला आत्तापर्यंत होतो आहे.



विदर्भातील या कुणबी समाजाला आरक्षणाचा फायदा १९९० ला आलेल्या मंडल आयोगांच्या शिफारशींनंतर झाला. मराठा समाजाने आधीच आपल्या जात प्रमाणपत्रात मराठा वगळून फक्त कुणबी अशी नोंद केल्याने १९ टक्के ओबीसी प्रवर्गात विदभार्तील कुणबी समाजाला ही स्थान मिळाले. या सर्वांमागे डॉ. पंजाबराव देशमुखांची दुरदृष्टी प्रामुख्याने कारणीभूत होती. त्यामुळे मराठा समाजाची मागणी अनाठायी असल्याचे ते म्हणाले.

# पंथ, संप्रदायांनी मंत्र्यांना दूर ठेवावे

■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :
नितीन गडकरी यांच्या वक्तव्यांमध्ये सर्वात ठळक वैशिष्ट्य म्हणजे त्यांचा रोखठोक आणि सरळ बोलण्याचा स्वभाव. ते कोणत्याही विषयावर बोलताना राजकीय शिष्टाचारांचा बोजा वाहत नाहीत, तर मुद्द्याला भिडून वस्तुस्थिती स्पष्ट करतात.

प्रशासकीय अकार्यक्षमता, विकासकामातील विलंब किंवा निधीअभावाची कारणं यांचा ते थेट समाचार घेतात. विशेष म्हणजे, ते आपल्या पक्षातील कार्यकर्ते, पदाधिकारी असोत की इतर राजकीय नेते, या सर्वांना ते सारख्याच थेट शब्दांत सुनावतात.

गडकरींच्या भाषणांमध्ये पक्षीय राजकारणापेक्षा काम महत्त्वाचे हा संदेश नेहमीच ठळकपणे उमटतो. त्यांच्या रोखठोक शैलीमुळे कधी कधी स्वतःच्या पक्षालाही अस्वस्थ करणारे प्रसंग निर्माण होतात, पण त्यांची तीच खरी ताकद मानली जाते. गडकरी नेहमीच कामगिरीवर भर देतात, सबबींना ते कधीही मान्यता देत नाहीत.

निधीअभाव, तांत्रिक अडथळे किंवा प्रक्रियात्मक गुंतागुंत यावर बसून राहण्याऐवजी पर्याय शोधून उपाययोजना करण्याची गरज आहे, त्यांची शैली म्हणजे शिस्त लावणारी टीका- ज्यात दोष दाखवून दिला जातो आणि त्यावर उपाय काय असू शकतो हेही स्पष्ट केले जाते. त्यामुळे गडकरींची भाषणं ही केवळ राजकीय प्रतिक्रिया राहत नाहीत, तर प्रत्यक्षात कार्यक्षमतेसाठी दिशा देणारी ठरतात. आता त्यांनी राजकारणात धर्म आणणाऱ्या नेत्यांना खडेबोल सुनावले. नागपूरमध्ये आयोजित एका कार्यक्रमात गडकरी यांनी अशा नेत्यांवर नाव न घेता टीका केली.



धर्म आणि राजकारण एकत्र मिसळणारे नेते समाजात नेहमीच वादग्रस्त ठरतात. लोकशाही व्यवस्थेत धर्म हा वैयक्तिक श्रद्धेचा विषय असताना, काही राजकारणी त्याचा वापर मतपेट्या भरण्यासाठी करतात. धार्मिक भावना भडकावून समाजात ध्रुवीकरण करण्याचा त्यांचा प्रयत्न लोकशाहीच्या मूळ तत्त्वांना बाधा आणतो.

धर्माच्या नावाखाली मतं मागणे, विशिष्ट समुदायाला आकर्षित करण्यासाठी घोषणाबाजी करणे किंवा धोरणांवर धार्मिक रंग चढवणे या पद्धतींमुळे समाजात तणाव निर्माण होतो. अशा नेत्यांमुळे लोकांमध्ये विभाजन अधिक गडद होत जाते, तर खरा मुद्दा असलेला विकास, रोजगार किंवा शिक्षण दुय्यम ठरतो. या सर्व पार्श्वभूमीवर गडकरी यांनी नागपूरमध्ये महानुभाव पंथांच्या संमेलनात महत्वपूर्ण विधान केले.

गडकरी म्हणाले, पंथ आणि संप्रदायांनी मंत्र्यांना दूर ठेवायला पाहिजे. धर्मकारण, समाजकारण आणि राजकारण या वेगवेगळ्या गोष्टी आहेत. सत्तेच्या हातात धर्म दिला तर त्याची हानी होते.

मंत्री जिथे घुसतात तिथे ते आग लावल्याशिवाय राहत नाही. दोन महंतांमध्ये ते भांडण लावतात, मग तिथे गादीसाठी संघर्ष होतो. मग शासन स्थगिती देते, समिती नेमते आणि मग दोघेही शासनाकडे येतात, असे म्हणत गडकरींनी धर्म आणि राजकारण दूर ठेवण्याचा सल्ला दिला.

# पवित्र रिश्ता फेम प्रिया मराठे काळाच्या पडद्याआड

## कर्करोगाशी झुंज ठरली अपयशी : ३८ व्या वर्षी अखेरचा श्वास

■ महासागर प्रतिनिधी
मुंबई, दि. ३१ :
मराठी आणि हिंदी टेलिव्हिजनवर आपल्या अभिनयाची छाप पाडणारी अभिनेत्री प्रिया मराठे यांचे वयाच्या ३८ व्या वर्षी निधन झाले आहे.

रविवारी पहाटे कर्करोगामुळे त्यांनी अखेरचा श्वास घेतला. गेल्या वर्षभरापासून त्या सोशल मीडिया आणि लाइमलाइटपासून दूर होत्या. त्यांच्या अचानक जाण्याने संपूर्ण मराठी कलाविश्वावर शोककळा पसरली आहे.

प्रिया मराठे यांनी शेवटचे 'तुझेच मी गीत गात आहे' या मालिकेत काम केले होते. मात्र, आरोग्याच्या कारणामुळे त्यांनी ही मालिका मध्येच सोडण्याचा निर्णय घेतला होता. आरोग्याची समस्या अचानक उद्भवल्यामुळे





मालिकेच्या शूटिंग आणि आरोग्यात समतोल साधणे कठीण झाले आहे. त्यामुळे 'मोनिका' ही भूमिका साकारताना मला खूप आनंद झाला असला तरी, मला हा प्रवास इथेच थांबवावा लागत आहे, असे तिने म्हटले होते.

प्रिया मराठे यांनी 'या सुखांनो या' या मालिकेतून टेलिव्हिजनवर पदार्पण केले होते. 'चार दिवस सासूचे' या मालिकेतही त्यांनी महत्त्वाची भूमिका साकारली. हिंदी टेलिव्हिजनमध्ये त्यांनी 'कसम से' या मालिकेद्वारे पाऊल ठेवले. त्यानंतर त्या 'पवित्र रिश्ता' मध्ये 'वर्षा'ची भूमिकेत आणि 'बडे अच्छे लगते है' मध्ये 'ज्योती मल्होत्रा'च्या भूमिकेत दिसल्या. या भूमिकांमुळे त्या घराघरांत पोहोचल्या.

प्रिया मराठे यांनी 24 एप्रिल 2012 रोजी अभिनेता शंतनू मोघे यांच्याशी लग्न केले होते. शंतनु मोघे यांनी स्वराज्यरक्षक संभाजी या मालिकेत छत्रपती शिवाजी महाराजांची भूमिका साकारली होती.

मराठी अभिनय क्षेत्रातील सुंदर जोडपे म्हणूनही यांच्याकडे पाहिले जात होते. प्रिया मराठे यांच्या निधनाने मराठी सिनेसृष्टीतील अनेकांना धक्का बसला असून, अनेक कलाकारांकडून श्रद्धांजली वाहिली जात आहे.

## नऊ लाखावर लाभार्थ्यांचे केवायसी अडले

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ३१ :
आयुष्मान भारत व महात्मा फुले जनआरोग्य योजनेच्या लाभात ई-केवायसीचा मोठा खोडा आहे. योजनेचा लाभ घेण्यास सर्व प्रकारचे शिधापत्रिकाधारक पात्र असले तरी त्यांना आयुष्मान कार्ड तयार करून घेणे बंधनकारक आहे. जिल्ह्यात नऊ लाख ७७ हजारावर लाभार्थ्यांचे ई-केवायसी झाले नसून त्यांच्याकडे कार्डच नाहीत. त्यामुळे असंख्य गरजू रुग्ण योजनेच्या लाभापासून वंचित राहत असल्याचे चित्र आहे.

आयुष्मान भारत व महात्मा फुले जनआरोग्य योजनेतून लाभार्थ्यांना प्रति कुटुंब प्रति वर्ष पाच लाखापर्यंत मोफत उपचार व एक हजार ३५६ प्रकारच्या शस्त्रक्रिया केल्या जातात. जिल्ह्यात सात लाख ६० हजार ३५० कार्ड तयार झाले आहेत. लाभार्थ्यांची एकूण संख्या १७ लाख ३३ हजार १६ आहे. उर्वरित ई-केवायसी प्रलंबित आहे. ती पूर्ण करून घेण्यासाठी विशेष मोहीम हाती घेण्यात आली.

गावे, वस्त्या, शाळा, महाविद्यालयांमध्ये जाऊन ई-केवायसीह्र सुरू करण्यात आल्याचे प्रशासनाकडून सांगण्यात आले. जिल्ह्यात खासगी व शासकीय मिळून ४० रुग्णालय योजनेला जोडली आहेत. योजनेच्या अंमलबजावणीत अकोला जिल्हा राज्यात सातव्या क्रमांकावर आहे. आयुष्मान भारत व महात्मा फुले जन आरोग्य योजनेंतर्गत सर्व प्रकारच्या शिधापत्रिकाधारकांवर पाच लाखापर्यंत मोफत उपचार केले जाऊ शकतात.





■ मुंबई : मराठा समाजाला आरक्षण देण्याच्याम मागणीसाठी मनोज जरांगे यांनी मुंबईमध्ये उपोषण सुरू केले असून, राज्यभरातून लक्षावधी मराठा बांधव मुंबईत आले आहेत. त्यांची प्रचंड गैरसोय होत असून, रेल्वे स्थानकासह मिळेल त्या ठिकाणी ते भोजन करताहेत. मात्र, यामुळे ठिकठिकाणी कचऱ्याचे ढीग जमा होत असून, बीएमसी कर्मचाऱ्यांची दमछाक होवू लागली आहे.

# अमांता हेल्थकेअरचा आयपीओ आज उघडणार

अमांता हेल्थकेअर लिमिटेड ही एक औषधनिर्माण कंपनी असून ती स्टेराईल लिक्विड उत्पादनांच्या विकास, उत्पादन आणि विपणन कार्यात गुंतलेली आहे. यामध्ये मोठ्या आणि लहान प्रमाणातील पॅरेंटरल्स (एलव्हीपीएस आणि एसव्हीपीएस) यांचा समावेश होतो.

कंपनीचा प्रारंभिक सार्वजनिक समभाग विक्रीचा प्रस्ताव १ सप्टेंबर २०२५ रोजी सुरू करण्याचा आहे. वरील किंमत पट्टीनुसार १२,६00.00 लाख उभारण्याचे उद्दिष्ट असून, हे शेअर्स एनएसई आणि बीएसई या प्लॅटफॉर्मवर सूचीबद्ध केले जाणार आहेत.या इश्यूचा आकार प्रत्येकी १० मूळ मूल्य असलेल्या १,00,00,000 इक्विटी शेअर्सपर्यंत आहे, ज्यासाठी प्रति शेअर किंमत पट्टी १२0 ते १२६ अशी आहे. इक्विटी शेअर वाटप पात्र संस्थागत गुंतवणूकदार ५0,00,000 इक्विटी शेअर्सपेक्षा जास्त नसेल.

बिगर-संस्थागत गुंतवणूकदार किमान १५,00,000 इक्विटी शेअर्स तर वैयक्तिक गुंतवणूकदार किमान ३५,00,000 इक्विटी शेअर्स पर्यंत शेअर्स खरेदी करू शकतात. या आयपीओमधून मिळणाऱ्या निव्वळ निधीचा वापर हरियाळा, खेड़ा, गुजरात येथील स्टेरीपोर्टच्या नवीन उत्पादन युनिटसाठी नागरी बांधकामाच्या कामासाठी आणि उपकरणे, यंत्रसामग्री आणि प्लांट खरेदीसाठी आवश्यक भांडवली खर्च भागवण्यासाठी केला जाईल. तसेच, हरियाळा, खेड़ा, गुजरात येथील एसव्हीपी च्या नवीन उत्पादन युनिटसाठी नागरी बांधकाम, उपकरणे, यंत्रसामग्री आणि प्लांट खरेदीसाठी भांडवली खर्च भागवण्यासाठी आणि सामान्य कॉर्पोरेट गरजांसाठी वापरण्यात येईल. अँकर गुंतवणूकदारांसाठीचा भाग शुक्रवार, २९ ऑगस्ट २०२५ रोजी उघडून शुक्रवार, २९ ऑगस्ट २०२५ रोजीच बंद झाला



लोकार्थ

या इश्यूसाठी बुक रनिंग लीड मॅनेजर बीलाइन कॅपिटल ॲडव्हायझर्स प्रायव्हेट लिमिटेड आहेत, आणि रजिस्ट्रार एमयूएफजी इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वी लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखले जात आहेत. ■ ■

## ॲमेझफिटचे दोन नवोपक्रम

ॲमेझफिट, जागतिक स्तरावर प्रशंसित स्मार्ट वेअरेबल ब्रँड, जो त्याच्या अचूकतेसाठी ओळखला जातो आणि जगभरातील खेळाडूंमध्ये विश्वासार्ह ब्रंड म्हणून ओळखला जातो, त्याने भारतात दोन अभूतपूर्व नवोपक्रम सादर केले आहेत, अमेझफिट हेलिओ स्ट्रॅप आणि अमेझफिट बॅलन्स २.

एकत्रितपणे, ते फिटनेस उत्साही आणि खेळाडूंना स्मार्ट प्रशिक्षण अंतर्दृष्टी, चांगली पुनर्प्राप्ती साधने आणि सर्वोच्च कामगिरी समर्थनासह सक्षम करण्यासाठी डिझाइन केलेले एक परिसंस्था तयार करतात.ॲमेझफिटचा पहिला स्क्रीन-फ्री फिटनेस, पुनर्प्राप्ती आणि स्लीप ट्रॅकर, बहुप्रतिक्षित अमेझफिट हेलिओ स्ट्रॅप, आंतरराष्ट्रीय स्तरावर उद्योगातील सर्वात अचूक ट्रॅकर्सपैकी एक म्हणून ओळखला जातो आणि आता भारतीय ग्राहकांसाठी उपलब्ध आहे.

त्यासोबतच, अमेझफिटने अमेझफिट बॅलन्स २ लॉंच केले आहे, एक प्रीमियम मल्टीस्पोर्ट स्मार्टवॉच ज्यामध्ये लष्करी-ग्रेड टिकाऊपणा, १७०+ स्पोर्ट्स मोड आणि अत्याधुनिक कामगिरी देखरेख आहे.दोन्ही डिव्हाइस शक्तिशाली स्टँडअलोन वेअरेबल असले तरी, एकत्र जोडल्यावर त्यांची खरी क्षमता उलगडते. बॅलन्स २ एक व्यापक प्रशिक्षण म्हणून काम करते. ■ ■ ■



## सॅमसंग इंडियाचे नवीन मोबाइल सीटी तंत्रज्ञान

भारतातील सर्वात मोठा ग्राहक इलेक्ट्रॉनिक्स ब्रँड सॅमसंगने सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स कंपनी लिमिटेडची उपकंपनी न्यूरोलॉजिका यांच्या सहकार्याने भारतात त्यांच्या पुढील पिढीच्या मोबाइल सीटी उत्पादन पोर्टफोलिओची घोषणा केली आहे. सॅमसंग इलेक्ट्रॉनिक्स कंपनी लिमिटेड प्रगत वैद्यकीय इमेजिंग तंत्रज्ञानात जागतिक आघाडीवर आहे. भारतातील निदान आणि हस्तक्षेपात्मक रेडिओलॉजीमध्ये परिवर्तन करण्यासाठी विशेषतः डिझाइन केलेले, या पुढील पिढीच्या प्रणाली गतिशीलता, एआय-संचालित कार्यक्षमता आणि रुग्ण-प्रथम डिझाइन एकत्रित करतात, शेवटी आरोग्यसेवा प्रदात्यांना कधीही, कुठेही दर्जेदार काळजी प्रदान करण्यास सक्षम करतात.

नव्याने सादर केलेल्या श्रेणीमध्ये CereTom® Elite, OmniTom® Elite, OmniTom® Elite PCD आणि BodyTom® 32/64 यांचा समावेश आहे, प्रत्येक रुग्णालये आणि विशेष केंद्रांच्या विविध क्लिनिकल गरजा पूर्ण करण्यासाठी तयार केली आहेत. सर्व आकारांच्या रुग्णालयांमध्ये, ज्यामध्ये सेवा कमी असलेल्या प्रदेशांचा समावेश आहे, दत्तक घेण्यास सक्षम करून, सॅमसंग भारतातील प्रगत इमेजिंगची उपलब्धता लोकशाहीकरण करण्यास मदत करण्यास सज्ज आहे.

भारतात मोबाइल सीटी सोल्यूशन्स लॉंच करून सॅमसंग प्रगत वैद्यकीय इमेजिंग अधिक सुलभ, कार्यक्षम आणि रुग्ण-केंद्रित करण्याच्या दिशेने एक निर्णायक पाऊल उचलत आहे. हे नवोपक्रम तंत्रज्ञानाबद्दल आहेत जितके ते महानगरे आणि टियर-2/3 शहरांमधील काळजी अंतर भरून काढण्यासाठी आरोग्य सेवा प्रदात्यांना सक्षम करण्याबद्दल आहेत. ■ ■ ■

## यू मुम्बाचा पहिला हॉल ऑफ फेम सुरू

भारतातील सर्वात प्रतिष्ठित कबड्डी फ्रँचायझींपैकी एक असलेल्या यू मुम्बाने समर्पित हॉल ऑफ फेम सुरू करणारा पहिला पीकेएल संघ बनून इतिहास रचला आहे. हा उपक्रम लीग आणि फ्रँचायझीसाठी एक महत्त्वाचा क्षण आहे, कारण यू मुम्बाने त्यांच्या प्रवासाची व्याख्या करणाऱ्या खेळाडूंना औपचारिकरित्या मान्यता देण्यात एक आदर्श प्रस्थापित केला आहे. उद्घाटन संघाचे दोन महान आयकॉन आहेत, २०१५ मध्ये यू मुम्बाला पहिल्या चॅम्पियनशिपमध्ये नेणारा कर्णधार अनुप कुमार आणि कबड्डीतील सर्वात यशस्वी कर्णधारांपैकी एक म्हणून ओळखले जाणारे बचावात्मक पॉवरहाऊस फजेल अत्राचली.

हॉल ऑफ फेमची सुरुवात यू मुम्बाची ओळख परिभाषित करणाऱ्या दोन व्यक्तींना, संघाला पहिल्या जेतेपदापर्यंत नेणारा कर्णधार आणि वर्चस्व आणि नेतृत्वाचे नवीन मानके स्थापित करणारा बचावपटू यांना सन्मानित करून होते. एकत्रितपणे, ते लवचिकता, उत्कृष्टता आणि निर्भयता या मूल्यांचे प्रतीक आहेत जे फ्रँचायझीला आकार देत आहेत. कॅप्टन कूल म्हणून ओळखले जाणारे अनुप कुमार, यू मुम्बाच्या सुरुवातीच्या वर्चस्वामागील प्रेरक शक्ती होते, ज्याने सीझन २ मध्ये संघाला पहिले पीकेएल जेतेपद आणि सलग तीन अंतिम फेरीत नेले. त्याने फ्रँचायझीसाठी ५४६ गुण मिळवले आणि कबड्डीतील महान खेळाडूंपैकी एक म्हणून त्याचा वारसा आणखी मजबूत केला. ■ ■



संकलन - संयोजन
सुबोध रणशेवरे
९८३३१४६३५६
subodh.ranshevre @rediffmail.com

## चंद्रभागेत बुडून दोघांचा मृत्यू

■ महासागर प्रतिनिधी, अमरावती, दि. ३१ :
अचलपूर तालुक्यातील मुसळधार पावसामुळे नदी-नाले तुडुंब भरून वाहत असताना चंद्रभागा नदीपात्रात दोन दुर्दैवी घटना घडल्या आहे. या घटनांमध्ये दोन व्यक्तींना जीव गमवावा लागला.

पहिली घटना चमक सुरवाडा येथे घडली. चंद्रभागा नदीला आलेल्या पुरामुळे नदी दुथडी भरून वाहत असताना काल ज्ञानदीप पारिसे (वय ४२), रा. चमक सुरवाडा यांचा पाय घसरून ते नदीपात्रात वाहून गेले. रविवारी सकाळी त्यांचा मृतदेह सापडला.

ज्ञानदीप पारिसे हे काल नदीच्या काठावर गेले होते. अचानक त्यांचा पाय घसरला आणि ते पुरात वाहून गेले. बचाव पथकाने काल त्यांचा शोध घेण्याचा प्रयत्न केला, पण रात्री उशिरापर्यंत त्यांचा शोध लागला नव्हता. दरम्यान आज सकाळी त्यांचा मृतदेह नदीपात्रात आढळून आला. बचाव पथकाने मृतदेह पाण्यातून बाहेर काढला.

दुसरी घटना अरेगाव-खांजामानगर येथे घडली. चंद्रभागा नदीपात्रात रविवारी सकाळी आणखी एका व्यक्तीचा मृतदेह आढळून आला. मृताचे नाव जनकलाल बाबू शेलुकर (रा. सोमठाणा) असे असून, मृतदेह अरेगाव-खांजामानगर परिसरातील नदीपात्रात दिसला. घटनेची माहिती मिळताच पथ्रोट पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी पंचनामा करून मृतदेह अचलपूरच्या उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठविला.

# स्टारची एअर कंपनीची इंदूर-गोंदिया विमानसेवा

## १६ सप्टेंबरपासून कार्यान्वित




■ महासागर प्रतिनिधी, नागपूर, दि. ३१ :
फ्लायबिगने बंद केलेली इंदूर ते गोंदिया सेवा आता स्टार एअर कंपनीने सुरू करण्याचा निर्णय घेतला आहे, त्याकरिता कंपनीतर्फे पुढील ६ महिन्यांचे वेळापत्रकही जाहीर केले, कमी तिकीट दरात सुरक्षित प्रवासाची हमी देण्यात आली असून येत्या १६ सप्टेंबर पासून गोंदिया जिल्ह्यातील बिरसी विमानतळावरून स्टार एअरचे विमान इंदूरसाठी ह्यटेक ऑफह्न घेणार आहे.

सध्या बिरसी विमानतळा वरून इंडिगो एअरलाइन्सने आठवड्यातून दोनदा हैदराबादला नियमित उड्डाणे सुरू केली आहेत, हजारो प्रवासी या सेवेचा लाभ घेत असून हैद्राबादमार्गे मुंबई, दिल्लीसारख्या शहरात प्रवासी जात आहेत. या पूर्वी ही फ्लाय बिग एअरलाइन्स कंपनीने गोंदिया ते इंदूर विमानसेवा सुरू केली होती. मात्र नंतर बंद करण्यात आली. ती बंद झालेली फेरी आता फ्लायबिग ऐवजी स्टार एअर एअर कंपनीने पुन्हा सुरू करणार आहे. सद्यस्थितीत गोंदिया विमानतळावरून इंडिगो कडून गोंदिया हैदराबाद विमानसेवा नियमितपणे सुरू आहे.

इंदूरच्या देवीअहिल्याबाई होळकर विमानतळावरून पुढील ६ महिन्यांसाठी वेळापत्रक जारी केले आहे. या काळात विमानतळा वरून १०० उड्डाणे होतील. स्टार एअरतर्फे गोंदियासाठी १६ सप्टेंबर अशी उड्डाणाची तारीख ही निश्चित करण्यात आली आहे . या उड्डाणाची तिकीट बुकिंग प्रक्रियाही सुरू केली आहे.

## दुरांतोला अकोल्यात थांबा

■ महासागर प्रतिनिधी, अकोला, दि. ३१ :
मुंबई-हावडा दुरांतो एक्सप्रेसला अखेर अकोला रेल्वेस्थानकावर १ सप्टेंबरपासून थांबा मंजूर करण्यात आला आहे. त्यामुळे अकोलेकरांची १६ वर्षांची प्रतीक्षा संपुष्टात आली. दुरांतोला अकोल्यात थांबा देण्यासाठी खासदार अनुप धोत्रे यांनी रेल्वे मंत्रालयात प्रयत्न केले. त्याला आता यश आले आहे. मुंबई आणि हावडाकडे जाणाऱ्या प्रवाशांना जलद प्रवास करण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.

मुंबई-हावडा दुरांतो एक्सप्रेस अकोला रेल्वेस्थानकाला बाय-बाय करून धावत होती. या गाडीला अकोल्यात थांबा देण्याची मागणी सातत्याने करण्यात आली. त्यानुसार गाडी क्रमांक १२२६१ / १२२६२ छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस हावडा दुरांतो एक्सप्रेसला अकोला जंक्शन रेल्वेस्थानकावर प्रायोगिक तत्त्वावर थांबा देण्याचा निर्णय रेल्वे प्रशासनाने घेतला. हा थांबा १ सप्टेंबर २०२५ पासून पुढील आदेश येईपर्यंत सुरू राहील. गाडी क्र. १२२६१ मुंबई ते हावडा दुरांतो एक्सप्रेस अकोला येथे मध्यरात्री ००:४० वाजता येईल आणि ००:४२ वाजता पुढे रवाना होईल.

गाडी क्र. १२२६२ हावडा ते मुंबई दुरांतो एक्सप्रेस अकोला येथे रात्री २३:५३ वाजता पोहोचेल आणि २३:५५ वाजता सुटेल. आठवड्यातून चार दिवस धावणाऱ्या दुरांतो एक्सप्रेसला अकोला येथे थांबा मिळाल्याने प्रवाशांना मुंबई आणि हावडा येथे जाण्यासाठी जलद व कमी थांब्यात पोहोचण्याची सुविधा उपलब्ध झाली आहे.